


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, सोमवार ८ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

अकोला जिल्हा रूग्णालयातील प्रकार

# पतीला पाठीवर घेउन उपचारासाठी धावाधाव





**अकोला/प्रतिनिधी-** एकीकडे देशाला विकसित राष्ट्र बनवण्याच्या मोठमोठ्या घोषणा आणि दावे केले जात असताना, दुसरीकडे देशातील आणि राज्यातील आरोग्य व्यवस्था किती पोखरलेली आणि तकलादू आहे, याचे अत्यंत संतापजनक आणि विदारक चित्र अकोल्यात समोर आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेच्या पतीला अचानक ब्रेन स्ट्रोक आल्यामुळे तिने अत्यंत आशेने आणि घाईघाईने त्याला अकोल्याच्या जिल्हा सर्वोपचार शासकीय रुग्णालयात आणले होते. अशा गंभीर परिस्थितीत रुग्णाला तातडीने स्ट्रेचर मिळणे आवश्यक होते. मात्र, रुग्णालयातील कर्मचा-यांची उदासीनता आणि अव्यवस्थेमुळे या महिलेला तातडीने स्ट्रेचर उपलब्ध करून देण्यात आले नाही. पतीची खालावत चाललेली प्रकृती पाहून आणि वेळेचे गांभीर्य ओळखून, पत्नीने कोणाचीही मदत न मिळाल्याने अखेर स्वतःच पुढाकार घेतला. एका बाजूला गळ्यात स्वतःची बॅग बांधलेली आणि पाठीवर पूर्णपणे अचेतन झालेल्या पतीला घेतले, अशा अत्यंत विदारक अवस्थेत ती महिला रुग्णालयाच्या आवारात ड?क्टर्स, नर्स आणि आयसीयू कक्षाचा शोध घेत धावपळ करत होती. पतीचा जीव वाचवण्यासाठी या पत्नीने केलेला हा थरारक आणि वेदनादायी संघर्ष पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

**शासकीय रुग्णालयातील त्रुटी पुन्हा चव्हाट्यावर-** या संपूर्ण अमानुष प्रकाराचा व्हीडीओ (पान २ वर)

## चक्क घंटागाडीतून मृतदेह रुग्णालयात; नागरिकांमध्ये संतापाची लाट




**जालना / प्रतिनिधी-** जालना जिल्ह्यातील परतूर शहरात धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका तरुणाचा मृतदेह आढळल्यानंतर तो थेट नगरपालिकेच्या कचरा वाहून नेणा-या घंटागाडीतून रुग्णालयात नेण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे नगरपालिकेकडे रुग्णवाहिका आणि शववाहिका उपलब्ध असतानाही मृतदेह अशा प्रकारे घेउन जाण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, परतूर शहरातील हिरालालनगर परिसरात राहणारा सुरेश डाकरे हा तरुण गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. त्याचा शोध घेण्यासाठी कुटुंबीय आणि नातेवाईक प्रयत्न करत होते. अखेर त्याचा मृतदेह शहरातील पाण्याच्या टाकीजवळ संशयास्पद अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मृतदेह रुग्णालयात घेउन जाण्यासाठी नगरपालिकेकडे स्वतःची रुग्णवाहिका आणि शववाहिका उपलब्ध असतानाही मृतदेह चक्क कचरा गोळा करणा-या गाडीत टाकून रुग्णालयात नेण्यात आला. या घटनेचे फोटो आणि व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे अवघ्या पंधरा (पान २ वर)

## एमपीएससी परीक्षा केंद्रावर दीड तास अगोदर पोहचणे अनिवार्य



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच झालेल्या नागरी सेवा पूर्व परीक्षेमध्ये एका दिवसात उत्तर तालिका जाहीर करण्याचा नवा रेकॉर्ड आयोगाने केला. त्यानंतर एमपीएससी एक धडाकेबाज निर्णय घेत आहे. रविवार, दिनांक १४ जून, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्तपूर्व परीक्षा २०२६ राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर होणार आहे. या परीक्षेसाठी आयोगाने नियम कठोर. केले आहेत. एमपीएससी च्या परीक्षा द्यायच्या असतील तर आता उमेदवारांना दीड तास आधी परीक्षा केंद्रावर जावे लागणार आहे. महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील प्रवेशपात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. (पान २ वर)

## नीट प्रणाली बदलणार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट-यूजी २०२६ पेपरफुटी आणि मार्किंगमधील गोंधळानंतर सरकार परीक्षा व्यवस्थेत मोठे बदल करण्याच्या तयारीत आहे. एनटीए अशी नवीन प्रणाली तयार करण्यावर काम करत आहे, ज्यामध्ये प्रश्न तयार करणा-या तज्ज्ञांनाही ते कोणत्या परीक्षेचे प्रश्नपत्रिका बनवत आहेत हे कळणार नाही.नवीन योजनेनुसार, वेगवेगळ्या विषयांचे तज्ज्ञ फक्त प्रश्न तयार करतील. हे प्रश्न एका मोठ्या डिजिटल बँकेत ठेवले जातील. अधिका-यांच्या मते, यात सुमारे १० हजार प्रश्न असू शकतात. नंतर तंत्रज्ञानाच्या मदतीने या प्रश्नांमधून अंतिम परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार केली जाईल. केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू म्हणाले पेपरफुटी प्रकरणात शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे. मंत्री जबाबदारीपासून पळ काढत नाहीत, तर व्यवस्था सुधारण्यासाठी सातत्याने पावले उचलत आहेत. एनटीएशी संबंधित अधिका-याने म्हटले आहे की, आम्ही इच्छितो की संपूर्ण प्रश्नपत्रिकेची माहिती खूप कमी लोकांपर्यंत पोहोचावी. प्रणालीने लोकांवर नाही, तर प्रक्रियेवर विश्वास ठेवला पाहिजे. पेपरफुटी प्रकरणात (पान २ वर)

## बारावीत 75% गुण नसले तरी जेईई रँकवर मिळणार जागा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आयआयटी-रुरकीने जाहीर केले आहे की, 'जेईई अडव्हान्स्ड समुपदेशन पात्रता' निकषांमध्ये सध्यातरी शिथिलता देण्यात आली आहे. ज्या उमेदवारांना इयत्ता बारावीत किमान ७५

आयआयटी प्रवेशाबाबत मोठा निर्णय!




टक्के (आरक्षित प्रवर्गासाठी ६५ टक्के) गुण मिळालेले नाहीत, तेदेखील पसंतीचे पर्याय भरू शकतात. त्यांना त्यांच्या रँकच्या आधारे तात्पुरते जागावाटप केले जाईल. अशा विद्यार्थ्यांना १५ जुलै २०२६ पर्यंत सुधारित गुणपत्रक सादर करण्याची मुभा देण्यात आली असून, बारावी ७५ टक्के गुण निकष सूट तात्पुरत्या स्वरूपात लागू राहील. दरम्यान, सीबीएसईच्या 'ओएसएम' मूल्यांकनावर विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला आहे. ज्या उमेदवारांकडे सध्या प्रवेशासाठी आवश्यक असलेले इयत्ता बारावीचे किमान गुण नाहीत, तेही सध्या सुरू असलेल्या समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होउ शकतात आणि त्यांना त्यांच्या जेईई रँकच्या आधारे जागांचे (पान २ वर)

## 100 पेक्षा जास्त मुला-मुलींचा पार्टीत सहभाग

### पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात मोठा खुलासा

**पुणे/ प्रतिनिधी-**जिल्ह्यातील तुळापूर गावच्या हद्दीतील एका आलिशान बंगल्यात सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकत मोठी कारवाई केली. ताब्यात घेतले. या पार्टीचे आयोजन केलेल्याची चौकशी केली जात आहे. पुण्यात मागील काही दिवसांपासून रेव्ह पार्टीचा मुद्दा तूफान चर्चेत आहे. घटनास्थळावरून नशेसाठी वापरले जाणारे विविध पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. रेव्ह पार्टीच्या ठिकाणी पोलिसांचा तपास सुरू



ज्यावेळी गुन्हे शाखेकडून हा छापा टाकण्यात आला, त्यावेळी तिथे १०० च्या जवळपास मुली-मुले उपस्थित होते. धक्कादायक बाब म्हणजे सर्व मुले-मुली नशेत होते. काही अल्पवयीन मुले देखील तिथे उपस्थित होते. दारूचा मोठा साठा देखील होता. पोलिसांनी त्यांना आहे. या रेव्ह पार्टीबद्दल तेजस्विनी सातपुते अप्पर पोलिस आयुक्त पुणे यांनी मोठी माहिती दिली. अप्पर पोलिस आयुक्त तेजस्विनी सातपुते यांनी म्हटले की, लोणीकंद पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये तुळापूर परिसरात मध्यरात्री पार्टी सुरू होती आणि यासाठी कोणतीही (पान २ वर)

## 6 हजार पगारी निघाला कोट्यवधींचा मालक

**भुवनेश्वर :** फक्त ६ हजार रुपये मासिक वेतनावर सरकारी नोकरी सुरू करणा-या ओडिशाच्या बैकुंठ नाथ बेहरा यांच्या कोट्यवधींच्या मालमत्तेचा खुलासा झाला आहे. बैकुंठ नाथ हे कंधमाल जिल्ह्यातील बलिगुडा येथील एकात्मिक आदिवासी विकास संस्थाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता आहेत. ओडिशा दक्षता विभागाला बेहरा यांच्याकडे उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता असल्याची तक्रार मिळाली होती. त्यानंतर भुवनेश्वर येथील विशेष न्यायाधीश (दक्षता) यांच्या शोध वारंटच्या आधारे दक्षता विभागाने शुक्रवारी भुवनेश्वर, जाजपूर, बारीपदा आणि कंधमाल जिल्ह्यातील एकूण ९ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. यावेळी ५ बहुमजली इमारती, १३ भूखंड, सोन्याचे दागिने (पान २ वर)

## रेव्ह पार्ट्या करणा-यांवर थेट मोक्का लावा!

**छ. संभाजीनगर /प्रतिनिधी-** महाराष्ट्रात रेव्ह पार्ट्यांचे प्रमाण वाढत चालले आहे, त्याला काही लोक पाठिंबा देत आहेत. तरुण मुले अशा पार्ट्यांना जातात अशाने तरुण पिढी बर्बाद होत आहे. पोलिसांनी यांच्यावर कारवाई केली पाहिजे. रेव्ह पार्ट्या करणा-यांवर मोक्का लावला पाहिजे, असे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी म्हटले.

संजय शिरसाट म्हणाले की, कंत्राटदार काम घेतात आणि ते दुस-या कंत्राटदाराला देतात. दोघांनी आपला नफा काढल्याने ते काम चांगले होत नाही. मुख्यमंत्र्यांना मी याबाबत माहिती दिली आहे. ते यावर कारवाई करणार आहेत. युद्धामुळे गॅस सिलिंडरचे दर वाढले आहेत. पेट्रोल-डिझेल बंद झाले तरच या किमती वाढणे बंद होणार नाही. संजय राउत हे घरी बसून सर्व काही बोलत असतात. त्यांना वस्तुस्थिती माहिती नाही.संजय शिरसाट म्हणाले की, लोकसभा ते मनपा निवडणूक झाली, आता विधान परिषद निवडणूक होत आहे. प्रत्येक निवडणूक झाल्यावर मविआचा पराभव झाल्यावर बॅलेटवर



निवडणुका घ्या, अशी विधाने मविआच्या नेत्यांकडून केली जातात. या संदर्भात ते सुप्रीम कोर्टात सुद्धा गेले. निवडणूक आयोगाने तिथे सर्व पुरावे सादर केले आहेत. सुप्रीम कोर्टाचा निकाल लागल्यानंतर पुन्हा पुन्हा त्याच गोष्टी लोकांसमोर आणणे. आणि सर्व ईव्हीएमवर ढकलण्याचे काम संजय राउत करत आहेत. त्यांनी संघटन कमी पडतंय हे मान्य केले पाहिजे. मविआत फूट पडल्याने त्यांचा पराभव होत आहे.

**सुप्रिया सुळेंनी पुरावे द्यावे-** संजय शिरसाट म्हणाले की, सुप्रिया सुळे यांच्याकडे पुरावे दिले आहेत त्यामध्ये मविआतील कोणी पैसे घेतल्याचे त्यांना माहिती असेल तर त्यांनी त्यांची नावे जाहीर करावी. त्यांना थांबवले कोणी आहे? तुमच्याकडे पुरावे असतील तर ते समोर आले पाहिजे. अर्धवट आरोपांना लोक गांभीर्याने घेत नाहीत. तुमच्यातील बेबनावामुळे हे पराभव झाले आहेत.

**अधिका-यांनी राजकारणात पडू नये-** संजय शिरसाट म्हणाले की, प्रशासकीय अधिकारी राजकीय लोकांच्या दबावात येत एकनाथ शिंदेंना निमंत्रण न देण्याचे प्रकार करत असतील तर मी त्यांना ठणकावून सांगतो तुम्ही नोकरीपुरते मर्यादित रहा, राजकारणी होण्याचा प्रयत्न करू नका. तसा प्रयत्न केला तर निश्चितच तुमच्यावर कारवाई केली जाईल. हा प्रश्न मी मुख्यमंत्री यांच्याकडे मांडणार आहे.

## 11 वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

- दुस-या फेरीसाठी अर्ज नोंदणी सुरू
- प्रवेश लॉक करणे अनिवार्य

**वर्धा :** ११वी प्रवेश प्रक्रिया आता वेग घेत आहे. आज ७ जून रोजी एक महत्वाचा निर्णय शिक्षण संचालनालयाने सायंकाळी जाहीर केला आहे. तसेच यात अडचण असल्यास थेट संपर्क करण्याची सुविधा पण देण्यात आली आहे. ही बाब मोठ्या प्रमाणात माहित व्हावी, अशी सूचना पण झाली आहे.



**पूर्ण क्षमतेने प्रवेश प्रक्रिया-** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून, शिक्षण संचालनालयाने (माध्यमिक व उच्च माध्यमिक) दुस-या नियमित फेरीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. राज्यातील एकूण ९,५९४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ही प्रवेश प्रक्रिया सध्या पूर्ण क्षमतेने राबवली जात आहे. काल, दिनांक ०६ जून २०२६ पासून नियमित दुस-या फेरीसाठीची विद्यार्थी नोंदणी अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी जाहीर प्रकटनाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, या फेरीमध्ये विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करण्याची (पान २ वर)

## PM मोदींनी जो बायडेन यांच्या पत्नीला गिफ्ट केलेला महागडा डायमंड



**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिलेला एक हिरा अमेरिकेच्या माजी फर्स्ट लेडी जिल बायडेन यांना इतका आवडला होता की, तो कायमस्वरूपी स्वतःकडे ठेवण्याचाही त्यांनी विचार केला होता. मात्र अमेरिकेच्या शासकीय नियमांमुळे त्यांची ही इच्छा अपुरीच राहिली. अखेर हा हिरा त्यांना सरकारकडे परत करावा लागला. जिल बायडेन यांनी नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'व्ह्यू फ्राम द ईस्ट विंग : अ मेमोयर' या आत्मचरित्रात हा किस्सा सांगितला आहे. व्हाईट हाउसमधील आयुष्य, तेथील नियम आणि परदेशी नेत्यांकडून मिळणा-या भेटवस्तूंबाबतचे अनुभव त्यांनी पुस्तकात मांडले आहेत. जून २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौ-यादरम्यान जिल बायडेन यांना ७.५ कॅरेटचा प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेला डायमंड भेट देण्यात आला होता. भारताच्या लॅब-ग्रोव्हन डायमंड उद्योगाचे प्रतीक म्हणून ही भेट देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## 6 वर्षीय मुलासह तिघे बुडाले

**नागपूर :** उन्हापासून दिलासा मिळावा म्हणून कुटुंबासह नदीपात्राजवळील शिवमंदिरात काढलेली कौटुंबिक सहल जरिपटका भागातील एका कुटुंबासाठी जीवघेणी ठरली. कन्हान नदीच्या पात्रात बुडून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. मृतांमध्ये सहा वर्षीय चिमुकल्या मुलाचा देखील समावेश आहे. चैतन्य बबलू अंबादे (वय ०६ वर्षे, रा. इंदिरा नगर, जरिपटका), गौतम राजकुमार अंबादे (३१) आणि रोहित कैलास नागदेवे (३३, रा. कुंभारे कालनी, कामठी) अशी कन्हान नदी पात्रात बुडून दगावलेल्या तिघांची नावे आहेत. हे तिघेही एकाच कुटुंबातील (पान २ वर)

## आज केंद्र सरकारविरोधात इंडिया आघाडीचे शक्तीप्रदर्शन




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची महत्त्वाची बैठक (सोमवारी) आज होणार आहे. या बैठकीत २३ राजकीय पक्ष सहभागी होणार असल्याचे समजते. महागाई, बेरोजगारी, अर्थव्यवस्था, संविधान आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात संयुक्तरणनीती आखण्यावर या बैठकीचा भर असणार आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ज्या (पान २ वर)

## पेरणीची घाई करू नका!



**मुंबई/प्रतिनिधी :** नैऋत्य मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे, असे राज्य सरकारने म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शेतक-यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले आहे. राज्य सरकारने म्हटले आहे की, सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाउस पडण्याची शक्यता आहे. पण, हा पाउस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही. दरम्यान, १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात (पान २ वर)

## अकोल्यातील भाविकाने हरिद्वारमध्ये घेतला अखेरचा श्वास

**अकोला/प्रतिनिधी :**चारधाम यात्रेसाठी अकोल्यातून भाविकांचा जथ्था गेला आहे. यामध्ये सहभागी अकोला जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अधिकारी रमेश केने यांना तीन दिवसांपूर्वी केदारनाथ येथे पहाट चढतांना डोलीमध्ये अचानक त्रास जाणवून प्रकृती बिघडली. त्यांना हरिद्वार येथील खासगी रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान रविवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या अनेक वर्षांपासून ते चारधाम यात्रेची आतूरतेने प्रतीक्षा करीत होते. यावर्षी ते चारधाम यात्रेसाठी गेले आणि तोच त्यांचा अखेरचा प्रवास ठरला. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. भाविकांचा एक मोठा जथ्था २५ मे रोजी अकोल्यावरून चारधाम यात्रेसाठी डॉ. माधव देशमुख यांच्या नेतृत्वात रवाना झाला. यामध्ये रमेश रामकृष्ण केने आपल्या पत्नी व इतर नातेवाईकांसह सहभागी झाले होते. चारधाम यात्रा करण्याची त्यांची गत अनेक वर्षांपासूनची इच्छा होती. ती आता पूर्ण झाली होती. नियतीला मात्र वेगळेच मान्य होते. अकोल्यातील सर्व भाविकांसह त्यांनी यमुनोत्री आणि गंगोत्रीचे दर्शन घेतले. चारधाम यात्रेदरम्यान ४ जून रोजी केदारनाथ येथे पहाड चढताना डोलीमध्ये रमेश केने यांना अचानक त्रासा जाणवला. त्यामुळे ते पत्नीसह वापस फाटा येथे (पान २ वर)



## 'देउळ बंद 2' चित्रपटाची टीम पोहोचली मुख्यमंत्र्यांच्या भेटीला! स्नेहल तरडेंचा अजरखच्या साडीने वेधले लक्ष

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी चित्रपटसृष्टीत सध्या बहुप्रतीक्षित ठरलेल्या देउळ बंद २ या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटाच्या घोषणेनंतर प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून कलाकार आणि निर्माते विविध माध्यमांतून चित्रपटाचा प्रचार करताना दिसत आहेत. कथा, अभिनय आणि सामाजिक संदेश यामुळे हा चित्रपट आधीपासूनच चर्चेचा विषय ठरला आहे. याच पार्श्वभूमीवर देउळ बंद २ चित्रपटाची संपूर्ण टीम नुकतीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या भेटीसाठी पोहोचली. या भेटीचा उद्देश सदिच्छा व्यक्त करणे तसेच चित्रपटासंदर्भातील विविध पैलूंवर संवाद साधणे असा होता. राज्यातील मराठी चित्रपटसृष्टीला मिळणारे प्रोत्साहन, तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील उपक्रमांवरही यावेळी चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे.या भेटीचे काही खास फोटो सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाले असून चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटत आहेत. चित्रपटाच्या संपूर्ण टीमने मुख्यमंत्र्यांसोबत घेतलेला हा क्षण विशेष ठरला आहे. अनेकांनी या भेटीला मराठी सिनेसृष्टीसाठी सकारात्मक पाउल असे म्हणत चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या भेटीत दिग्दर्शक-अभिनेते यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

## महावितरणचा २१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

# ग्राहकांना अखंडित व स्वस्त वीज देण्यात महावितरण यशस्वी - सीएमडी लोकेश चंद

**मुंबई/प्रतिनिधी:-** महाराष्ट्रात या वर्षी विजेची उच्चांक मागणी नोंदविण्यात आली. महावितरणने ही मागणी विनाअडथळा पूर्ण केली. प्रभावी नियोजन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची परिणामकारक अंमलबजावणी, कृषी पंपाचे विक्रमी सौर उर्जीकरण तसेच नवीकरणीय ऊर्जेची मोठ्या प्रमाणात निर्मिती व वापर यामुळे महावितरणला विजेची वाढती मागणी पूर्ण करणे शक्य झाले. आगामी काळात विजेची वाढती मागणी तसेच शेतक-यांसह सर्व वर्गातील ग्राहकांना अखंडित व स्वस्त दरांत वीज पुरवठा करण्यास महावितरण पूर्णपणे सक्षम आहे, अशी ग्वाही महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. तसेच कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनीच मिशन मोड वर काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महावितरण कंपनीचा २१ वा वर्धापन दिन महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकेश चंद्र बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून म.रा.वीज मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक तसेच महावितरणचे संचालक(संचालन तथा प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वित्त ) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी ,संचालक (मानव संसाधन ) राजेंद्र पवार हे प्रमुख्याने उपस्थित होते.

व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून राज्यात देशातील सर्वाधिक १० लाखांपेक्षा अधिकचे सौरपंप स्थापित करण्यात आले आहेत. तर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या दोन्ही योजनांमध्ये झालेल्या कामांमुळेच विजेची मागणी विभागली गेली व विक्रमी विजेची मागणी पूर्ण करणे शक्य झाले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीतही महाराष्ट्र अल्पावधीतच देशात अव्वल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. स्मार्ट मीटर,सब स्टेशन मॉनिटरींग सिस्टिम अशा विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विजेची हानी कमी करण्यात यश येत आहे. मात्र या कामांना आणखी गती देण्याची आवश्यकता आहे. मिशन मोडवर काम होत असल्यानेच महावितरणला जवळपास १०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. डिसेंबर अखेरपर्यंत महावितरण शेअर बाजारात नोंदणीकृत होणार असून कर्मचाऱ्यांनाही त्यात वाटा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.या प्रसंगी स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी, अलीकडच्या काळात महावितरणने केलेली प्रगती थक्क करणारी असून कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना यापुढे अधिक सक्षमपणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमात संचालक (संचालन तथा प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी,संचालक (मानव संसाधन ) राजेंद्र पवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी महावितरणच्या प्रगतीचा आढावा सादर करताना नुकताच पीएम सूर्यघर योजनेत देश पातळीवरील १० पैकी ८ पुरस्कार एकट्या महावितरणला मिळाले.त्यात नागपूर जिल्ह्याला दुसरा क्रमांक मिळाला असे सांगितले. मुख्यमंत्री ना.श्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धापन दिनानिमित्त दिलेल्या संदेशाचे प्रसारण या वेळी करण्यात आले. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी प्रास्ताविक करताना वर्धापन दिनानिमित्त कष्टांचा, पाहिलेल्या स्वप्नांचा आणि गाठलेल्या यशांचा आपण उत्सव साजरा करीत आहोत, असे ते म्हणाले.याप्रसंगी त्यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कंपनी व कामाप्रती कटिबध्दतेची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारदर्शन सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

पान १ व १० वरून

## पतीला पाठीवर घेउन उपचारासाठी

रु ग्णालयातीलच एका सजग नागरिकाने आपल्या मोबाईल कॅमे-यात कैद केला आणि तो सोशल मीडियावर पोस्ट केला. हा व्हीडीओ व्हायरल होताच शासकीय रु ग्णालयातील त्रुटी पुन्हा चव्हाट्यावर आल्याचे पाहायला मिळाले. कोट्यवधी रु पयांचा निधी मिळूनही गरिबांच्या हक्काच्या शासकीय रु ग्णालयात साधा एक स्ट्रेचर वार्डबायसह वेळेवर उपलब्ध होउ नये, याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. यापूर्वीही राज्यातील अनेक सरकारी रु ग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा आणि अपु-या सोयी-सुविधांमुळे रु ग्णांना जीव गमवावा लागल्याच्या घटना ताज्या असताना, अकोल्यातील या घटनेने त्यात आणखी एका काळ्या अध्यायाची भर घातली आहे. या संतापजनक प्रकारानंतर अकोला जिल्हा रु ग्णालय प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर सर्वसामान्य नागरिकांमधून आणि सामाजिक संघटनांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अशा संवेदनाहीन डॉक्टर आणि कर्मचा-यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणावर आता वरिष्ठ आरोग्य अधिकारी आणि लोकप्रतिनिधी काय पावले उचलतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, या घटनेने डिजिटल भारताच्या आरोग्य प्रतिमेला मोठा तडा दिला आहे, हे मात्र नक्की.

## चक्क घंटागाडीतून मृतदेह

दिवसांपूर्वीच स्थानिक आमदारांच्या हस्ते नव्या रु ग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले होते.तसेच नगरपालिकेकडे आणखी एक रु ग्णवाहिका उपलब्ध असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उपलब्ध सुविधा असतानाही त्यांचा वापर का करण्यात आला नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. या घटनेवर सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पडेवार यांनी संताप व्यक्त करत संबंधित अधिकारी आणि कर्मचा-यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकारामुळे परतूर नगरपालिकेच्या प्रशासनावर आणि पोलिस यंत्रणेवर टीकेची झोड उठली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करू न दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## 100 पेक्षा जास्त मुला-मुलींचा

परवानगी न घेता ही पार्टी सुरू होती. यावेळी १००पेक्षा जास्त मुले आणि मुली उपस्थित होते. यामध्ये अनेक तरु ण २१ वर्षाच्या आतील असल्याची संभावना वाटत आहे. ज्यांनी हा बंगला उपलब्ध करू न दिला त्याचा यामध्ये काही संबंध आहे का? याबाबत पडताळणी होत आहे. लाखो रु पयांचे मद्य येथे आढळून आले आहे. यानुसार गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. येथे मद्य, तंबाखूजन्य पदार्थ आणि गांजा आढळून आला आहे. येथील पार्टीसाठी असलेले तरु ण हे कोणत्या भागातून आले याचा तपास सुरू आहे. पार्टीत सहभागी झालेल्या मुला मुलींची कसून चौकशी पोलिसांकडून केली जात आहे.

## 6 हजार पगारी निघाला

आणि बँक लाकरमधून सुमारे २.४ कोटी रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. सर्व मालमत्तांची किंमत कोट्यवधींमध्ये असल्याचा अंदाज आहे. अलीकडील वर्षांतील उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्तेच्या सर्वांत मोठ्या कारवाईपैकी ही एक मानली जात आहे.

**भुवनेश्वरमध्ये चार बहुमजली आलिशान घरे-** भुवनेश्वरमधील ४ भागांव्यतिरिक्त, जाजपूर जिल्ह्यातील धर्मशाळा येथील वडिलोपार्जित घर, नातेवाईकांचे निवासस्थान, सरकारी क्वार्टर आणि कार्यालयातही झडती घेण्यात आली. या कारवाईत २ अतिरिक्त एसपी, ५ डीएसपी, ६ इन्स्पेक्टर आणि मोठ्या संख्येने इतर अधिकारी सहभागी होते. आतापर्यंतच्या तपासणीत पाच मोठ्या इमारतींचा शोध लागला आहे. यापैकी भुवनेश्वरमधील नीलाद्री विहार येथील सुमारे १०,५०० चौरस फूट क्षेत्रफळाची चार मजली इमारत सर्वात मोठी आहे. याव्यतिरिक्त, सैलश्री विहारमध्ये तीन मजली इमारत, पटियामध्ये दोन मजली घर आणि चंद्रशेखरपूरमध्ये दोन मजली घर आहे.

## 6 वर्षीय मुलासह

सदस्य होते. जरिपटाक पोलीस हद्दीतील इंदिरा नगरातील नातेवाईक असलेले अंबादे आणि नागदेवे हे कुटंब रविवारची सुटी आणि उन्हामुळे कौटुंबिक सहलीसाठी जुनी कामठी पोलीस हद्दीतील सैन्य दलाच्या परिसरातील शिवमंदिरात दर्शनासाठी गेले.कुटुंबातील १२ ते १३ सदस्य दोन वाहने करू न सहलीसाठी तिथे आले होते. हे शिवमंदिर कन्हान नदीच्या पात्राला लागूनच आहे. सकाळी शिवमंदिरात दर्शन घेतल्यानंतर दुपारी एकच्या सुमारास कुटुंबातील लहान मुलगा चैतन्य अंघोळ करण्यासाठी नदी पात्रात उतरला. त्याला पाण्याच्या खोलीचा अंदाज आला नाही. पाहता पाहता तो बुडायला लागला. त्याच वेळी चैतन्यचा काका गौतम त्याला वाचवण्यासाठी नदी पात्रात उतरला. मात्र त्यालाही पोहता येत नसल्याने तोही गटांगळ्या खात होता. या दोघांना वाचवण्यासाठी रोहित नागदेवे यांनी देखील पाण्यात उडी घेतली. मात्र तिघांनाही पोहता येत नसल्याने तिघेही नदी पात्रात बुडाले.

**बचावासाठी घेतलेल्या उडीने गमावले तीन जीव-**काठावर उभ्या नातेवाईकांनी आरडाओरड केल्यानंतर सैन्य दलाच्या परिसरातील जवानांनी पाण्यात उतरू न तिघांनाही वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोवर बराच वेळ झाला होता. सैन्य दलाच्या जवानांना देखील त्यांना वाचवण्यात यश आले नाही. एकमेकांना वाचवण्याच्या नादात हे तिघेही बुडाल्याच्या घटनेची माहिती तत्काळ जुनी कामठी पोलीसांना देण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय दिघे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखत तडक टीमला रवाना केले. मात्र त्यांनाही यश आले नाही. सैन्य दलाचे जवान आणि पोलिसांच्या मदतीने तिघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पोलिसांनी पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी कामठी उपजिल्हा रु ग्णालयाला रवाना केले. या प्रकरणी जुनी कामठी पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## आज केंद्र सरकारविरोधात

घडामोडी घडत आहेत, त्या पार्श्वभूमीवर देखील ही बैठक महत्त्वाची मानली जाते. राजधानी दिल्लीतील कान्स्टिट्यूशन क्लब येथे दुपारी १२ वाजता ही बैठक होणार असून यामध्ये आगामी संसदीय अधिवेशन, देशातील राजकीय परिस्थिती तसेच जनतेशी संबंधित प्रश्नांवर चर्चा होणार आहे. काही पक्ष बैठकीला उपस्थित राहू शकणार नसले तरी त्यांनी आघाडीच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे लोकशाही संस्था आणि संवैधानिक मूल्यांवर परिणाम होत असल्याचा आरोप करत रमेश यांनी महागाई आणि बेरोजगारी हे देशासमोरील गंभीर प्रश्न असल्याचे म्हटले. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले असून तरु णांसाठी रोजगाराच्या संधी कमी झाल्याचा मुद्दा बैठकीत ठळकपणे मांडला जाणार आहे.या बैठकीत केंद्र सरकारविरोधातील पुढील राजकीय कार्यक्रम, संसदेत आणि जनआंदोलनांमधील समन्वय तसेच विरोधकांची एकजूट अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंडिया आघाडीच्या भविष्यातील राजकारणाच्या दृष्टीने या बैठकीकडे विशेष लक्ष लागले आहे.

## पेरणीची घाई करू

कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

'अल निनोचं वर्ष आहे. सरासरी पाउस जरी ९२ टक्के असला, तरीदेखील दुबार पेरणीचं संकट येउ नये म्हणून शेतक-यांना मी आवाहन केलेलं आहे. पाउस कमी असला, तरी कमी कमीत नुकसान होईल, असा प्रयत्न चालला आहे', असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले. ते नागपूरमध्ये बोलत होते. दरम्यान, कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकरी व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. 'शेतक-यांनी, आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफ?र्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे', असे म्हटले आहे.

## अकोल्यातील भाविकाने

परतले. काही काळ विश्रांती केल्यानंतर त्यांना बरे वाटले. त्यानंतर त्यांना पुन्हा त्रास होउ लागला. पुढील उपचारासाठी रमेश केने यांना तत्काळ हरिद्वार येथील खासगी रु ग्णालयात दाखल केले. वडिलांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळताच त्यांचा मुलगा प्रतिक केने आणि जावई कृष्णा काळे हे देखील त्या ठिकाणी दाखल झाले. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत होती. ६ जून रोजी अकोल्यातून गेलेल्या इतर भाविकांसोबत त्यांनी संवाद देखील साधला. मात्र, रविवारी उपचारादरम्यान रमेश केने यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे पार्थिव घेउन कुटुंबीय अकोल्याकडे रु ग्णवाहिकेने निघाले आहेत, अशी माहिती ड?. माधव देशमुख यांनी दिली.

दर्शनाची आस अन् त्याच ठिकाणी शेवट- रमेश केने शांत, मनमिळाउ आणि हसतमुख स्वभावाचे होते. चारधाम यात्रेत गंगा नदीच्या दर्शनाची आस मनाशी बाळगून ते गेले होते. त्याच गंगेच्या पवित्र तीरावर हरिद्वार येथे आज त्यांनी आपला अखेरचा श्वास घेतला. त्यांचा हा शेवटचा प्रवास ठरेल, असे कधी स्वप्नातही वाटले नव्हते, अशी भावना ड?. देशमुख यांनी व्यक्त केली.

## एमपीएससी परीक्षा केंद्रावर दीड

**असे आहेत कठोर निर्णय-**परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेउन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वतः च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

**संकेतस्थळाला भेट द्या-** आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना, प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना तसेच आयोगाच्या संकेतस्थळावरील गायडन्स ऑफ एक्झामिनेशन या सदराखाली उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार ठराविक कालावधीसाठी अथवा कायमस्वरु पी प्रतिरोधनाची तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

## नीट प्रणाली बदलणार

भाषांतर करणा-यांच्या अटकेनंतर एनटीए भाषांतर प्रक्रियेतही बदल करू इच्छित आहे. एजन्सीने यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे की, ती सुमारे ८५८ भाषांतराचे काम एआय(कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारे करण्याची योजना आखत आहे. यानंतर, तज्ज्ञ फक्त हे तपासतील की भाषांतर योग्य झाले आहे की नाही. अधिका-यांचे म्हणणे आहे की, भाषांतर करणा-यांना ते कोणत्या परीक्षेचे प्रश्न पाहत आहेत याची माहिती नसावी, असाही प्रयत्न केला जाईल.

**आगामी परीक्षेची तयारी सुरू-** एनटीए सध्या २१ जून रोजी होणा-या नीट-यूजी टेस्टची तयारी करत आहे. अधिका-यांच्या मते, काही बदल आतापासूनच लागू करण्यात आले आहेत. या अंतर्गत नवीन विषय तज्ज्ञांना जोडण्यात आले आहे. त्याचबरोबर, पेपर छापल्यानंतर त्याच्या वाहतूक आणि साठवणूक प्रणालीला अधिक सुरक्षित बनवण्यावरही काम सुरू आहे.

**सीबीएसई री-एक्झामचा पेपर लीक झाला नाही-**सीबीएसई २०२६ री-एक्झामपूर्वी सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्सवर पेपर लीक झाल्याचे आणि प्रश्न आधीच मिळाल्याचे अनेक दावे केले जात आहेत. एनटीएने हे सर्व दावे चुकीचे आणि दिशाभूल करणारे असल्याचे म्हटले आहे. एजन्सीचे म्हणणे आहे की काही ठग टोळ्या विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिशाभूल करू न पैसे कमवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले कथित पेपर आणि लीकशी संबंधित मेसेज पूर्णपणे बनावट आहेत. एनटीएने सांगितले की परीक्षेच्या सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक व्यवस्था करण्यात आल्या आहेत आणि परीक्षा निष्पक्षपणे घेतली जाईल. एजन्सीने विद्यार्थ्यांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, असे बनावट संदेश आणि पोस्ट पसरवणारे खाती आणि चॅनेल ओळखले जात आहेत. एनटीए त्यांची माहिती सोशल मीडिया कंपन्या आणि सायबर क्राईम एजन्सींना देत आहे, जेणेकरून त्यांना काढून टाकता येईल. एजन्सीने अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाईसाठी तक्रार देखील दाखल केली आहे.

## बारावीत 75% गुण नसले

वाटप केले जाईल, असे आयआयटी-रु रकीने स्पष्ट केले. ज्या विद्यार्थ्यांचे गुण ७५ टक्क्यांपेक्षा कमी आहेत किंवा आरक्षित प्रवर्गासाठी ६५ टक्क्यांपेक्षा कमी आहेत, ते सध्या त्यांच्या पसंतीचे पर्याय भरण्यास पात्र आहेत आणि त्यांना त्यांच्या रँकच्या आधारे जागांचे वाटप केले जाईल, असे या वर्षी राष्ट्रीय अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा (जेईई ॲडव्हान्स्ड) आयोजित करणा-या आयआयटी-रु रकीने स्पष्ट केले. जेईई ॲडव्हान्स्ड ही आयआयटी आणि देशभरातील इतर अनेक नामांकित अभियांत्रिकी संस्थांमधील पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची मुख्य प्रवेश परीक्षा आहे.

**रँकच्या आधारे जागांचे वाटप केले जाईल-** ज्या विद्यार्थ्यांचे इयत्ता बारावीचे (किंवा समकक्ष) गुण ७५ टक्क्यांपेक्षा किंवा आरक्षित प्रवर्गात ६५ टक्क्यांपेक्षा कमी आहेत, त्यांनी काही बाबी लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. तुम्ही सध्या तुमच्या पसंतीचे पर्याय भरण्यास पात्र आहात आणि तुम्हाला तुमच्या रँकच्या आधारे जागांचे वाटप केले जाईल, असे आयआयटी-रु रकीने म्हटले आहे. तसेच, अशा उमेदवारांना १५ जुलैपर्यंत आवश्यक निकष पूर्ण करणारे सुधारित गुणपत्रक सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. सुधारित गुणपत्रक १५ जुलैपर्यंत orgjee@iitr.ac.in या ईमेलद्वारे पाठवणे आवश्यक आहे, असे संस्थेने म्हटले आहे. ते प्राप्त झाल्यानंतर, चौथ्या फेरीच्या शेवटी जागावाटपाआधारे प्रवेश दिला जाईल, असेही संस्थेने नमूद केले.

## 11 वी ऑनलाईन प्रवेश

सुवर्णसंधी उपलब्ध करू न देण्यात आली आहे. याशिवाय, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच नोंदणी केली आहे, त्यांना आपल्या प्रवेश अर्जाच्या भाग-१ मधील चुका दुरु स्त करता येणार आहेत. तसेच, आवडीच्या महाविद्यालयांचे पर्याय निवडण्यासाठीचा भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालय पसंतीक्रम) भरण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना दिनांक ०९ जून २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या फेरीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, शिक्षण संचालनालयाकडून सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज तांत्रिकदृष्ट्या अनलाक करण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आपले अर्ज तपासून ते वेळेत लाक करणे अत्यंत अनिवार्य आहे. अर्ज लाक न केल्यास संबंधित विद्यार्थी या फेरीच्या पुढील प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहू शकतात, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. पहिल्याच दिवशी विक्रमी नोंदणी झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. आज, दिनांक ०७ जून २०२६ रोजी एकाच दिवसात तब्बल ६८,२५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रणालीवर आपली नोंदणी पूर्ण केली आहे. या वाढत्या संख्येमुळे नामवंत कनिष्ठ महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी मोठी चुरस पाहायला मिळणार आहे. शिक्षण संचालनालयाने सर्व विद्यार्थी, पालक आणि राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांना या सर्व बाबींची व मुदतीची गांभीर्याने नोंद घेण्याचे आवाहन केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती पोहोचावी, यासाठी सतर्क निर्देश शिक्षण संचालकांनी दिले आहेत. ऑनलाईन प्रवेशाबाबत कोणत्याही अडचणी किंवा तांत्रिक तक्रारी असल्यास विद्यार्थ्यांनी खालील अधिकृत माध्यमांचा वापर करावा: अधिकृत वेब पोर्टल https://mahafyjcadmissions.in ई-मेल आयडी: support@mahafyjcadmissions.in

## मान्सूनची प्रतीक्षा कायम; अनेक

झाला आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, अमरावती विभागातही जूनच्या सुरुवातीला सरासरीपेक्षा कमी पावसाची स्थिती असून विभागात ३४.४ मिमी सरासरीच्या तुलनेत ७.४ मिमी पाऊस झाला आहे. हे प्रमाण केवळ २१.५ टक्के आहे.

## भरधाव कारची दोन दुचाकींना

(रा. शिरजगाव बंड) याने वाहनावरील नियंत्रण गमावले आणि समोरून येणाऱ्या दुचाकींना जबर धडक दिली. धडकेचा आवाज परिसरात घुमला आणि क्षणार्धात घटनास्थळावर रक्ताचे थारोळे साचले. या भीषण अपघातात मुरसलीन खान यांचा जागीच मृत्यू झाला. तर मोहम्मद आरिफ आणि सै. वसीम गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. अपघात घडवून आरोपी चालकाने मोबाईल बंद करून पसार होण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे मृताच्या नातेवाईकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. त्यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी केली. काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने युद्धपातळीवर शोधमोहीम राबविली. ठाणेदार उल्हास राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आरोपी हतिक लसनकर याला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात तो मद्यप्राशन करून वाहन चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## परतवाडा बस आगार आगाराच्या

दिलेल्या आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खासगी वाहने उभी करून प्रवासी घेणे अथवा उतरविणे यावर बंदी राहणार आहे. यामुळे आता परतवाडा बस आगाराच्या परिसरात ही मोहिम राबविण्यात येत आहे.

परतवाडा बस आगारातून अमरावती ,नागपूर ,मोर्शी ,मेळघाट ,औरंगाबाद ,पुणे आदी शहराकडे जाणाऱ्या बसेस उपलब्ध असतात .यामुळे नेहमी या आगारात प्रवाशी वर्गाची प्रचंड गर्दी असते .मात्र अनेक खाजगी ट्रॅव्हल्स चालक मनमर्जी प्रमाणे ट्रॅव्हल्स बस आगाराच्या प्रवेश द्वार समोर उभी करून प्रवाशी वर्गाची वाहतूक करतात .यामुळे याचा मोठा फटका परतवाडा बस आगाराला सहन करावा लागतो .तसेच परतवाडा बस आगारात गेल्या २ वर्षात नवीन २० बस उपलब्ध झाल्या आहे .यामुळे परतवाडा बस आगाराच्या परिसरात २०० मीटर मध्ये खाजगी ट्रॅव्हल्स चालकाकडून नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधी शी बोलताना परतवाडा बस आगाराचे आगार प्रमुख जीवन वानखडे यांनी दिली. एसटी महामंडळ ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. एसटीच्या उत्पन्नावर परिणाम करणारी तसेच प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारी अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे.यामुळे परतवाडा बस आगाराच्या २०० मीटर परिसरात अनधिकृत वाहतुकीमुळे निर्माण होणारी गर्दी, वाहतूक कोंडी आणि सुरक्षेचे प्रश्न बाबत अनेक वृत्त प्रकाशित झाले होते.आता राज्यस्तरावर ही मोहीम सुरू झाल्याने परतवाडा बस आगारात सुद्धा गेल्या ३ दिवसापासून २०० मीटर आत मध्ये उभ्या असणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स वर दंडात्मक कारवाई केली जात आहे. या मोहिमेत परतवाडा बस आगार प्रमुख जीवन वानखडे,स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे गरड आणि वाहतूक कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## 'फिट इंडिया'च्या संकल्पनेला

पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांना नियमित व्यायाम, सायकलिंगचा अंगीकार आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी 'फिट रहा, हिट रहा' आणि 'सायकल चालवा, आरोग्य कमवा आणि पर्यावरण वाचवा' या घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. समारोप कार्यक्रमात अमरावती ग्रामीण पोलीस बँड पथकाच्या आकर्षक वादनाने उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रम पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. यावेळी महानगरपालिकेचे उपायुक्त नरेंद्र वानखडे, निवासी उपजिल्हाधिकारी काकडे, मेरा युवा भारतचे लेखाधिकारी अजिंक्य गवळी, अमरावती सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, सचिव अतुल कळमकर तसेच शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचा गुलाबपुष्प आणि 'ग्रामगीता' पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन व समन्वय साधला. उपस्थित नागरिक, विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा आरोग्यवर्धक व पर्यावरणपूरक उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## पावसामुळे कार वर झाड

वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला असून परिसरातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. महानगरपालिकेच्या पथकाने घटनास्थळी आवश्यक दक्षता घेत नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तातडीने कार्यवाही केली. पावसाळ्याच्या काळात नागरिकांनी सतर्क राहावे तसेच आपत्कालीन परिस्थितीत अमरावती महानगरपालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी ०७२१-२५७६४२६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## सेंट्रल बैंक ऑफ इंडियाचा

पाण्डेय क्षेत्रीय प्रमुख हें होते. आपल्या प्रस्ताविकामध्ये सुनील पाण्डेय यांनी सांगितले की सेंट्रल बैंक आपल्या विविध कृषि योजनामार्फ़त कृषि विकासासाठी कार्य करत आहे, देशातील कृषि उद्योगाना चालना मिळणायासाठी सर्वात कमी व्याज दरावर कर्ज उपलब्ध करुन देत आहे. कैंप मध्ये १९ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. बँकेच्या विविध कर्ज योजनाची माहिती विनय वैश यांनी उपस्थितांना दिली. संचालन श्रीकांत पडवल यांनी तर आभार प्रदर्शन नरेश हेड़ाऊ अग्रणी जिल्हा व्यवस्थापक अमरावती यांनी केले.

## दसरा मैदानात चाकूचा

चायना चाकू जप्त करण्यात आला. जप्त शस्त्राची लांबी तब्बल १२.०५ इंच असून त्याचे पाते ९ इंच लांबीचे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या चाकूची अंदाजे किंमत ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. परवानगीशिवाय धारदार शस्त्र बाळगल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम धुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे व त्यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली.

## दोन लाखांच्या १३ बकऱ्यांसह

बिनधास्तपणे जनावरांची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मात्र याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्याने बकऱ्या घेऊन पलायन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच काशीराम कोलेकर यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आकाश कासदेकर याच्याविरुद्ध फसवणूक व विश्वासघाताचे गुन्हे नोंदविले आहेत. दोन लाखांचा मुद्देमाल घेऊन फरार झालेल्या आरोपीचा शोध पोलीस घेत असून, त्याला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## वाडा बांधण्याच्या वादातून रक्तरंजित

वार करण्याचा प्रयत्न होताच प्रकाश यांनी बचावासाठी हात पुढे केला. मात्र कोयत्याचा फटका त्यांच्या डोक्याला व डाव्या हाताच्या करंगळीला बसल्याने ते गंभीर जखमी झाले. हल्ल्यानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. रक्तबंबाळ अवस्थेतील प्रकाश शनवारे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत. या घटनेनंतर जखमी प्रकाश शनवारे यांनी धारणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी उत्तम तुकाराम शेळके याच्याविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदविला आहे. गावातील किरकोळ वादातून घडलेल्या या हिंसक प्रकारामुळे चित्री परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास धारणी पोलीस करीत आहेत.

## जनतेच्या दारी पोलीस

तक्रारींचा आढावा घेतला. याशिवाय जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांमध्ये उपस्थित राहिले. ठाणेदार आणि पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे शक्य तितक्या वेगाने निराकरण करण्यासाठी पुढाकार घेतला. या उपक्रमामुळे नागरिकांना त्यांच्या समस्या थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळत असून पोलीस यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. अमरावती ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येक शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या तक्रार निवारण दिनाचा लाभ घ्यावा आणि आपल्या समस्या, तक्रारी व अडचणी संबंधित पोलीस ठाण्यात मांडाव्यात.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ सोमवार, ८ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# स्ट्रेचर नसल्याने पत्नीच्या खांद्यावर रुग्ण

## व्हायरल व्हिडिओने आ. पठाण संतापले : सर्वोपचार रुग्णालयाची घेतली झडती



■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (जीएमसी) अकोला येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने सरकारी आरोग्य व्यवस्थेतील विदारक वास्तव पुन्हा एकदा उघड केले आहे. उपचारासाठी आलेल्या गंभीर रुग्णाला वेळेवर स्ट्रेचर उपलब्ध न झाल्याने त्याच्या पत्नीला स्वतःच्या खांद्यावर उचलून डॉक्टरांपर्यंत नेण्याची वेळ आल्याचा प्रकार समोर आला असून, या घटनेने आरोग्य व्यवस्थेतील संवेदनाहीनता, प्रशासनाचा ढिसाळपणा आणि कर्मचाऱ्यांची उदासीनता चव्हाट्यावर आली आहे.

विशेष बाब म्हणजे हा सर्व प्रकार रुग्णालय परिसरात घडत असताना तेथे उपस्थित असलेल्या डॉक्टर, सुरक्षा रक्षक आणि वॉर्ड बॉय यांच्यापैकी एकाही कर्मचाऱ्याने मदतीसाठी पुढाकार घेतला नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे रुग्णसेवेसाठी उभारलेल्या यंत्रणेचा नेमका उपयोग काय, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



घटनेची माहिती मिळताच अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी तातडीने जीएमसीमध्ये धाव घेतली. त्यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली तसेच संबंधित डॉक्टर, सुरक्षा कर्मचारी आणि वॉर्ड बॉय यांना जाब विचारत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. रुग्णसेवेत झालेल्या कथित हलगर्जीपणाबाबत त्यांनी प्रशासनाला थेट जबाबदार धरले.

'एका महिलेला तिच्या पतीला खांद्यावर घेऊन उपचारासाठी आणावे लागणे ही केवळ एका रुग्णाची शोकांतिका नाही, तर संपूर्ण आरोग्य व्यवस्थेच्या अपयशाची साक्ष आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये सामान्य नागरिक उपचारासाठी येतो; मात्र त्यालाच जर अशा अपमानास्पद आणि वेदनादायी परिस्थितीचा सामना करावा लागत असेल, तर ही व्यवस्था नेमकी कोणासाठी आहे?' असा संतप्त सवाल आमदार पठाण यांनी उपस्थित केला.

त्यांनी संबंधित डॉक्टर, सुरक्षा कर्मचारी आणि वॉर्ड बॉय यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. 'रुग्णांच्या जीवाशी आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी नाही. जबाबदारी टाळणाऱ्या आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्यांना कायद्याचा धाक दाखविणे आवश्यक आहे,' असे ते म्हणाले. गेल्या काही महिन्यांपासून जीएमसीमध्ये रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून गैरवर्तन, सुरक्षा कर्मचाऱ्यांची मुजोरी, स्वच्छतेचा अभाव, स्ट्रेचर व व्हीलचेअरची अपुरी उपलब्धता आणि रुग्णांना मिळणाऱ्या सेवांबाबत सातत्याने तक्रारी येत आहेत. मात्र या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत असल्याचे बोलले जात आहे.

जीएमसीतील या घटनेने केवळ एका रुग्णाची व्यथा समोर आणलेली नाही, तर सरकारी आरोग्य व्यवस्थेतील संवेदनाहीनता, जबाबदारीचा अभाव आणि प्रशासकीय अपयशाचे भयावह वास्तव अधोरेखित केले आहे. आता या प्रकरणात प्रशासन किती गांभीर्याने कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### प्रशासनाचा वचक संपला का?

या घटनेच्या निमित्ताने जीएमसी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्मचारी वर्गावर नियंत्रण ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्यामुळेच अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप आमदार पठाण यांनी केला. रुग्णांशी गैरवर्तन, उपचार प्रक्रियेत होणारा विलंब, कर्मचाऱ्यांची उदासीनता आणि मूलभूत सुविधांचा अभाव याबाबत सातत्याने तक्रारी येत असतानाही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचे चित्र असल्याचे त्यांनी नमूद केले.

### स्मार्ट आणि ईस्टा कंपनीच्या कारभारावरही प्रश्न

रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था आणि मनुष्यबळ पुरवणाऱ्या स्मार्ट कंपनी व ईस्टा कंपनीच्या कार्यक्षमतेवरही आमदार पठाण यांनी बोट ठेवले. 'रुग्णसेवा ही कागदोपत्री नसून प्रत्यक्षात दिसली पाहिजे. मात्र या कंपन्यांच्या कामकाजात अनेक त्रुटी असून त्याचा थेट फटका रुग्णांना बसत आहे. त्यामुळे या कंपन्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून आवश्यक असल्यास त्यांचे करार रद्द करण्यात यावेत,' अशी मागणी त्यांनी केली.

### अधिवेशनात गाजणार मुद्दा

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर हा विषय आगामी अधिवेशनात जोरदारपणे उपस्थित करणार असल्याचा इशारा आमदार साजिद खान पठाण यांनी दिला आहे. 'जनतेच्या आरोग्याशी होणारा खेळ आणि रुग्णांवरील अन्याय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाल्यास जनतेच्या वतीने तीव्र लढा उभारला जाईल,' असा सज्जड दम त्यांनी प्रशासनाला भरला.

# वाशीम शहरातील सुसाट वाहनचालकांवर कारवाईची मागणी; मनसेचे निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम शहरात सुसाट वेगाने वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर तसेच अल्पवयीन मुला-मुलींकडून होत असलेल्या वाहन वापरावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष गणेश इंगोले यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन मनसे माझी जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वाशीम शहरातील विविध कोचिंग क्लासेस तसेच माध्यमिक शाळांमध्ये शिकणारी अनेक अल्पवयीन मुले-मुली दुचाकी वाहनांचा सर्रास वापर करीत आहेत. वाहतूक नियमांचे कोणतेही भान



नसताना ही मुले दुचाकीवर डबल सीट फिरताना दिसतात. तसेच शहरातील प्रमुख आणि वर्दळीच्या रस्त्यांवर सुसाट वेगाने वाहने चालवून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण करीत आहेत.

शासकीय तंत्रनिकेतन ते पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुसद रोड, हिंगोली रोड, बसस्थानक परिसर, सिव्हिल लाईन, काटा रोड आदी भागांमध्ये अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी काही चौकांमध्ये कार्यरत असले तरी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सुसाट वेगाने वाहन चालविणारे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे आणि अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास परवानगी देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. भविष्यात होणाऱ्या अपघातांवर नियंत्रण मिळवून नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी गणेश इंगोले यांनी केली आहे. तसेच वेळेत उपाययोजना केल्यास अल्पवयीन मुलांचे जीवितहानीचे प्रकार टाळता येतील, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# भाजप वाशिम शहराच्या वतीने स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण उपक्रम उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी वाशिम शहराच्या वतीने शहराध्यक्ष मनीष मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पद्मतीर्थ संस्थान, वाशिम येथे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम तसेच 'एक पेड़ माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी पद्मतीर्थ संस्थान परिसरातील दशक्रिया घाट परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसराची साफसफाई करण्यात आली. 'स्वच्छता हीच सेवा आणि स्वच्छता हीच देशभक्ती' या संकल्पनेतून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने परिसर स्वच्छ ठेवण्याचा आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. त्यानंतर देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड़ माँ के नाम' या अभियानाला प्रतिसाद देत पद्मतीर्थ संस्थान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि भावी पिढ्यांसाठी हरित पर्यावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाद्वारे निसर्ग संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाला जिल्हा महामंत्री गणेश खंडाळकर, सौ. संगीताताई इंगोले, कार्यक्रमाचे जिल्हा संयोजक सुभाष नानवटे, शहर संयोजक राहुल वसमतकर, शंकरजी शेंडे, युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल जाधव, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. हेमलताताई विसपुते, राजू वर्मा, उत्तम पोटफोडे, उत्तर भारतीय जिल्हाध्यक्ष राजेंद्र कलवार, सरचिटणीस सुनील तापडिया, नवीन शर्मा, सीमाताई वाळके, वनमालाताई ढगे, बजरंगी आळणे, सौ. वत्सलाबाई जाधव यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# दाराकडे वळली तुझ्या गौतमाची पाऊले...



■ प्रतिनिधी | वाशिम ■

'जाहली पहाट, उठ शिंप सडा माऊले, दाराकडे वळली तुझ्या गौतमाची पाऊले...' ह्या बुद्ध गिताचा ध्वनी एखाद्याच्या दारात घुमावा, ध्वनीत व्हावा नि थेट बुद्धाच्या आगमनाचा जणूकाही भास व्हावा असे सांस्कृतिक पर्यावरण नुकतेच अनंतकुमार केशवराव जुमडे यांच्या 'राजगृह ' निवासस्थानी पाहायला मिळाले.

सदरहू सौंदर्यभूमीची पार्श्वभूमी अशी की, भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने नालंदा नगर येथे दहा दिवसीय श्रामनेर शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबिरातील शिबिरार्थींना म्हणजेच बुद्धाच्या संघाला अन्नदान ग्रहण करण्यासाठी अनंतकुमार केशवराव जुमडे यांनी त्यांच्या 'राजगृह' निवासस्थानी त्यांना आमंत्रित केले होते. औचित्य त्यांच्या वाढदिवसाचे होते. संघाच्या वतीने संपूर्ण बौद्ध संस्कार घेण्यात आला. यावेळी थेरो, भंते प्रज्ञापालजी, तसेच अनेक थेरो उपाधी संपादन केलेले भंते उपस्थित होते.दरम्यान, विजय कांबळे, महेंद्र ताजणे, नंदकिशोर कांबळे आदिंनी बुद्धाच्या विचारप्रक्रियेच्या अनुषंगाने आपली मनोगते व्यक्त केली.

# सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, वाशीम येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने संचालित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, सिव्हील लाईन, वाशीम येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी या वसतिगृहामार्फत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी मोफत निवास, भोजन व्यवस्था, ग्रंथालय, संगणक लॅब, मोफत




शैक्षणिक साहित्य, गणवेश, खेळाचे साहित्य तसेच निर्वाह भत्ता आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्रवेश प्रक्रियेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८५ टक्के जागा राखीव असून, त्यामध्ये अनाथ विद्यार्थ्यांसाठी १ टक्का व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के समांतर आरक्षण देण्यात आले आहे.

# पर्यावरण दिनी माविमच्या 'जलतारा अभियानाचा' शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), वाशिम यांच्या वतीने 'जलतारा अभियानाचा' शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक राजलक्ष्मी शाह (भा.प्र.से.) यांच्या ऑनलाइन उपस्थितीत या अभियानाचे उद्घाटन पार पडले.

जलसंधारण व भूजल पुनर्भरणाला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत वाशिम जिल्ह्यातील साखरा, सुकळी तसेच



माविम घर परिसरात एकूण २० जलतारा शोषखड्डयांची निर्मिती करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पवन देशमुख यांनी केले. अभियानाचे उद्घाटन नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक शंकर कोकडवार यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला. यावेळी व्यवस्थापकीय संचालक राजलक्ष्मी शाह यांनी पर्यावरण दिनानिमित्त अमरावती विभागात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आलेल्या जलतारा अभियानाचे कौतुक केले. जलसंवर्धन व पर्यावरण संरक्षणासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी, सीएमआरसी व्यवस्थापक तसेच सहयोगिनी उपस्थित होत्या.

# समाधान समारोह' उपक्रमातून आई-दत्तक मुलातील पोटगीचा वाद मिटला

## चार-पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा सलोख्याने निपटारा

**वाशिम :** न्यायप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे आणि 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने 'समाधान समारोह' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत देशभरातील प्रलंबित प्रकरणांचा संमती आणि सामोपचाराच्या माध्यमातून निपटारा करण्यावर भर देण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विजय तेजराव उगले विरुद्ध जिल्हाधिकारी, वाशिम व इतर या प्रकरणात दत्तक मुलगा विजय तेजराव उगले यांनी त्यांच्या आई केशरबाई तेजराव उगले व बहीण लताबाई लक्ष्मण सावळे यांच्याशी संबंधित पोटगीच्या वादाबाबत सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. यापूर्वी या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या



आदेशाविरुद्ध ही अपील करण्यात आली होती. हे प्रकरण वाशिम जिल्ह्यातील असल्याने 'समाधान समारोह' उपक्रमांतर्गत सर्वोच्च न्यायालयाने पूर्व-समुपदेशनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांच्याकडे पाठविले. त्यानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांनी संबंधित पक्षकारांचे समुपदेशन करून त्यांच्यातील वाद सामोपचाराने मिटविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

चार ते पाच वर्षांपासून सुरू असलेल्या या कौटुंबिक वादाचा निपटारा झाल्यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा आणि न्यायालयीन प्रक्रियेतील श्रम यांची मोठी बचत झाली. तसेच पक्षकारांमधील संबंधही पूर्ववत होण्यास मदत झाली आहे.

या प्रकरणात वादीच्या वतीने ?ड. वैभव एम. तिफणे तर प्रतिवादीच्या वतीने ?ड. सुरेश के. लबडे यांनी कामकाज पाहिले. वाद आपसी संमतीने निकाली निघाल्याबद्दल , जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी संबंधित पक्षकारांचे अभिनंदन करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. 'समाधान समारोह' उपक्रमामुळे न्यायालयीन वाद सामोपचाराने मिटविण्याचा मार्ग अधिक प्रभावी ठरत असून, न्यायव्यवस्थेवरील ताण कमी करण्याबरोबरच सामाजिक सलोखा वाढविण्यासही मदत होत असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम
सिव्हिल लाईन वाशिम

ई-मेल - washim.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रं- ०७२५२-२३२३३४

ई-निविदा सुचना ७ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे नोंदणीकृत / अनोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://maharashtra.etenders.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्हयातील मानोरा तालुक्यातील गिभा- कवठळ बोरव्हा - रोहणा कोलार - शेंदूरजना-रुई (प्रजिमा ४१) रस्त्यावर कि. मी. १५/८०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. | २४७.९३ लक्ष |
| २ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्हयातील मंगरुळपीर तालुक्यातील हिरंगी गोगरी पिंपरी अरक मानोली साईखेडा कासोळा सारसी चीचखेडा ते बाराजहांगीर कडे प्रजिमा, १७ (२०/९०० व २०/९५०) रस्त्यावर किमी. २०/१० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे | १५५८०८८०.०० |
| ३ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्हयातील धानोरा कळंबा सावरगांव चिखलागड ते रा.मा. २७३ रस्त्यावर किमी. ५/८०० मध्ये (प्रनिमा. २३) लहान पुलाचे पोच मागउँसाहित बांधकाम करणे. | १९३.८७ लक्ष |
| ४ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील लोहारा पोहा पारवा काकडशिवणी भाइशिवणी बांबडा कुपटी रस्त्यावर प्रजीमा ३३ किमी १५/१०० मध्ये लहान | १४७३७९२१.०० |
| ५ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील कामरगाव तंद्री बांबडा शहा प्रजीमा ३५ कि.मी. ९/६०० मधे लहान पुलाचे बांधकाम करणे. | ११५६३९०.०० |
| ६ | नाबार्ड अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील बेलखेड - डोरखेड-शिरपूर-कुरंजी-तामशी-वाशिम रस्ता रा.मा. ४०२ वर कि.मी. ३१/२०० मधे लहान पुलाचे बांधकाम करणे. | १५०.०० लक्ष |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक. ०८.०६.२०२६ ते दिनांक १५.०६.२०२६

निविदा पुर्व बैठक मा. अधीक्षक अभियंता सा. बा. मंडळ, अकोला यांचे कार्यालयात दि. ११.०६.२०२६ रोजी वेळ १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

**ई-निविदा उघडणे :-** मा. अधीक्षक अभियंता सा. बा. मंडळ, अकोला यांचे कार्यालयात दिनांक. १७.०६.२०२६ वेळ ११.०० वाजता

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालयातील सूचना फलक

जा. क्र. ३२६५/ ई- निसु-७/मंत्रालय/निली/ २६-२७ दि: २७.०५.२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम

(शुभम जोशी)
कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग वाशिम

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती?

## फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आधारे राज्यात शालेयस्तरावर त्रिभाषा सूत्र यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून लागू होणार नाही, असेच संकेत मिळत आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असताना सरकारच्या पातळीवर अद्याप काही निर्णय झालेला नाही. प्रचलित धारणा प्रमाणेच शैक्षणिक धोरण सुरू राहिल, असे शिक्षण मंत्र्यांनीही स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचा समावेश आहे. हे धोरण राज्यात लागू करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते.

गेल्या वर्षी इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीचा शासकीय आदेश जारी झाला होता. हिंदी सक्तीला विरोध झाल्यावर फडणवीस सरकारने माघार घेतली. मग नवीन आदेश काढून तिसरी भाषा म्हणून कोणत्याही भारतीय भाषेचा समावेश केला होता. हा हिंदी सक्तीचा डाव असल्याचा आरोप करीत शिवसेना- मनसेने त्याला विरोध केला होता. गेल्या वर्षी महानगरपालिकेची निवडणूक लक्षात घेता हिंदी सक्तीचा विषय वादग्रस्त ठरू शकतो हे लक्षात घेता फडणवीस यांनी त्रिभाषा सूत्राची अंमल बजावणीचा शासकीय आदेश रद्द केला होता.




त्रिभाषा धोरणाबाबत शिफारस करण्यासाठी राज्य सरकारने शिक्षणतज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षत खाली आठ सदस्यांची समिती गठीत केली होती. समितीने राज्यातील विविध भागांत जनसंवाद, शिक्षक-पालक बैठका, तज्ज्ञांशी चर्चा आणि ऑनलाइन सूचना संकलन करुन तसेच हजारो नागरिकांची मते विचारात घेऊन अहवाल फेब्रुवारी महिन्यात आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला होता. त्यावेळी या अहवालावर मंत्रिमंडळात चर्चा करुन पुढील निर्णय घेणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती.

नवे शैक्षणिक वर्ष येत्या १५ जूनपासून सुरू होत आहे. त्रिभाषा सूत्र लागू होणार की नाही याबाबत गेली काही दिवस संभ्रम सुरू होता. जाधव समितीच्या अहवालावर सरकार कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.मात्र या गेल्या पाच महिन्यापासून हा अहवाल शिक्षण विभागात कुलूपबंद असून त्याबाबत राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर कोणतीही हालचाल नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

हा अहवाल अतिशय संवदेनशील असल्याने आणि त्याबाबत मुख्यमंत्र्यांनी अद्याप कोणतेही दिशानिर्देश दिलेले नसल्याने सध्या हा अहवाल कुलूपबंद असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्राचा निर्णय तुर्तास मागे घेण्यात आल्याचे समजते.

# मुंबई विमानतळावर सोने तस्करी प्रकरणी भाजप पदाधिकाऱ्याला अटक



## डीआरआयची धडक कारवाई, ५ कोटींचे सोने जप्त

**मुंबई** - मुंबईत महसूल गुप्तचर संचालनालयाने तस्करीविरोधात मोठी कारवाई करत अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघटनेचे चिटणीस अजित आचेरकर यांना अटक केली आहे. पहाटे करण्यात आलेल्या या धाडसी कारवाईमुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

डीआरआयला मिळालेल्या गुप्त माहितीनंतर ६ जून रोजी पहाटे सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास ही मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत आचेरकर यांच्यासह त्यांच्या काही सहकाऱ्यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. तपासादरम्यान अधिकाऱ्यांच्या हाती मोठ्या प्रमाणात सोने आणि इतर साहित्य लागले असून, जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

मुंबई झोनल युनिटला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सोन्याची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी एआय एअरपोर्ट सर्व्हिसेस लिमिटेड मधील काही कर्मचारी आणि इतर व्यक्तींवर संशय होता. याच पार्श्वभूमीवर सापळा रचून रोहित सिंह, अजित आचेरकर आणि संतोष पोळ यांच्यासह इतरांना ताब्यात घेण्यात आले.

दोन श्रीलंकन आणि एक बांगलादेशी प्रवासी त्यांच्या शरीरात (रेक्टममध्ये) मेणामध्ये लपवून सोन्याची पावडर हिंदुस्थानात आणत असल्याचे उघड झाले आहे. चौकशीत त्यांनी सोन्याच्या तस्करीत सहभाग असल्याची कबुली दिली असून, जप्त केलेल्या सोन्याबाबत कोणतीही कायदेशीर मालकीची कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. त्यांच्यावर कस्टम ॲक्ट १९६२ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हा गुन्हा दखलपात्र आणि जामीनपात्र नाही असे ॐने नमूद केले आहे. हा तपास अद्याप सुरू असून आंतरराष्ट्रीय तस्करी रॅकेट, हवाला व्यवहार आणि इतर आरोपींचा शोध घेणे बाकी असल्याचे अर्जात म्हटले आहे. सर्व सात आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्याची विनंती न्यायालयाकडे करण्यात आली आहे.अजित आचेरकर यांनी काही काळापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे या प्रकरणाची राजकीय स्तरावरही जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# नागपूरच्या दर्ग्यात महिलेचा विनयभंग आणि धर्मांतरासाठी सक्ती



**नागपूर** - नागपूर जिल्ह्यातील एका दर्ग्यात घडलेल्या कथित सक्तीच्या धर्मांतराच्या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. कोलकाता येथून उरूस उत्सवासाठी आलेल्या एका महिलेने दर्ग्यातील काही व्यक्तींवर सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न, विनयभंग, धमक्या आणि बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी दर्ग्याच्या मुख्य काळजीवाहकासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

## ६ जणांवर गुन्हा

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पश्चिम बंगालमधील कोलकात्याच्या दमदम परिसरातील रहिवासी आहे.

ती १८ एप्रिल रोजी नागपूरजवळील हुजूर मरियम अम्मा दर्ग्यात आयोजित वार्षिक उरूस उत्सवात सहभागी होण्यासाठी आली होती.

महिलेच्या तक्रारीनुसार, १८ ते १९ एप्रिल दरम्यान तिला दर्गा परिसरात जबरदस्तीने रोखून ठेवण्यात आले.

याच काळात तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. धर्मांतरास नकार दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या देण्यात आल्याचा आरोपही तिने केला आहे.

# वारे मोदी तेरा खेल, सस्ती दारू महेंगा तेल!

## महागाई, इंधन दरवाढ, फसव्या कर्जमाफीविरोधात शिवसेनेचे जनआक्रोश आंदोलन



**मुंबई** - इंधन दरवाढ रद्द झालीच पाहिजे, मोदी सरकारचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय, वारे मोदी तेरा खेल, सस्ती दारू महेंगा तेल, महागाई हटाव, मोदी हटाव, शिवसेना जिंदाबाद च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडत महागाई, इंधन दरवाढ, फसवी कर्जमाफी विरोधात शिवसेनेने जोरदार आंदोलन केले.

गॅस सिलिंडर डोक्यावर घेऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास फेरा मारला, महिलांनी गॅस सिलिंडरला हळदीकुंकू वाहून त्याचे पुजन केले, तर फसवी कर्जमाफीविरोधात शासन निर्णयाची होळी करून निषेध केला.

केंद्र सरकारने केलेली इंधन दरवाढ, वाढलेली महागाई आणि शेतकऱ्यांच्या फसव्या कर्जमाफीच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर 'महंगाई के अच्छे दिन' जनआक्रोश आंदोलन केले. शिवसेना नेते, आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली सुरुवातीला सायकवरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास फेरी मारण्यात आली.

त्यानंतर शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करीत शहर दणाणून गेले. महागाई रद्द झालीच पाहिजे, मोदी सरकारचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय, वारे मोदी तेरा खेल, सस्ती दारू महेंगा तेल, इंधन दरवाढ रद्द करा, शिवसेना जिंदाबाद, जय भवानी-जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सिलिंडर समोर ठेऊन महिलांनी लाटण्यांची थाळ्या वाजवल्या. त्यानंतर डिजेवर महागाईचे गाणे टाळांच्या गजरात वाजवले.

### रणरागिणींनी केले सिलिंडरचे पुजन

शिवसेना महिला आघाडीच्या रणरागिणींनी आंदोलन स्थळी सिलिंडरला हळदी-कुंकू व फुले वाहून सिलिंडरला ओवाळून त्याचे पुजन केले. गॅस दरवाढ एवढी केली की आता सिलिंडर खरेदी करणे परवडणारे न राहिल्याने ठेवूनच देण्याची वेळ आल्याचे रणरागिणींनी सांगितले.

# मोदींनी अमेरिका आणि दोन उद्योगपतींना देश विकला




## नाना पटोले यांचा गंभीर आरोप

**मुंबई** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश अमेरिका आणि देशातील दोन उद्योगपती यांना विकला आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला.

देशात सध्या हुकूमशाही सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप ज्यांना घाबरतात त्यांच्यावर कारवाई केली जाते. देशासाठी काम करणाऱ्या लोकांना नजरपैदेत ठेवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहे. भाजपने पेंद्रात सत्ता मिळाल्यानंतर विरोधी पक्षांना संपवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यांच्यासोबत असणाऱ्या पक्षांनाही त्यांनी संपवले. हे लोकशाहीसाठी घातक आहे. जनमताचा आदर करणे सरकारचे काम असते, पण त्यांनी हे केले नाही. भाजप ही लोकशाहीविरोधी व्यवस्था आहे. याची नोंद जनतेने घेतली पाहिजे, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे.हे सरकार भ्रष्टचारी आहे. विधान परिषद निवडणुकीत भाजपने घोडेबाजार केल्याचा आरोप केला जात आहे. मतदारांना विकत घेणे, धमकावणे, गुंडाराज आणण्याचे काम भाजपकडून सुरू आहे. भाजपला सत्तेचा खूप माज आला आहे, तो इतका जास्त आहे. कायम सत्तेत राहण्यासाठी जाती-जातींमध्ये वाद लावण्याचे काम सरकारकडून सुरू आहे. सध्या जनतेमध्ये भाजप आणि सरकारविरोधात मोठा राग आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# पाऊस शेतकऱ्यांची चिंता वाढवणार



## १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर कमी

**मुंबई** - मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे.

त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

विजांच्या कडकडाटा च्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे.

# संक्षिप्त

## अमेरिकेत तेलंगणातील तरुणाची गोळ्या झाडून हत्या

**तेलंगणा** - अमेरिकेतील फिलाडेल्फिया शहरात तेलंगणातील एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अंशुल कुंचा (वय २८) असे मृत तरुणाचे नाव असून, त्याला बनावट पिझ्झा डिलिव्हरी ऑर्डरच्या बहाण्याने एका निर्जन ठिकाणी बोलावून डोक्यात गोळ्या झाडण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. अंशुल गेल्या चार वर्षांपासून अमेरिकेत राहत होता. तो एका बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत होता. नोकरीसोबत अतिरिक्त उत्पन्न मिळवण्यासाठी तो आठवड्याच्या शेवटी पिझ्झा डिलिव्हरीचे अर्धवेळ कामही करत होता. शनिवारी रात्री त्याला एका पत्त्यावर पिझ्झा पोहोचवण्याची ऑर्डर मिळाली. ही ऑर्डर फिलाडेल्फियातील एका निर्जन भागातील होती.डिलिव्हरीसाठी दिलेल्या ठिकाणी पोहोचताच अंशुलवर अज्ञात हल्लेखोराने गोळीबार केला. हल्लेखोराने त्याच्या डोक्यात अनेक गोळ्या झाडल्याची माहिती समोर आली असून, या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. या प्रकरणात केवळ लूटमारीचा हेतू नसून हा पूर्वनियोजित कट असल्याचा संशय कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. हत्येनंतर अंशुलच्या कोणत्याही मौल्यवान वस्तूंना हात लावण्यात आला नव्हता. त्यामुळे त्याला मुद्दाम लक्ष्य करण्यात आल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे.

## घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमती आणखी वाढणार?

**मुंबई** - गेल्या काही दिवसांतच देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढायला सुरूवात झाली आहे. याआधी दूध, पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात वाढ झाली असताना आता केंद्र सरकारने घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ झाली आहे. गेल्या तीन महिन्यात दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे.

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या महागाईत सामान्य जनता होरपळून निघाली आहे. यावर आता केंद्र सरकारने स्पष्टीकरण दिले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसच्या किमती प्रचंड वाढल्या असल्या, तरी जगातील इतर देशांच्या तुलनेत हिंदुस्थानातील कुटुंबांना अजूनही स्वस्त दरात गॅस मिळत असल्याचे सरकारचे सांगितले आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, या नवीन दरवाढीमुळे मुंबईत १४.२ किलोग्रॅमच्या घरगुती सिलिंडरची किंमत ९१२ रुपयांवरून आता ९४१.५० रुपयांवर पोहोचली आहे.

यापूर्वी ७ मार्च रोजी गॅस सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती, ज्यामुळे गेल्या काही महिन्यांत एकूण ८९ रुपयांची वाढ झाली आहे. मात्र या दरवाढीचा प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांवर मर्यादित परिणाम होणार आहे.या योजनेच्या लाभार्थ्यांना वर्षातून चार वेळा ३०० रुपयांची सबसिडी मिळणार असल्याने, त्यांना हा सिलिंडर ६४२ रुपयांमध्ये उपलब्ध होईल.

## साहेबराव कांबळे यांचा शिवसेनेत प्रवेश

**यवतमाळ** - यवतमाळ जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत ऐन मोक्याच्या क्षणी काँग्रेसला 'धोबीपछाड' देणारे पक्षाचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी अखेर आज मुंबईत अधिकृतपणे शिवसेना (शिंदे) गटात जाहीर प्रवेश केला आहे.अवघ्या आठवड्याभरापूर्वी ज्या कांबळेंनी संपूर्ण महाविकास आघाडीला अंधारात ठेवून निवडणुकीतून माघार घेतली होती, त्यांनी आता थेट सत्ताधारी पक्षात उडी घेतल्याने यवतमाळच्या राजकीय वर्तुळात प्रचंड भूकंप झाला आहे. या धक्कादायक घडामोडींमुळे जिल्ह्यात काँग्रेस पार भुईसपाट झाली असून, हे शल्य काँग्रेस नेत्यांच्या थेट जिव्हारी लागल्याचे दिसून येत आहे.

## पुण्यात मद्यधुंद तरुणांचा रात्रभर धांगडधिंगा

**पुणे** - शहरानजीक असलेल्या आळंदी-मरकळ रस्त्यावरील तुळापूर परिसरातील एका रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या तथाकथित 'प्रोजेक्ट एक्स' पार्टीवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने रविवारी पहाटे धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत १०७ पुरुष आणि ४९ महिलांसह एकूण १५६ जण आढळून आले असून, त्यांपैकी तिघेजण २१ वर्षांखालील असल्याचे निष्पन्न झाले आहे. कारवाईदरम्यान गांजा, बंदी घातलेले हुक्का फ्लेवर आणि ९ लाखांचा मद्यसाठा जप्त करण्यात आला असून, एकूण सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# कर्जमाफीत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे

**मुंबई** - राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेतील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पैसे जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या योजनेसाठीचे पोर्टल कार्यान्वित करण्यात आले असून पुढील येत्या आठवड्यात बँकाकडून शेतकऱ्यांची माहिती मिळणे अपेक्षित आहे. तसेच यावेळी नियमित कर्जभरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सुमारे ३६ हजार ५८५ कोटीं रुपये खर्चाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेतून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांचे कर्ज माफ होणार आहे. यामध्ये दोन लाखांपेक्षा(मुद्दल व व्याज) कमी कर्ज आहे अशा १६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांच्या १७.५५ लाख कर्ज खातेदार शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. त्यामुळे सरकारवर १४ हजार ७५४ कोटींचा आर्थिक भार पडणार आहे. दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या २ लाख ९० हजार शेतकऱ्यांना दोन लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरण्यास मुदत देण्यात आली आहे. त्यांच्या खात्यातही दोन लाख रुपये सरकार जमा करणार आहे. यासाठी ५ हजार ७९८ कोटी रुपयांचा भार पडणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या २३.६३ लाख शेतकऱ्यांना प्रति शेतकरी ५० हजार रुपये



## नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान

प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीची तयारी झाली असून सहकार विभागाच्या अधिकाऱ्याकडून महसूल विभाग निहाय बँकाच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण दिले जात आहे. कर्जमुक्ती योजनेचे पोर्टल तयार करण्यात आले असून त्यावर सोमवापासून बँका आपल्याकडील पात्र कर्जधारकांचा डेटा अपलोड करतील. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणताही फार्म भरावा लागणार नाही. बँकानी दिलेली माहिती शेवटच्या टप्यात आधार प्रमाणिकरण करताना शेतकऱ्यांना पाहता येईल. बँकानी थकीत कर्जाबाबत दिलेली माहिती योग्य असल्याची शेतकऱ्याची खात्री झाल्यानंतरच ते आधार प्रमाणिकरण करतील. त्यापूर्वी सरकारकडून बँकानी दिलेल्या माहितीची ऑनलाईन पडताळणी केली जाणार आहे.

या योजनेतून राजकीय पदाधिकारी यामध्ये मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत सदस्य तसेच सरकारी कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्र उपक्रम अधिकारी- कर्मचारी, अनुदानित संस्थांचे अधिकारी, कर्मचारी, व आयकर पात्र व्यक्ती, बाजार समित्या, साखर कारखाने, सुतगिरणी, जिल्हा बँका, नागरी सहकारी बँका, दूध संघ आदी सहकारी संस्थांचे पदाधिकारी, संचालक व २५ हजार रुपयांहून अधिक वेतन असणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही.

ऑनलाईन पद्धतीने छाननी करताना अपात्र शेतकरी आपोआप बाजूला होतील. सहकार विभागाशी सबंधित सुमारे दीड लाख अपात्र शेतकरी या योजनेतून बाजूला होतील, अशाचप्रकारे अन्य विभागांशी सबंधित अपात्र शेतकरी योजनेतून दूर झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांची गावनिहाय यादी जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण होताच त्यांच्या खात्यात पैसे जमा होतील. कर्जदार शेतकऱ्यांचे पैसे कर्जखात्यात तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहन अनुदान त्यांच्या बचत खात्यात जमा होतील. जून अखेर अथवा जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून ही मदत जमा होईल अशी माहिती सहकार विभागातील सूत्रांनी दिली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९१ ■ सोमवार ८ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


## रक्तदानाच्या थेंबातून मानवतेचा महासागर; वर्धेत आधुनिक रक्तपेढी सुरू

### लायन्स ब्लड सेंटरचे उद्घाटन; रक्तदानासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे खासदार अमर काळे यांचे आवाहन



वर्धा जनमाध्यम : रक्तदानामुळे शरीर कमकुवत होते, तब्येतीवर परिणाम होतो असे अनेक गैरसमज आजही समाजात आहेत. हे गैरसमज दूर करून युवकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आपल्या रक्ताच्या एका पिशवीमुळे एखाद्या गरजू व्यक्तीला नवजीवन मिळू शकते, असे भावनिक प्रतिपादन खासदार अमर काळे यांनी केले.

शास्त्री चौक येथे ओपन बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित लायन्स ब्लड सेंटर वर्धाच्या नवीन रक्तपेढीचे उद्घाटन आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार काळे बोलत होते.

आपल्या भाषणात त्यांनी एक हृद्य आठवण सांगितली. आमदार असताना रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाला जात असल्याचे मी आजीला सांगितले. त्यावेळी तिने 'उद्घाटन कर, पण रक्त देऊ नक असे सांगितले होते.

हा किस्सा समाजातील रक्तदानाविषयी असलेल्या गैरसमजांचे वास्तव दर्शवितो, असे ते म्हणाले.

वर्ध्यात रक्त व प्लाझमासंबंधी सेवांसाठी अनेकदा नागपूरवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र आता आधुनिक रक्तपेढीमुळे या सुविधा जिल्ह्यातच उपलब्ध होणार असून रुग्ण व नातेवाईकांचा मोठा त्रास वाचणार आहे. ही रक्तपेढी जिल्हावासीयांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदायिनी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी रक्तदात्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ, सागर तोडकर, यशवंत झाडे, डॉ. चावरे, आशिष भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.

## महागाईचा भडका : गॅस दरवाढीने वर्धेकरांच्या चुली पेटल्या

# घरगुती एलपीजी सिलिंडर २९ रुपयांनी महाग; सर्वसामान्यांच्या संसाराला पुन्हा आर्थिक झळ



**वर्धा जनमाध्यम**

महागाईच्या वाढत्या झळांनी आधीच होरपळलेल्या सर्वसामान्य जनतेवर केंद्र सरकारने आणखी एक आर्थिक बोजा टाकला आहे. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ जाहीर करण्यात आल्याने वर्धा जिल्ह्यातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पेट्रोल-डिझेल, अन्नधान्य, भाजीपाला, खाद्यतेल आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे कुटुंबांचे मासिक अर्थकारण आधीच डळमळीत झाले असताना गॅस दरवाढीचा हा नवा झटका सर्वसामान्यांच्या खिशाला चटका लावणारा ठरला आहे.

या नव्या दरवाढीनंतर १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत थेट २९ रुपयांची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन महिन्यांतील ही दुसरी मोठी भाववाढ असून यापूर्वी मार्च महिन्यात सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यामुळे अल्पावधीतच गॅसच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाल्याने गृहिणींसमोर घरखर्चाचे नवे संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे खा, अमर काळे यांनी या दरवाढीवर तीव्र प्रतिक्रिया देत केंद्र सरकारच्या धोरणांवर निशाणा साधला आहे. महागाई नियंत्रणात असल्याचा दावा करणारे सत्ताधारी टप्प्याटप्प्याने जनतेला आर्थिक धक्के देत असल्याची टीका त्यांनी केली. या धोरणाची राजकीय किंमत सरकारला भविष्यात चुकवावी लागेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

गॅस दरवाढीचा फटका केवळ घरगुती ग्राहकांनाच नव्हे तर व्यावसायिक क्षेत्रालाही बसणार आहे. काही दिवसांपूर्वीच व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरातही वाढ करण्यात आली होती. त्यामुळे हॉटेल, खानावळी, बेकरी आणि लघुउद्योगांच्या खर्चात वाढ होणार असून त्याचा परिणाम वस्तू व सेवांच्या दरांवरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकीकडे रोजगार आणि उत्पन्न वाढत नसताना दुसरीकडे महागाईचा आलेख सातत्याने वर जात आहे. त्यातच गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य कुटुंबांचा आर्थिक ताळमेळ आणखी बिघडणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. वाढत्या महागाईच्या वणव्यात वर्धेकरांचा संसार अक्षरशः होरपळत असून सरकारने तातडीने दिलासा देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## पत्नीचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल; पतीसह पाच जणांवर गुन्हा

### छळ, मारहाण आणि बदनामीच्या आरोपांनी हिंगणघाट हादरले




**हिंगणघाट जनमाध्यम-** पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका विवाहित महिलेच्या छळाची धक्कादायक घटना समोर आली असून पत्नीचे आक्षेपार्ह फोटो नातेवाईक आणि मित्रांमध्ये व्हायरल केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ वर्षीय पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. विवाहानंतर काही महिन्यांतच पती आणि सासरच्या मंडळींकडून पैशांसाठी दबाव टाकण्यात येत होता. पैशांची मागणी पूर्ण न झाल्याने पीडितेला सातत्याने मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. अनेकदा मारहाण करून तिचा छळ करण्यात आल्याचा आरोप तिने तक्रारीत केला आहे.

या अत्याचारांची माहिती महिलेने माहेरच्या नातेवाईकांना दिली होती. मात्र संसार टिकविण्याच्या हेतूने तिला समजूत काढण्यात आली. तरीही सासरकडील त्रास कमी झाला नाही. दरम्यान, २७ डिसेंबर २०२५ रोजी पतीने तिला भावाच्या घरी सोडून दिले. त्यानंतर पत्नीला परत आणण्यासाठी कोणताही प्रयत्न करण्यात आला नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. याच काळात पतीने पत्नीचे आक्षेपार्ह फोटो काही नातेवाईक व मित्रांना पाठवून व्हायरल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे महिला मानसिकदृष्ट्या खचून गेली. अखेर तिने ६ जून रोजी हिंगणघाट पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत पतीसह पाच जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

## मान्सूनचा वेग मंदावला; १५ जूनपर्यंत पावसाची शक्यता कमी

### शेतकऱ्यांना सावधतेचा इशारा; पेरणीची घाई टाळण्याचे आवाहन



**मुंबई जनमाध्यम** : राज्यात मान्सूनने दक्षिण कोकणात प्रवेश केला असला तरी त्याची प्रगती अद्याप संथ असून किमान १५ जूनपर्यंत राज्यभर समाधानकारक पावसाची शक्यता कमी असल्याचे हवामान विभागाच्या अंदाजातून स्पष्ट झाले आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र त्यानंतर मान्सूनचा वेग कमी होण्याची चिन्हे दिसत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरणासह मेघगर्जना व वादळी पावसाच्या सरी कोसळू शकतात. मात्र हा पाऊस विखुरलेल्या स्वरूपाचा राहणार असल्याने व्यापक क्षेत्रात पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण होण्याची शक्यता कमी आहे.दरम्यान, १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता असून मराठवाड्यात तापमान ३५ ते ४० अंशांच्या दरम्यान राहू शकते.

कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली किंवा वीज खांब, ट्रान्सफॉर्मर आणि विद्युत वाहिन्यांजवळ थांबणे टाळावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. राज्यातील शेतकरी व नागरिकांनी हवामान विभागाच्या अद्ययावत सूचनांवर लक्ष ठेवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## लक्ष्मी'च्या नादात दारूबंदीची वाट लावली

### रामनगर पोलिसांच्या नाममात्र कारवायांवर संशय; मोठे मासे मोकाट, छोट्यांवरच धाडींचा फार्स



वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यात दारूबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी म्हणून रामनगर पोलिस ठाण्यात स्वतंत्र दारूबंदी पथक उभे करण्यात आले. मात्र हे पथक अवैध दारू व्यवसाय मोडून काढण्याऐवजी 'लक्ष्मी दर्शनात' अधिक रमल्याची जोरदार चर्चा शहरात रंगली आहे. त्यामुळे नुकत्याच करण्यात आलेल्या कारवाया खरोखरच दारूबंदीसाठी होत्या की जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. रामनगर पोलिस ठाण्यातील अवी बनसोड, मुकेश वांदिले, मनोज भोमले आणि विक्की अनेराव यांनी दोन दिवसांत दोन कारवाया केल्याचा गाजावाजा करण्यात आला. ५ जून रोजी पोद्दार बगीचा परिसरात धाड टाकून राजू जयस्वाल व विकास खोब्रागडे यांच्याकडून देशी-विदेशी दारूसह १९ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर ६ जून रोजी कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान इंदिरानगर आदिवासी कॉलनीत शुभम दरोकार याच्या घरावर छापा टाकून ७ हजार ७०० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला.

मात्र या कारवायांनंतरही शहरातील अनेक भागांत अवैध दारूविक्री खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. लाखोंची उलाढाल करणारे मोठे दारूव्यावसायिक मोकाट फिरत असताना केवळ किरकोळ कारवाया करून दारूबंदीची आकडेवारी फुगविण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. त्यामुळे या कारवाया म्हणजे दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी नव्हे, तर 'सारवासारवीचा खेळ' असल्याचा आरोप होत आहे.

रामनगर पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पौर्णिमा राखोंडे यांनी या चर्चेची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दारूबंदी पथकातील काही कर्मचाऱ्यांचे अवैध धंदेवाल्यांशी आर्थिक साटेलोटे तर नाही ना, याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दारूबंदीच्या नावाखाली फक्त छोट्या माशांवर जाळे टाकून मोठ्या माशांना अभय देण्याचा प्रकार सुरू असेल, तर जनतेचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होणार यात शंका नाही. आता रामनगर पोलिस प्रशासन खऱ्या अर्थाने दारूबंदी राबविणार की केवळ कारवायांचा दिखावा करणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## तीन बळी गेले, तरी रेती माफियांची मुजोरी कायम

### मांडगावच्या वणात पुन्हा बोटीने रेती उपसा; प्रशासनाच्या भूमिकेवर संताप




**वर्धा जनमाध्यम** : मांडगाव येथील वणा नदीत निर्माण झालेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे तीन निष्पाप जीवांचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाच नदीपात्रातून पुन्हा बोटीच्या सहाय्याने रेती उपसा सुरू असल्याचे समोर आले आहे. मान्सूनपूर्व काळात रेतीची साठेबाजी करण्यासाठी रेती माफियांनी नदीचे पोट फाडण्याचा सपाटा लावला असून प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. येत्या ९ जूनपासून मान्सून हंगाम सुरू होत असल्याने अधिकृत रेती घाटांवरील उत्खनन बंद होणार आहे. त्यामुळे अधिक नफा कमावण्याच्या उद्देशाने काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात रेती साठवून ठेवण्याचे प्रकार सुरू आहेत. मांडगाव येथील वणा नदीच्या पात्रात तर नियमांना हरताळ फासत चक्क बोटीच्या सहाय्याने रेती उपसा केला जात असल्याचे स्थानिकांनी निदर्शनास आणून दिले आहे.काही दिवसांपूर्वी अधिक मासानिमित्त नदीत स्नानासाठी गेलेल्या शेडगाव येथील बाप-लेकीसह एका मुलीचा बुडून मृत्यू झाला होता. नदीपात्रातील खोल खड्डे या दुर्घटनेला कारणीभूत ठरल्याचा आरोप त्यावेळी करण्यात आला होता. मात्र या दुर्दैवी घटनेतून कोणताही धडा न घेता पुन्हा त्याच ठिकाणी रेती उपसा सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पर्यावरणीय नियमांनुसार नदीपात्रात बोट व जड यंत्रसामग्रीच्या सहाय्याने रेती उपसा करण्यावर निर्बंध आहेत. तरीही उघडपणे हा प्रकार सुरू असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही नागरिकांनी तर या प्रकारामागे प्रभावशाली व्यक्तींचे संरक्षण असल्याचा संशय व्यक्त केला आहे.मान्सूनच्या तोंडावर सुरू असलेल्या या बेकायदा उत्खननामुळे नदीचे पर्यावरण धोक्यात आले असून भविष्यात आणखी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महसूल, खनिकर्म आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन कारवाई करावी व रेती माफियांच्या मनमानीला लगाम घालावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## मोफत रेती की सरकारी थट्टा : परवाने धूळ खात, लाभार्थी हेलपाटे मारत

### परवाने वाटले, जबाबदारी झटकली'; गरीबांच्या घरकुल स्वप्नांवर प्रशासनाची उदासीनता



आष्टी शहीद । जनमाध्यम

गरीब आणि गरजू कुटुंबांना घरकुल योजनेअंतर्गत घर बांधण्यासाठी मोफत रेती मिळावी, या उद्देशाने शासनाने मोठ्या गाजावाजात रेती परवाने मंजूर केले. मात्र प्रत्यक्षात हे परवाने लाभार्थ्यांच्या घरात धूळ खात पडले असून रेती मिळविण्याची प्रक्रिया, घाटाचे ठिकाण, वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक कार्यपद्धती याबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याने प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे.

महसूल विभागाने परवाने वाटून आपली जबाबदारी संपल्यासारखे वागल्याचा संतप्त आरोप आता लाभार्थ्यांकडून होत आहे. अनेकांना परवाने मिळाले, पण त्या परवान्यांचा उपयोग कसा करायचा याबाबत कुणीच मार्गदर्शन केले नाही. परिणामी गरीब नागरिक सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत, तर दुसरीकडे घरकुलांची कामे रखडत चालली आहेत.

विशेष म्हणजे, ज्यांच्या घरकुलाचे बांधकाम सुरू आहे अशा लाभार्थ्यांना बाजारभावाने रेती खरेदी करण्याची वेळ आली आहे. शासन मोफत रेती देत असल्याचा दावा करते, पण प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या खिशातून हजारो रुपये खर्च होत आहेत. त्यामुळे ही योजना केवळ कागदोपत्रीच असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे.

महसूल विभागाने गावागावांत विशेष शिबिरे घेऊन लाभार्थ्यांना सविस्तर माहिती देणे आवश्यक होते. रेती घाट, उपलब्धता, वाहतूक आणि परवाना वापरण्याची प्रक्रिया याबाबत स्पष्ट मार्गदर्शन झाले असते तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती. मात्र अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शासनाची चांगली योजना जनतेपर्यंत पोहोचण्याआधीच अडखळल्याचे चित्र आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, परवाना आहे, पण रेती कुठे आहे, असा प्रश्न अनेक लाभार्थी विचारत आहेत. काही गावांमध्ये परवाने मिळूनही एकाही लाभार्थ्याला प्रत्यक्ष रेती मिळालेली नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनशून्यतेमुळे गरीबांच्या घरकुलाचे स्वप्न पुन्हा एकदा धुळीस मिळण्याची भीती व्यक्त होत आहे.

**चौकशीची मागणी जोर धरतेय-** आतापर्यंत किती परवाने वितरित झाले? किती लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष रेती उचलली? किती परवाने आजही वापराविना पडून आहेत? याचा तपशील जाहीर करून संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

गरीबांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासन योजना आणते; पण त्याच योजनांची अंमलबजावणी करणारे अधिकारीच जर बेफिकीर असतील, तर लाभार्थ्यांनी न्याय मागायचा तरी कुणाकडे परवाने वाटले, पण माहिती दिली नाही; मग त्या परवान्यांचे करायचे तरी काय हा प्रश्न आता आष्टी तालुक्यातील प्रत्येक घरकुल लाभार्थ्याच्या ओठांवर आहे,

## आगीचा तडाखा अन् कुटुंबावर संकटाचा डोंगर

### डेली नीड्स दुकान जळून खाक; बहिणीच्या लग्नासाठी ठेवलेली ५० हजारांची रोकडही राख



**वडनेर जनमाध्यम :** वडनेर येथील संविधान चौक परिसरात रविवारी दुपारी अचानक लागलेल्या भीषण आगीत एका डेली नीड्स दुकानाचे संपूर्ण नुकसान झाले.

या आगीत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, बहिणीच्या लग्नासाठी साठवून ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकडही आगीत भस्मसात झाल्याने भोयर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संविधान चौकात हेमंत गजानन भोयर यांचे डेली नीड्सचे दुकान आहे. अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण केले. घरातील लग्नकार्याकरिता आणलेला गॅस सिलेंडर दुकानात ठेवण्यात आला होता. आगीच्या झळा सिलेंडरपर्यंत पोहोचताच मोठा स्फोट झाला आणि परिसरात एकच खळबळ उडाली. स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू गेला.

भीषण आगीत दुकानातील दोन फ्रीज, कुलर, कोल्ड्रिंक्सच्या बाटल्या, पाण्याच्या बॉटल्स तसेच इतर किरकोळ माल पूर्णपणे जळून खाक झाला. काही क्षणांत वर्षानुवर्षे कष्टाने उभा केलेला व्यवसाय राखेत परिवर्तित झाला.

हेमंत भोयर यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह याच दुकानावर अवलंबून आहे. त्यातच अवघ्या महिनाभरावर बहिणीचे लग्न आले असताना लग्नखर्चासाठी ठेवलेली ५० हजार रुपयांची नगद रक्कमही आगीत जळाल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने पंचनामा करून पीडित कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू आहे.

## विषाच्या व्यापाराला अभय कोणाचे? गुटखा माफियांवर मेहरबानी, गरिबांवर कारवाई

**सेलू जनमाध्यम :** राज्यात बंदी असलेल्या गुटखा आणि सुगंधी तंबाखूचा काळाबाजार दिवसेंदिवस फोफावत असताना अन्न व औषध प्रशासन (इऊँ) आणि स्थानिक यंत्रणांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गावागावांत, शहराशहरांत खुलेआम विक्री होणाऱ्या या विषारी मालाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष की जाणूनबुजून डोळेझाक, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

सुगंधी तंबाखूची मोठी गोदामे, घाऊक पुरवठादार आणि काळाबाजाराचे सूत्रधार आजही निर्धास्तपणे व्यवसाय करीत आहेत. मात्र कारवाईच्या नावाखाली हातावर पोट असलेल्या गरीब पानटपरी चालकांनाच लक्ष्य केले जात असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मोठ्या माशांना अभय आणि छोट्यांवर धाडी, असा प्रशासनाचा दुटप्पी कारभार उघडपणे चर्चिला जात आहे.

नागरिकांमध्ये अशीही चर्चा रंगू लागली आहे की, प्रतिबंधित तंबाखूच्या व्यापारातून काही अधिकारी आणि संबंधित घटकांकडून 'हप्ता संस्कृती' फोफावली आहे. त्यामुळेच मुख्य सूत्रधारांवर हात टाकण्याचे धाडस होत नसल्याचा आरोप केला जात आहे. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांना आमंत्रण देणारी सुगंधी तंबाखू शाळा-कॉलेज परिसरापासून ग्रामीण भागापर्यंत सहज उपलब्ध होत आहे. कायदा कडक असताना हा माल गावोगावी पोहोचतो तरी कसा, याचे उत्तर प्रशासनाकडे नाही.

कारवाईचा फक्त दिखावा की काळाबाजाराला संरक्षण हा प्रश्न आता जनतेच्या मनात घर करू लागला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण रॅकेटची चौकशी करून मोठ्या तस्करांना पाठीशी घालणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तरुणाईच्या भवितव्याशी खेळणारा हा विषाचा व्यापार आणखी बिनधास्तपणे सुरू राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ट्रम्प कोंडीत

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणविरोधी युद्ध मोहिमेला तिथल्या लोकप्रतिनिधी गृहाने (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज) पायबंद घातला. संसदेतील मतदानात ट्रम्प यांच्या युद्ध अधिकारांवर मर्यादा आणणारा प्रस्ताव मंजूर झाला आहे. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या चार सदस्यांनी बंडखोरी करत विरोधी डेमोक्रॅटस पक्षाच्या बाजूने कौल दिला. ट्रम्प प्रशासनाला मिळालेला हा सर्वांत मोठा धक्का आहे. हा निर्णय सध्या तरी केवळ प्रतीकात्मक स्वरूपाचा आहे. यापूर्वी सिनेटमध्येही अशाच प्रकारचा प्रयत्न झाला होता. राष्ट्राध्यक्षांना संविधानाने काही विशेष अधिकार दिलेत. त्यामुळे या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे कठीण असल्याचे व्हाईट हाऊसनेही म्हटले आहे, तरी अमेरिकेत होणाऱ्या मध्यावधी निवडणुका पाहता हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. सध्या अमेरिकेतील जनता परराष्ट्र धोरणापेक्षा देशांतर्गत मुद्द्यांवर अधिक लक्ष केंद्रित करत आहे. युद्धामुळे अमेरिकेची आर्थिक घडी विस्कटली असून, त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. त्यामुळेच ट्रम्प यांच्या युद्ध धोरणाविरोधात देशात नाराजीचे वातावरण आहे. या युद्धाचे कोणतेही स्पष्ट उद्दिष्ट नव्हते आणि ते संपवण्याचा कोणताही ठोस मार्ग सध्या प्रशासनाकडे नाही. इराणने 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'वर ताबा मिळवून जागतिक अर्थव्यवस्थेला हादरा दिला. युद्ध सुरू होण्यापूर्वी ही सामुद्रधुनी कधीही बंद झाली नव्हती; परंतु आता ती खुली करणे हेच अमेरिकेचे मुख्य युद्ध उद्दिष्ट बनले आहे. या संघर्षातून बाहेर पडण्यासाठी ट्रम्प प्रशासनाला कल्पकतेने वाटाघाटी कराव्या लागतील. कारण, इराणी नेते चतुरपणे राजकारण खेळत आहेत. वॉल स्ट्रीट जर्नल आणि आंतरराष्ट्रीय संरक्षण अभ्यासकांच्या अहवालानुसार, या छुप्या आणि थेट लष्करी संघर्षामुळे अमेरिकेच्या तिजोरीवर अभूतपूर्व ताण पडत आहे. पेन्टागॉनच्या आकडेवारीचा विचार करता सुरुवातीच्या काही महिन्यांच्या मोहिमेचा लष्करी खर्च २५ ते २९ अब्ज डॉलर्सवर गेला आहे. यात अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, विमानांचे इंधन, नौदलाची जहाजे आणि सैनिकांच्या सुरक्षेसाठीचा खर्च समाविष्ट आहे. हा खर्च एवढ्यावरच थांबत नाही, तर इराणने 'क्सिस ऑफ रेझिस्टन्स'च्या माध्यमातून सुरू ठेवलेल्या गनिमी काव्याच्या ड्रोन हल्ल्यांमुळे अमेरिकेला मध्यपूर्वेतील तळांवर सतत हाय अलर्ट ठेवावा लागत असून त्याचा दैनंदिन खर्च कोट्यवधी डॉलर्सच्या पार गेला आहे.युद्धाचा सर्वात मोठा फटका देशांतर्गत अमेरिकन नागरिकांना आणि जागतिक पुरवठा साखळीला बसत आहे. अमेरिकेत पेट्रोलचे दर विक्रमी प्रतिगॅलन ४.२३ डॉलर्सवर पोहोचलेत. वाढता जीवनमानाचा खर्च हा तिथे संवेदनशील मुद्दा बनला असून तब्बल ६४ टक्के मतदारांनी ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अमेरिकन ग्राहकांना तब्बल ४० अब्ज डॉलर्सचा अतिरिक्त देशांतर्गत इंधन बोजा सहन करावा लागला आहे. म्हणजेच प्रत्येक सामान्य कुटुंबाला मासिक बजेटमधून ३०० डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम केवळ वाढीव इंधनासाठी मोजावी लागते. आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचा विमा खर्च कमालीचा वाढला. यामुळे जागतिक बाजारपेठेचे थेट नुकसान १०० अब्ज डॉलर्सच्या पुढे गेले असून या वाढत्या महागाईमुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हला व्याजदरांचे नियंत्रण करणे कठीण जात आहे.या महाभयंकर आर्थिक विळख्यातून बाहेर पडण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर अत्यंत मर्यादित आणि गुंतागुंतीचे धोरणात्मक पर्याय उरले आहेत. ट्रम्प यांनी निवडणूक मोहिमेत न संपणारी युद्धे थांबवा आणि अमेरिकेला पुन्हा महान बनवा, अशी आश्वासने दिली होती. त्यामुळे पूर्ण स्वरूपाच्या युद्धात उतरणे त्यांच्या राजकीय प्रतिमेसाठी घातक ठरू शकते. म्हणूनच ते सध्या मर्यादित लष्करी प्रतिकाराचे धोरण अवलंबत असून खासगी संभाषणात त्यांनी अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाल्यासच तीव्र युद्ध छेडले जाईल, असा इशारा दिला आहे. ट्रम्प यांच्यासमोरील मुख्य मार्ग म्हणजे इराणसोबत एक मोठा सर्वसमावेशक करार करणे हाच आहे. यामध्ये होर्मूझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करणे आणि इराणचा अणू कार्यक्रम कायमचा थांबवणे या अटींचा समावेश असेल. तथापि, हा करार प्रत्यक्षात आणणे सोपे नाही. कारण, इराणने त्यांची गोठवलेली मालमत्ता मुक्त केल्याशिवाय आणि अमेरिकेने लादलेली आर्थिक नाकेबंदी उठवल्याशिवाय चर्चेच्या मेजावर येण्यास स्पष्ट नकार दिला आहे.या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी ट्रम्प प्रशासनाला ओमानसारख्या मध्यस्थ देशांच्या मदतीने पडद्यामागून राजनैतिक वाटाघाटी सुरू कराव्या लागतील. थेट लष्करी कारवाई ऐवजी टप्प्याटप्प्याने आर्थिक निर्बंध शिथिल करत इराणला अणू कराराच्या कक्षेत आणणे आणि त्याच वेळी इराणच्या तेल उत्पन्नावर मर्यादा घालणे हाच अमेरिकेला या प्रचंड महागड्या युद्धाच्या सापळ्यातून सुरक्षित बाहेर काढण्याचा एकमेव व्यवहार्य मार्ग ठरू शकतो. पारंपरिक आणि बिगर मॅगा रिपब्लिकन नेत्यांचा एक मोठा वर्ग ट्रम्प यांच्या विरोधात उभा आहे. अशा विचित्र कोंडीमध्ये अमेरिकन सत्ताधीश अडकले आहेत. युद्धादरम्यान ट्रम्प यांनी अनेक नाट्यप्रयोग जगाला दाखवले. भारतासंदर्भातील त्यांचे धोरण तर प्रचंड द्वेषमूलक राहिले आहे. भारतावर अतिरिक्त आयात शुल्क लावण्याची दिलेली नवी धमकी पूर्णपणे अतार्किक आणि तर्कहीन आहे. ते जूनच्या अखेरीस किंवा जुलैच्या सुरुवातीला डझनभर व्यापारी भागीदार देशांवर नवीन शुल्क लादण्याचा प्रयत्न करत आहेत.इराण युद्ध किंवा टॅरिफचा निर्णय ट्रम्प यांचे एकंदरीत धोरण आणि कार्यपद्धती यांविषयी भारतासह अमेरिकेत वाढत चाललेल्या नाराजीचे परिणाम त्यांना नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांमध्ये दिसून येणार आहेत. एका मुलाखतीत ट्रम्प यांनी मी सध्या अमेरिकनांच्या आर्थिक स्थितीचा विचार करत नाही, असे विधान केले होते. युद्ध थांबवण्यासाठी आणि इंधन दर कमी करण्यासाठी शांतता करार करण्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी दिलेले हे उत्तर मतदारांना प्रचंड खटकले. देशातील नागरिकांच्या त्रासापेक्षा ट्रम्प स्वतःच्या लष्करी हट्टाला जास्त महत्त्व देत आहेत, अशी भावना यामुळे सामान्य जनतेमध्ये निर्माण झाली. ट्रम्प यांच्या लोकप्रियतेत सातत्याने घट होत असल्याचे चित्र विविध सर्वेक्षणांमधून समोर आले आहे. त्यांच्या लोकप्रियतेचा आलेख सर्वात खालच्या पातळीवर म्हणजेच ३५ टक्क्यांवर घसरला आहे. त्यामुळे इराण युद्धातून मार्ग काढण्यासाठी ट्रम्प कसा पुढाकार घेतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# इंधन-विवेक क्रिया पालटावी...

**इंधन-ऊर्जेबाबत आत्मनिर्भर होण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न करण्याची गरज आहे. परंतु त्याचवेळी इंधनाचा वापरही कार्यक्षमरीत्या होण्याची गरज आहे. इंधनाबाबत पूर्णतः स्वावलंबी होणे अशक्य असले, तरीदेखील आयातीवरील विसंबन कमीत कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. एकूणच आपल्याला गरज आहे ती इंधन विवेकाची.**




सध्याच्या संकटसमयी कुणी काटकसर करायला तयार नाही. युक्रेन, गाझापट्टी आणि नंतर पश्चिम आशियातील युद्ध... अशी चोहीकडे संकटेच संकटे आहेत. अमेरिका-इराणमधील धुमसत्या शस्त्रसंधीचा गेल्या बुधवारी पुन्हा एकदा भंग होऊन त्यामुळे तेलाचे भाव आणखी दोन टक्क्यांनी भडकले आहेत. जागतिक इंधनसंकट अधिकच गंभीर बनले आहे, मे महिन्यात पेट्रोल व डिझेलच्या दरात चौथ्यांदा वाढ करण्यात आली असली, तरी भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल व हिंदुस्तान पेट्रोलियम या तीन प्रमुख सरकारी कंपन्यांना आजही दररोज ५५० कोटी रुपयांचा तोटा सोसावा लागत आहे. यापूर्वी झालेल्या दरवाढीसह आणखी १२ रुपये प्रतिलिटरपर्यंत दर वाढवल्यास, तेल कंपन्यांना इंधन विक्रीत किमान ना नफा, ना तोटा स्तर गाठता येईल, असा दावा केला जात आहे. गेल्या तीन महिन्यांत कच्च्या तेलाचे दर ५० टक्क्यांहून जास्त वाढले आहेत. म्हणजे पाच राज्यांतील निवडणुका होण्याच्या आधीपासूनदेखील पेट्रोल-डिझेलचे दर टप्प्याटप्प्याने वाढवण्यास वाव होता. तेल कंपन्यांना दर ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे, असे यूपीएप्रमाणेच एनडीए सरकारही म्हणत असते. परंतु प्रत्यक्षात तसे ते नाही। केंद्राने मार्चअखेरीस पेट्रोल-डिझेलवरील उत्पादनशुल्कात प्रतिलिटर दहा रुपयांची कपात केली. इंधन निर्मितीवर विंडफॉल कर पुन्हा लागू केला. या दोन्ही इंधनांच्या किमती नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात आले आहे. मात्र त्यानंतरच्या दोन महिन्यांत जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या तेजीमुळे सरकारी कंपन्यांचा तोटा वाढतच चाललेला आहे.

सततचा दुष्काळ, प्रचंड गरिबी, शेतीवरील माणसांचा मोठा भार आणि बेरोजगारांचेच वाढते सैन्य अशा अत्यंत प्रतिकूल काळात, १९७३-७४ मध्ये जगावर असेच तेलसंकट कोसळले होते. त्यावेळी अरब-इस्रायल संघर्ष भडकलेला असल्यामुळे तेलसमृद्ध अरब राष्ट्रांनी पाश्चात्य देशांचा तेलपुरवठा रोखला होता. संघटितरीत्या कच्च्या तेलाचे दर चौपटीने वाढवले. याचा गॅसपुरवठ्यावरही परिणाम होऊन, घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी दोन-दोन, तीन-तीन आठवडे लागू लागले. अमेरिका व पाश्चात्त्य देशांनी इस्रायलला लष्करी व आर्थिक मदत केली. त्यामुळे इस्रायलच्या समर्थक देशांवर अरब तेलउत्पादक देशांनी 'एम्बार्गो' लागू केला. तेल उत्पादनही घटवले. त्यामुळे कच्चे तेल बॅरलला ३ डॉलर होते, ते १२ डॉलरवर जाऊन पोहोचले. भारतासह जगभरातील भाववाढ ३०० टक्क्यांनी वाढली. अशावेळी भारताने रशियन संशोधकांच्या सहकार्याने मुंबई हायमध्ये शोधकार्य हाती घेऊन तेलविहिरी खोदल्या. ओएनजीसीने 'सागरसम्राट' या ड्रिलशिपद्वारे मुंबई हाय क्षेत्राचा विकास केला. यथावकाश या क्षेत्रातील तेलविहिरींची संख्या ८,५०० झाली. नैसर्गिक वायूच्या ३३ विहिरी खणण्यात आल्या. देशाच्या खनिज तेलाच्या एकूण गरजेपैकी १४ टक्के गरज मुंबई हायमुळे पूर्ण झाली. एस्सी, काल्टेक्स व बर्माशेल या विदेशी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करून, एचपीसीएल व बीपीसीएल या कंपन्यांची स्थापना करण्यात आली.मुंबई हायमधील खनिज तेलाच्या शुद्धीकरणाचे काम सरकारी कंपन्यांमार्फत होऊ लागले. याला अर्थातच तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. आज मात्र या गोष्टीचा अभाव जाणवतो.

जगातील शंभरावर देशांनी ऊर्जावापराच्या संदर्भातील आपली धोरणे बदलली असून, काही देशांत इंधन वापरावर निर्बंध आणण्यात आले आहेत. भारत आपली तेलाची निकड बव्हंशी आयातीतून भागवतो. २०-२२ टक्के तेल व वायू होर्मुझमार्गे येते. तो पुरवठा आता बाधित झाला आहे. भारताची विद्यमान तेल साठवणूक क्षमता ३ कोटी ८० लाख बॅरल्स इतकी असून, आता त्यात आणखी ३ कोटी बॅरल्सची भर पडणार आहे. मात्र अमेरिकेची साठवणूक क्षमता ४३ कोटी बॅरल्स, तर जपानची २६ कोटी बॅरल्स आणि चीनची १०४ कोटी बॅरल्स इतकी क्षमता आहे. तेल साठवणुकीकडे आपण दीर्घकाळ दुर्लक्ष केले. भारताला रोज ५० लाख बॅरल्स तेलाची गरज भासते. ज्यावर अवघी अर्थव्यवस्था अवलंबून आहे, त्या तेलाची अशी उपेक्षा करणे आपल्याला फार महागात पडलेले आहे. तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या भारताकडे सध्याच्या पाचपटीने तरी तेल साठवणूक क्षमता असायला हवी.

सन २०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर त्यांनी २०२२ पर्यंत इंधन आयात किमान १० टक्क्यांनी आणि २०३० पर्यंत २७ टक्क्यांनी घटवण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. याचा अर्थ, तेल क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून नवीन तेल क्षेत्रे खोदण्याचे काम जोरकसपणे हाती घेतले जाणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात तसे काहीही झाले नाही. तेल आयात ७७ टक्क्यांवरून ८८ टक्क्यांपर्यंत वाढलीच. उज्ज्वला गॅस योजना महिलांसाठी उपयुक्त व धूर कमी करणारी, हे खरेच. परंतु देशाला लागणारा बहुतांश घरगुती गॅस आपण बाहेरून आणत आहोत. निम्माअधिक पाइप गॅस हा आयात केला जातो. अर्थातच पश्चिम आशिया पेटल्यामुळे भारताने इंधन पुरवठ्यासाठी नवनवीन देशांमधील पुरवठास्रोत 'टॅप' केले आहेत, हे योग्यच.

व्हेनेझुएला हा जगातील सर्वांत मोठा प्रमाणित कच्च्या तेलाचा साठा असलेला देश आहे. आत्तापर्यंत भारताने व्हेनेझुएलाकडून ४ लाख २७ हजार बॅरल तेल खरेदी केले आहे. त्या देशाच्या हंगामी राष्ट्रपती डोल्सा रॉड्रिग्ज यांच्या भारत दौऱ्यानंतर तेथून तेलपुरवठा वाढण्याचीच शक्यता आहे. अमेरिकेनंतर भारत हा व्हेनेझुएलाचा सर्वांत मोठा ग्राहक झाला असन, रिलायन्स इंडस्टीजनेही तेथन तेलखरेदी कच्च्या तेलाच्या चढ्या भावांमुळे पेट्रोल डिझेलचा वापर कमी करण्याचे धोरण योग्य ठरते. त्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचे जाळे विस्तारणे आणि मेट्रो प्रवासाचे दर कमी करणे, त्याचप्रमाणे कार्सवर कर वाढवणे हे उपाय गरजेचे आहेत. महिनाभरापूर्वी केंद्र सरकारने ८५ टक्क्यांवरून १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या कारनिर्मितीस प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले. यामुळे पेट्रोल-डिझेलचा वापर कमी होईल. परंतु याबाबतची सरकारची धोरणे स्थिर नसतात. ती अचानकपणे बदलल्यास त्याचा फटका बसतो. साखरेची महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकार वेळोवेळी उसाचा रस किंवा बी-हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल बनवण्यावर तात्पुरते निर्बंध आणते. त्यामुळे साखर कारखान्यांचे नियोजन कोलमडते. त्याचप्रमाणे इथेनॉल प्रकल्पासाठी ४०-५० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. परंतु सार्वजनिक तेल कंपन्यांकडून 'साखर'वाल्यांकडून कमी इथेनॉल घेतले गेले. त्यांनी प्राधान्य दिले ते भात, मका यापासून तयार झालेल्या इथेनॉलला. तसेच इथेनॉल खरेदीचे पैसे वेळेवर न मिळाल्यामुळे साखर कारखानदार अडचणीतही आले. आता साखर कारखानदारांनी स्वतःच इथेनॉल पंप सुरू करावेत, अशी सूचना केंद्रीय रस्तेमंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. ८० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल होणार आहेत. पण यापुढे तरी सरकारने आपल्या धोरणात वारंवार बदल करू नयेत, ही अपेक्षा आहे.

जगभरात वाढते प्रदूषण आणि जीवाश्म इंधनाचे घटणारे साठे यामुळे पेट्रोल-डिझेलला पर्यायी धनाचा विचार केला जात आहे. इलेक्ट्रिक कार, बस व दुचाकींचा वापर वाढला आहे. दिल्ली-एनसीआरमधील वायुप्रदूषणाची समस्या सोडवण्यासाठी नोंदणीकृत असलेले जुने ट्रक आणि बसेस रस्त्यावरून हटवण्याच्या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. 'भारत स्टेज ४' किंवा त्याहून जुन्या गाड्या स्क्रॅप करून वा दिल्लीबाहेर विकून, त्याऐवजी इलेक्ट्रिक वाहने खरेदी केल्यास, करसवलतींसह आर्थिक प्रोत्साहन देण्याची ९५८५ कोटी रुपयांची ही योजना आहे. त्यात ५०४१ कोटी रुपयांचा भार केंद्र उचलणार आहे. उर्वरित वाटा दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा ही राज्य सरकारे उचलतील. ईव्हीजचा वापर वाढवण्यासाठी 'पीएम ई ड्रायव्हर' सारख्या योजना आहेत. ई स्कूटर, ई कार, ई बस खरेदीवर अनुदान दिले जाते. अनेक राज्य सरकारे रस्ते कर व नोंदणीशुल्कात १०० टक्क्यांची सूट देतात. महाराष्ट्रात गाडीच्या बॅटरी क्षमतेनुसार अतिरिक्त अनुदान मिळते. मात्र ईव्हीसाठी चार्जिंग पायाभूत सुविधांवर भर देण्याची आवश्यकता आहे. दुसरे पर्यायी इंधन म्हणजे हायड्रोजन इंधन. हायड्रोजन फ्युएल्स सेल तंत्रज्ञानाद्वारे वाहनांना ऊर्जा मिळते. या प्रक्रियेत केवळ पाण्याची वाफ तयार होते व प्रदूषण निर्माण होत नाही. अनेक बड्या कंपन्या हायड्रोजन कार विकसित करत आहेत, सीएनजी व बायोगॅस हेदेखील तुलनेने स्वच्छ इंधन मानले जाते. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांवरही सध्या शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत.

मुळातच भारतात इंधन-ऊर्जा या विषयाबद्दल जाणीवजागृती निर्माण होणे गरजेचे आहे. केंद्र सरकारमधील एखाद्या ज्येष्ठ मंत्र्याकडे ऊर्जामंत्रालय सोपवून, त्याअंतर्गत, रिन्युएबल पॉवर, कोळसा आणि पेट्रोलियम ही सर्व खाती आणावीत. तसेच इंधनबचतीबद्दलचे प्रबोधन शालेय स्तरापासून केले जावे. गाड्या उडवणे व इंधनाची उधळपट्टी करणे हा सामाजिक बेजबाबदारपणा आहे, हे तरुण पिढीच्या मनावर बिंबवले गेले पाहिजे.

सन २०१३-१४ ते २०२३-२४ या कालावधीत भारताचा दरडोई वीजउपभोग ४६ टक्क्यांनी वाढला आहे. येत्या २० वर्षांत भारतातील सरासरी उत्पन्न चौपटीने वाढेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजेच व्यापार-उद्योग वाढेल. परंतु त्यासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागणार आहे. एकूण विजेतील औष्णिक विजेचेच प्रमाण ७९ टक्के असून, या विजेसाठी अर्थातच कोळसा लागतो. मात्र भारतातील आयात केल्या जाणाऱ्या कोळशाचे प्रमाण जास्त (२३ टक्के) असल्याची कबुली केंद्र सरकारनेच दिली आहे. दशकभरापूर्वी भारत ४० टक्के नैसर्गिक वायू आयात करत होता. त्याचे प्रमाण आता ५० टक्क्यांवर गेले आहे. तर याच काळातील कच्च्या तेलाच्या आयातीचे प्रमाण ८५ वरून ९० टक्क्यांवर गेले आहे. वास्तविक जगातील चौथ्या क्रमांकाची रिन्युएबल एनर्जीची क्षमता भारतात आहे. पवनऊर्जेत आपण चौथ्या आणि सौर ऊर्जेबाबत जगात तिसऱ्या स्थानी आहोत. इंधन-ऊर्जेबाबत आत्मनिर्भर होण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न करण्याची गरज आहे. परंतु त्याचवेळी इंधनाचा वापरही कार्यक्षमरीत्या होण्याची गरज आहे. तसेच परदेशांतून नैसर्गिक वायू आणून त्यावर स्वयंपाक करण्याऐवजी हे काम आपण विजेवरच करू शकू का, याचाही विचार झाला पाहिजे. इंधनाबाबत पूर्णतः स्वावलंबी होणे अशक्य असले, तरीदेखील आयातीवरील विसंबन कमीत कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. इंधन ही आपली राष्ट्रीय संपत्ती असून, तिचे जतनसंवर्धन आणि वापर सर्वांनीच तोलूनमापून करायला हवा. हा इंधनविवेक आपण मानसी धरायला हवा. (साभार म.टा.संवाद)

**हेमंत देसाई**

## सोयाबीन 'डीओसी' शिवाय आयात केले जाईल?

**मा.नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार**
**मा.श्री शिवराज सिंह चौहान, कृषी मंत्री, भारत सरकार**
**मा.श्री पियुष गोयल, भारताचे वाणिज्य मंत्री, भारत सरकार**

**विषय-** जर १५ लाख टन सोया मिल (सोयाबीन डीओसी) आयात केली गेली तर शेतकऱ्याला २०२६-२०२७ चे पीक किमान आधारभूत किंमतीपेक्षा (५७०८ हजार) कमी किमतीत विकावे लागेल.

**नमस्कार,**

तुम्ही वारंवार सांगितले आहे की,सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (MSP) होती, आहे आणि राहील. परंतु या २०२५-२०२६ साली शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा,गहू, ज्वारी, मका यांसारखी सर्व पिके किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने विकण्यास भाग पडत आहे.

अमेरिका-इराण युद्धामुळे आणि आता कच्च्या तेलाचे भाव पुन्हा वाढल्याने बाजारात तेजी आली होता. कापसाचे भाव ७०००-७५०० रुपयांवरून ९५०० रुपयांपर्यंत वाढले होते. ते आता ८२००-८५०० रुपयांपर्यंत खाली आले आहेत. सोयाबीनचे भावही ४०००-४५०० रुपयांवरून ७०००-७५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत वाढले होते. आपले सोयाबीन जीएम नाही, त्यामुळे आपल्या देशाच्या डीओसीला जागतिक बाजारात जास्त भाव मिळत असे.पण आता हेही थांबले आहे. कारण आपण कडधान्यांची आयात सुरू केली आहे.

यावर्षी, जेव्हा देशातील कुक्कुटपालन उद्योगाला प्रति टन ३५,००० ते ४०,००० रुपये सोयाबीन ढेप (डीओसी) मिळत होता आणि देशातील सोयाबीन उत्पादक शेतकरी प्रति टन ५,३२८ रुपये या किमान आधारभूत किमतीपेक्षा (एमएसपी) कमी दराने सोयाबीन विकत होता तेव्हा त्यांना चिंता नव्हती. आता डीओसीची किंमत प्रति टन ६०,००० ते ६५,००० रुपयांवर पोहोचली आहे. त्यामुळे त्यांनी भारत सरकारकडे १५ लाख टन सोयाबीन ढेप (डीओसी) आयात करण्याची मागणी केली आहे. आज भारत सरकारला ही मागणी मान्य करावीच लागेल, अन्यथा आयात केलेला डीओसी त्यांच्याकडून भारतात प्रति टन ५०,००० रुपये दराने येईल. भारत सरकारने २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रति क्विंटल ५७०८ रुपये निश्चित केली आहे. बाजारात सोयाबीनचे भाव खाद्यतेलाच्या किमतीपेक्षा सोयाबीन ढेपीच्या किमतीवर अधिक आधारित आहेत. जेव्हा नवीन पीक तयार होईल आणि सोयाबीनची किंमत प्रति क्विंटल सुमारे ५००० रुपये राहील, तेव्हा शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन ५७०८ रुपयांच्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दरात विकण्यास भाग पडेल. याचे परिणाम स्पष्ट आहेत. अर्थशास्त्रात खोलवर जाण्याची गरज नाही. एक क्विंटल सोयाबीनमधून ८० किलो डीओसी आणि १७ किलो खाद्यतेल मिळते. ५० किलो DOC च्या दराने ८० किलोची किंमत ४००० रुपये आहे आणि १३० किलो तेलाच्या दराने, १७ किलोची किंमत २२०० रुपये आहे. एकूण ६२०० रुपये होतात. प्रक्रिया, विपणन, नफा आणि वाहतूक खर्च विचारात घेतल्यानंतर, शेतकऱ्याला सोयाबीनसाठी ५,००० रुपये सुद्धा मिळणार नाहीत. तुम्ही डॉलर वाचवण्याबद्दल बोलत आहात. सोया डीओसी शिवाय आयात केले जाईल का? ही आयात थांबवावी अशी तुम्हाला विनंती आहे. धन्यवाद.

**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मोबाईल: ०९४२१७२७९९८

## मूर्तींवर रासायनिक लेपन नको !

समस्त महाराष्ट्राचे आराध्यस्थान असलेल्या पंढरपूरच्या पांडुरंगाची महापूजा सध्या बंद करण्यात आली आहे. मूर्तीची वारंवार झीज होत असल्याने ही महापूजा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. आतापर्यंत मूर्तीवर तीन वेळा रासायनिक प्रक्रिया करून ही झीज थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता मात्र रासायनिक लेपन तकलादू असल्याने त्यातून मूर्तीची हानीच होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता यापुढे विठ्ठलाच्या मूर्तीवर रासायनिक लेपन करण्यात येऊ नये अशी ठाम भूमिका वारकरी संप्रदायातील प्रमुख मंडळींनी जिल्हाधिकाऱ्यान्सोबत झालेल्या बैठकीत घेतली. मूर्तीचे जतन-संवर्धन करण्यासाठी वारकरी संप्रदायाची एक समिती स्थापन करावी, ज्याद्वारे देशभरातील तज्ञ मूर्ती अभ्यासक निमंत्रित करावेत. मूर्तीलेपनतज्ञांची मते जाणून घेऊन नंतरच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी त्या बैठकीत करण्यात आली. मूर्तीवर रासायनिक लेपन केल्यामुळे मूर्तीची हानी तर होतेच शिवाय भगवंताच्या मूर्तीवर रासायनिक लेपन करणे हे धर्मशास्त्रविसंगत असल्याचे मत हिंदू धर्मातील जाणकारांनी व्यक्त केले आहे. रासायनिक लेपन करून वरवरची उपायोजना करण्याचा सरकारचा प्रयत्न निष्फळ असून या धर्मविसंगत कृतीमुळे मूर्तीवर विपरीत परिणाम शकतो असेही त्यांनी सांगितले आहे. कोल्हापूर येतील श्री महालक्ष्मीदेवीच्या मूर्तीची रासायनिक लेपन प्रक्रियांमुळे कशा प्रकारे हानी होत आहे हेही यावेळी पटवून देण्यात आले.शेकडो वर्षांपासून नियमित अभिषेक आणि पूजा होत असलेली अनेक मंदिरे महाराष्ट्रात आहेत. त्यांतील पुरातन मुर्त्यांची झीज होत असल्याचे जेव्हा जेव्हा निदर्शनास येते तेव्हा सरकारकाकडून केवळ रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचे उपाय योजले जातात.

**मोक्षदा घाणेकर**

जनमाध्यम संवाद

## संकटात ......एक दिलासा

सध्या जगात इराण व अमेरिका यांच्या मधील युद्धामुळे तेल संकट तीव्र झाले आहे.जगभर तेलाचे भाव तर वाढले आहेत याशिवाय महागाईचा डोंब उठला आहे. आपल्या भारतातही परिस्थिती काही वेगळी नाही. प. बंगाल व तामिळनाडू आदी राज्यातील निवडणुका संपताच सरकारने इंधनाचे दर वाढविले. इंधनाचे दर वाढविताच इतर अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले. मुलांच्या शैक्षणिक साहित्य,गणवेश इत्यादींवर मोठी भाववाढ झाली आहे.याचा फायदा अनेकांनी घेतला आहे. हे सारे चालू असतानाच एक दिलासादायक बातमी हाती आली आहे. अंदमान बेटाच्या पूर्वेला १५ किलोमीटरवर खोल समुद्रात नैसगिर्क वायूचे मोठे साठे ऑइल इंडिया लिमिटेड या सरकारी तेल कंपनीला सापडले आहेत या अस्तिरतेच्या काळात ऊर्जा सुरक्षा बळकट होण्याची शक्यता आहे अंदमान बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर विजयपूरम ३ विहरीत खोल समुद्रात २५५ मीटरवर हे नैसर्गिक वायूचे साठे सापडले आहेत. याला केंद्राचे पेट्रोलियम खात्याचे मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी पुष्टी दिली आहे. सध्याच्या संकट काळात ही मोठी दिलासादायक बातमी आहे.

**शांताराम वाघ**

सोमवार, दि. ८ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# तिरंग्याला रामराम, साहेबराव कांबळेंच्या हाती भगवा झेंडा

## काँग्रेसला निरोप घेत शेकडो समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ७ : यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतून माघार घेतलेले काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी रविवारी मुंबई येथे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत "तिरंग्याला रामराम करून साहेबराव कांबळे यांनी हाती भगवा झेंडा घेत शिवसेना (शिंदे गट) मध्ये अधिकृत प्रवेश केला.**



यावेळी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. या प्रवेशामुळे उमरखेड-महागाव परिसरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, काँग्रेसच्या उमेदवारीवर निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविल्यानंतर अचानक माघार घेतल्याने जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले होते. त्यांच्या माघारीनंतर शिवसेनेचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांची विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाली. यावेळी उमरखेड महिला काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्ष सूर्यकांता दिंडाळकर, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल वानखेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव गायकवाड, विद्यानंद नरवाडे, कैलास घुगरे, नामदेव शिंगणकर, संतोष चव्हाण, ज्ञानेश्वर बोके, विमल शिंगणकर, दीपक केंद्रेकर यांच्यासह शंभराहून अधिक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश सोहळ्यास पालकमंत्री संजय राठोड, विधान परिषद सदस्य दुष्यंत चतुर्वेदी, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, चितांगराव कदम, डॉ. बी. एन. चव्हाण, प्रवीण पाटील मीरासे, राजू राठोड, मनोज नाल्हे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# नगरपरिषदेच्या जागेवर बेकायदेशीर पक्के बांधकाम..!

## नोटीस धाब्यावर, बुलडोझर कारवाईची नागरिकांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. ७ :** शहरातील अतिक्रमणांवर कारवाईसाठी बुलडोझर चालविणाऱ्या नगरपरिषद प्रशासनासमोर आता दत्त चौक, अमराईपुरा परिसरातील नगरपरिषदेच्या जागेवरील बेकायदेशीर पक्क्या बांधकामाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेवर एका व्यापाऱ्याने गोडाऊन उभारण्यासाठी नियमांना हरताळ फासत पक्के बांधकाम सुरू केल्याचा आरोप स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी केला आहे. सदर ठिकाणी नगरपरिषदेचे मोठे विसर्जन टाके असून गणेशोत्सव, दुर्गादेवी व शारदा देवी उत्सवादरम्यान शेकडो मूर्तींचे विसर्जन याच ठिकाणी



केले जाते. असे असतानाही टाक्यालगतच्या मोकळ्या जागेवर विटा, रेती व सिमेंटचा वापर करून बांधकाम सुरू करण्यात आले आहे. या बांधकामामुळे परिसरातील व्यापारी गाळ्यांच्या भिंतींना धोका निर्माण झाला असून बांधकामासाठी वापरले जाणारे पाणी शेजारील दुकाने व घरांमध्ये शिरत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे. या प्रकरणी स्व. पी. एल. शिरसाट प्रणित ग्रामीण पत्रकार संघ, सामाजिक कार्यकर्ते, भाजप शहर उपाध्यक्ष करण सोळंकी तसेच स्थानिक व्यापाऱ्यांनी नगरपरिषदेकडे लेखी तक्रार दाखल केली. नगरसेवक योगेश भावे यांच्या पाठपुराव्यानंतर नगरपरिषद प्रशासनाने संबंधितांना नोटीस बजावली. मात्र नोटीस स्वीकारण्यास नकार देण्यात आल्याने ती बांधकामाच्या भिंतीवर चिटकविण्यात आली. दरम्यान, शहरातील इतर भागांतील अतिक्रमणांवर कारवाई होत असताना दत्त चौक परिसरातील हे बांधकाम आणि सर्व्हिस गल्लीवरील इतर व्यावसायिक अतिक्रमणांवरही समान निकषाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला असून नगरपरिषद प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुदर्शननगरातील गुटखा रॅकेटला संरक्षण कोणाचे ?

## पोलीस व अन्न-औषध प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ७ :** शहरालगतच्या गायमुखनगर ग्रामपंचायतीअंतर्गत सुदर्शननगर परिसरात अवैध गुटखा व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. राज्यात गुटखाबंदी लागू असतानाही या भागातून लाखो रुपयांचा गुटखा साठा तालुक्यासह आसपासच्या भागात पुरविला जात असल्याची चर्चा आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही विक्रेते किरकोळ विक्रीपुरते मर्यादित न राहता घाऊक पुरवठादार बनले असून पुसदसह महागाव, उमरखेड आणि दिग्रस तालुक्यात गुटखा पोहोचविण्याचे जाळे उभारले आहे. चारचाकी वाहनांद्वारे पानटपऱ्या, किराणा दुकाने आणि



इतर विक्रेत्यांपर्यंत माल पोहोचविला जात असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा असतानाही वसंतनगर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित यंत्रणा या प्रकाराबाबत अनभिज्ञ आहेत की जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. गुटखा वाहतुकीसाठी वापरली जाणारी वाहने वारंवार बदलली जात असल्याचीही माहिती समोर येत आहे. त्यामुळे पुरावे मिळणे कठीण होत असल्याचे बोलले जात असले तरी, प्रशासनाने प्रभावी गुप्त माहिती संकलन करून या अवैध साखळीचा पर्दाफाश करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सुदर्शननगरातील कथित गुटखा रॅकेटवर संबंधित विभागांनी संयुक्त कारवाई करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अवैध दारू व्यवसायावर बाभुळगाव पोलिसांचा घणाघात..!

## तीन अड्डे उद्ध्वस्त, १.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. ७ :** तालुक्यात सुरू असलेल्या अवैध दारू व्यवसायाविरोधात बाभुळगाव पोलिसांनी मोठी मोहीम राबवत डेहणी, वाटखेड खुर्द आणि प्रतापपूर (नांदुरा) येथे धडक कारवाई केली. तीन ठिकाणी टाकलेल्या छाप्यांमध्ये तब्बल १,९०० लिटर मोहासडवा, १८० लिटर गावठी हातभट्टी दारू तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले.

या कारवाईत एकूण १ लाख १७ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पाच आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ठाणेदार दीपमाला भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार



करून बुधवारी ही कारवाई करण्यात आली. डेहणी येथे ८५० लिटर मोहासडवा, ८० लिटर गावठी दारू आणि इतर साहित्य असा ५२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात सुखशाम लक्ष्मण मेश्राम, संदेश वसनिक आणि प्रमोद रामटेके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. वाटखेड खुर्द परिसरातील नाल्यावर सुरू असलेला हातभट्टी अड्डा उद्ध्वस्त करत पोलिसांनी ८५० लिटर मोहासडवा व ७० लिटर गावठी दारूसह ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात अरुण नामदेव परिसे याच्यावर कारवाई करण्यात आली. तर प्रतापपूर येथील बेंबळा नदीकाठी सुरू असलेल्या दारू गाळण्याच्या ठिकाणी छापा टाकून २०० लिटर मोहासडवा, ३० लिटर गावठी दारू व साहित्य असा १४ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणात विशाल सुभाष गुबरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक दीपक आसरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्की जाधव तसेच पोलीस कर्मचारी निलेश भुसे, निखिल खळतकर, मंगेश कळसकर आणि विजय मोढोंकार यांनी सहभाग घेतला.

# एन. बी. फाउंडेशन च्या वतीने शेतकऱ्यांना चार्जिंग बॅटरी वाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ७ :** शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत एन. बी. फाउंडेशन (नितीन भुतडा फाउंडेशन) व सुरभी अग्रोटेक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू शेतकऱ्यांना मोफत चार्जिंग बॅटरीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत उमरखेड व महागाव तालुक्यातील ६० गावांमधून प्रत्येकी १०० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

मरसुळ येथे आयोजित कार्यक्रमात उमरखेड मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते बॅटरीचे वितरण करण्यात आले. शेतात ये-जा करताना अंधारामुळे सर्पदंशासह विविध अपघातांचा धोका निर्माण होतो. ही गरज लक्षात



घेऊन समाजसेवक शेवंतराव गायकवाड यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला सरपंच मनोज कुबडे, उपसरपंच प्रसाद धोंगडे, पोलीस पाटील उत्तमराव बनसोड, तंटामुक्ती समिती अध्यक्ष बंडू पाटील कदम यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. फाउंडेशनचे सागर बडे, श्रावण जळके, रामदास काळे, किशोर यादव, योगेश गोपाळ व बालाजी जळके यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# श्री रंगनाथ स्वामी पतसंस्थे कडून गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव..




✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. ७ :** सहकार क्षेत्रातील अग्रगण्य श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. वणी यांच्या वतीने इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष ॲड. देवीदास काळे होते. यावेळी उपाध्यक्ष विवेकानंद मांडवकर तसेच संचालक सुरेश बरडे, लिंगारेड्डी अंडेलवार व रमेश भोंगळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. काळे यांनी शिक्षणासोबत चारित्र्य, संस्कार आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित केले. चुकीच्या मार्गापासून दूर राहून उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. समारंभात १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणारा हा उपक्रम वणी शहरात सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.

# सहकार क्षेत्रातील जितेश नावडे शिवसेनेत..!

## शेकडो समर्थकांसह धनुष्यबाण हाती



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ७ :** सहकार क्षेत्रातील युवा उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते जितेश नावडे यांनी शेकडो समर्थकांसह शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. आगामी जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

यापूर्वी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सहकार आघाडीत सक्रिय असलेल्या नावडे यांचा ग्रामीण भागात मोठा जनसंपर्क असून तरुणांमध्येही त्यांचा प्रभाव मानला जातो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड तसेच शिवसेना विदर्भ पश्चिम सहसंपर्क प्रमुख पराग पिंगळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी राजमोहन गिरी यांनीही आपल्या समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला. कार्यक्रमाला जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, संजय हातगावकर, हरिहर लिंगनवार, संजय रंगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नावडे यांच्या प्रवेशामुळे सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेकडे ओढा वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# दरोडेखोर जेरबंद..! व्यापाऱ्यावर हल्ला करून लुटलेली रक्कम हस्तगत

## वडगाव जंगल पोलिसांची धडाकेबाज कारवाई ७ आरोपी अटकेत..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ७ :** अकोला बाजार येथील किराणा व्यापाऱ्यावर जीवघेणा हल्ला करून रोख रक्कम लुटणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीचा यवतमाळ पोलिसांनी अवघ्या २४ तासांत पर्दाफाश केला.

या प्रकरणात ७ आरोपींना अटक करण्यात आली असून लुटीची रक्कम व गुन्ह्यात वापरलेली वाहने असा एकूण ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ५ जून रोजी रात्री अकोला बाजार



येथील व्यापारी सैय्यद ईजाज मुसा हे दुकान बंद करून ५५ हजार रुपयांची रोकड घेऊन घरी जात असताना बोरीसिंह शिवारात चार अज्ञात आरोपींनी त्यांचा पाठलाग केला. अंधाराचा फायदा घेत आरोपींनी लोखंडी रॉडने हल्ला करून त्यांना जखमी केले व रोकड लुटून पसार झाले.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार विशेष पथके तयार करण्यात आली. तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे प्रथम एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदारांसह दरोडा टाकल्याची कबुली दिल्यानंतर उर्वरित आरोपींनाही दारव्हा परिसरातून अटक करण्यात आली. या धडाकेबाज कारवाईमुळे गंभीर गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून जिल्हा पोलीस दलाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुसदच्या इटावा परिसरात जुगार आणि वरळी मटक्याचा सुळसुळाट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ७ :** शहरातील इटावा परिसरातील दिग्रस रोड व लक्झरी स्टॅन्डजवळील भागात वरळी मटका आणि जुगाराचा धंदा खुलेआम सुरू आहे. नदीकाठच्या पिंपळाच्या झाडाखाली आणि टिनच्या शेडमध्ये दररोज हजारो रुपयांची उलाढाल होत असून, यामुळे सर्वसामान्य मजूर व शेतकरी वर्गाची आर्थिक लूट होत आहे. या अवैध धंद्यांना स्थानिक बिट जमादार संजय जाधव यांचे अभय असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मटका केंद्रांकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचा हप्ता घेतला जात असून, शहर पोलीस स्टेशनलाही दरमहा ठराविक रक्कम दिली जात असल्याची चर्चा आहे. परिसरातील वर्दळीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, मद्यपान करून जुगार खेळणाऱ्यांमुळे अनुचित प्रकार घडण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक पोलिसांनी मात्र अद्याप कोणतीही माहिती नसल्याचे सांगत दुर्लक्ष केले आहे. या अवैध धंद्यांचा बंदोबस्त करून संबंधित बिट जमादाराची बदली करावी आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी संतप्त नागरिक व महिलांकडून केली जात आहे.

## थोडक्यात



### राष्ट्रीय सैनिक संस्थेत शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

**पुसद :** राष्ट्रीय सैनिक संस्था, विदर्भ प्रांत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष कर्नल टी. पी. त्यागी (वीरचक्र) यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हरिश्चंद्र ब. राठोड यांच्या नेतृत्वाखाली संस्था युवकांमध्ये शिस्त, चारित्र्य, राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची भावना रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिवराज्याभिषेक दिनापासून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत संस्थेचे कार्य पोहोचविण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक निळकंठराव गावंडे, विदर्भ संयोजक ॲड. रवींद्र रुडे, उपाध्यक्ष प्रा. मनोहर नजरधने, विदर्भ प्रांत सचिव प्रशांत गावंडे, संघटक प्रभु जैस्वाल, मीडिया प्रमुख ज्ञानेश्वर शिंदे, राजू चिरडे, श्रीकांत गावंडे आणि सचिन मस्के उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मनोहर नजरधने यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजू चिरडे यांनी मानले.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

**झाडांच्या साक्षीने पर्यावरणाचा संकल्प!**

**महागाव:** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत सवाना परिसरात



जिजाऊ इंग्लिश स्कूल व युवा संघर्ष संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी वृक्ष लागवड करून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारली. वृक्षारोपणासोबतच झाडांचे संगोपन करण्याचा संकल्पही विद्यार्थ्यांनी केला. यावेळी जिजाऊ इंग्लिश स्कूलचे संस्थापक डॉ. अमोल देशमुख तसेच युवा संघर्ष संस्थेचे संस्थापक सागर गोविंदवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरणाचे वाढते महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे जतन करावे, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमामुळे परिसरात हरित वातावरण निर्माण होण्यास मदत होणार असून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पाऊल उचलण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

### पीएम किसानचा पुढील हप्ता मिळवायचा असेल तर ३० जूनपूर्वी ई-केवायसी अनिवार्य

**यवतमाळ :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेणाऱ्या जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ३० जून २०२६ पूर्वी वार्षिक ई-केवायसी (e-KYC) प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. निर्धारित मुदतीत ई-केवायसी न केल्यास लाभार्थ्यांचा पुढील हप्ता रखडण्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. योजनेतील पारदर्शकता वाढविणे, अपात्र लाभार्थ्यांना रोखणे तसेच केवळ पात्र आणि जिवंत लाभार्थ्यांपर्यंतच आर्थिक मदत पोहोचविणे हा या विशेष मोहिमेचा उद्देश आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार २० मे २०२६ पासून जिल्हाभर ई-केवायसी अभियान राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना ई-केवायसीसाठी बायोमेट्रिक प्रमाणीकरण तसेच फेस ऑथेंटिकेशन (चेहरा ओळख) या दोन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वृद्ध, आजारी किंवा हालचालींमध्ये अडचण असलेल्या लाभार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून ग्रामस्तरीय नोडल अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी त्यांच्या घरी जाऊन फेस ऑथेंटिकेशनद्वारे ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून देणार आहेत. यामुळे कोणताही पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व लाभार्थ्यांनी ३० जूनपूर्वी ई-केवायसी पूर्ण करावी, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

### इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना

# पहिल्याच दिवशी होणार पुस्तकांचे वाटप

### जिल्ह्यात ११.२२ लाख पाठ्यपुस्तके दाखल

एकूण शाळा : २,४१७
एकूण लाभार्थी विद्यार्थी : १,७९,३८१
एकूण पुस्तकांची मागणी : ११,२२,७२२
आतापर्यंत प्राप्त पुस्तके : जवळपास ७५%

**वर्ग निहाय विभागणी**
इयत्ता १ ली ते ५ वी : ५,१८,८४९ पुस्तके
इयत्ता ६ वी ते ८ वी : ६,०३,८७३ पुस्तके

**अमरावती/का.प्र.**

नवे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू होण्यासाठी अवघा आठवडा शिल्लक असताना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांचा पुरवठा अंतिम टप्प्यात आला आहे. जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमधील इयत्ता पाहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके आणि गणवेश उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यासाठी ११.२२ लाख पाठ्यपुस्तके दाखल झाली आहेत.

राज्य सरकारच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने बालभारतीकडे पुस्तकांची मागणी नोंदवली होती. त्यानुसार आतापर्यंत तब्बल ७५ टक्के पुस्तकांचा पुरवठा पूर्ण झाला असून, उर्वरित पुस्तकेही लवकरच दाखल होणार आहेत. जिल्हा शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार जिल्ह्यातील २,४१७ शाळांमधील १ लाख ७९ हजार ३८१ विद्यार्थ्यांसाठी एकूण ११ लाख २२ हजार ७२२ पाठ्य पुस्तकांची मागणी नोंदवण्यात



आली होती.

नवीन सत्राच्या पहिल्या दिवशी कोणत्याही विद्यार्थ्याला पुस्तकांशिवाय राहा-वे लागणार नाही, यादृष्टीने सर्व शाळांना वेळेत वाटप करण्याचे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरवर्षी शाळा सुरू झाल्यानंतर अनेक दिवस विद्यार्थ्यांना पुस्तकांची प्रतीक्षा करावी लागत असे. मात्र, यंदा शिक्षण विभागाने आधीच कंबर कसली असून पहिला दिवस, पूर्वतयारीसह या धोरणांतर्गत पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तके आणि अंगावर नवा गणवेश असेल, अशी चोख व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## शहरातील माकडांच्या उपद्रवावर प्रतिबंधाचे आदेश

### माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचा पुढाकार

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरात गेल्या काही दिवसांपासून माकडांचा वाढलेला हैदोस नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत होता.माकडांकडून अचानक हल्ले करणे, नागरिकांना चावा घेणे, घरांमध्ये घुसून नुकसान करणे अशा घटना वारंवार घडत होत्या. विशेषतः शाळेत जाणारे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.नागरिकांच्या या गंभीर समस्येची दखल घेत माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी पुढाकार घेत वनविभागाशी संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी स्वतः या मोहिमेत लक्ष घालत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

वीरेंद्र जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे वनविभागाच्या सहकार्याने चांदूर रेल्वे शहरात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान शहरातील विविध भागातून जवळपास ७० माकडांना सुरक्षितरित्या



पकडण्यात आले व त्यांना नैसर्गिक अधिवास असलेल्या जंगल परिसरात सोडण्यात आले.या कामात वनविभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत प्राणी मित्र समाधान गिरी यांनी विशेष सहकार्य करत माकडांना पकडून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

या मोहिमेमुळे शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, माकडांच्या भीतीमुळे निर्माण झालेले वातावरण कमी झाले आहे. लहान मुले, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी समजून घेऊन तात्काळ प्रशासनाकडे पाठपुरावा करून प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहत समस्या सोडविण्याचा माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप यांचा हा उपक्रम नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे.

## शाश्वत शेतीतून कौटुंबिक सुरक्षिता निश्चित-डॉ. प्रणिता कडू

### शेती बचाव अभियानांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

शेती बचाव अभियानांतर्गत वलणी खुर्द (ता. अचलपूर) येथे आयोजित शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, घातखेडच्या गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. प्रणिता कडू यांनी शाश्वत शेती, पोषणसुरक्षा आणि कौटुंबिक आर्थिक स्थैर्य या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांना नवा दृष्टिकोन दिला. कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र घातखेड व संबंधित यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला परिसरातील सुमारे ७५ शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिलोना येथील सरपंच संतोष मालवे तर प्रगतिशील शेतकरी



शरद बोंडे उद्घाटक प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच अजय उभाड, बीटीएम शीतल धुळे, एटीएम निशांत इंगळे, सहाय्यक कृषी अधिकारी मोहन धाडसे, सहाय्यक कृषी अधिकारी होमेंद्र चौधरी तसेच मनोज काळे म्हणून उपस्थित होते.शाश्वत शेतीतून कौटुंबिक सुरक्षितता या विषयावर बोलताना डॉ. प्रणिता कडू यांनी शेतकऱ्यांना केवळ नगदी पिकांवर अवलंबून न राहता अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया व मसाला पिकांचे उत्पादन घेण्याचा सल्ला दिला.

डॉ. कडू यांनी गहू, ज्वारी, बाजरी, विविध कडधान्ये, राजगिरा, भगर यांसारख्या पौष्टिक पिकांसह मिरची, हळद, धने, जिरे, बडीशेप आणि ओवा यांसारख्या मसालापिकांचे उत्पादन घेण्याचे महत्त्व सांगितले. तसेच तीळ, जवस, भुईमूग आणि मोहरी यांसारख्या तेलबिया पिकांच्या लागवडीमुळे कुटुंबाची पोषणसुरक्षा आणि आर्थिक बचत साधता येते, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी खरीप हंगामातील पीक व्यवस्थापन, बीज प्रक्रिया, बीज उगवण क्षमता तपासणी, बीजामृत, दशामृत आणि हुमणी अळी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. मात्र डॉ. प्रणिता कडू यांच्या शाश्वत शेती आणि पोषणसुरक्षेवरील मार्गदर्शनाने शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली.

## संक्षिप्त

### 'एकपेड मां के नाम'उपक्रम



**अमरावती-** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी बहुउद्देश्य उच्च माध्यमिक शाळा व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण सोहळा पार पडला.विद्यालयाच्या परिसरामध्ये कडुनिंब ,आवळा,पिंपळ ,बेल अशा विविध वनस्पतींची लागवड करण्यात आली.वृक्षारोपण सोहळ्याला सहाय्यक वनसंरक्षक सामाजिक वनीकरण दर्शना पाटील,तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष धापड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.वनपाल निलिमा उगले, माधुरी नितनवरे, वनरक्षक विद्या रामटेके या देखील वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रसाद देशमुख,उपमुख्याध्पक माळवे यांनी केले. राष्ट्रीय हरित सेनेचे विद्यार्थी स्काऊट गाईडच्या विद्यार्थिनी,एनसीसी विद्यार्थ्यांनी पाहुण्यांच्या उपस्थितीत रोपट्यांची लागवड केली.मान्यवरांनी वृक्ष संवर्धनाकरिता सामूहिक प्रयत्न करण्याचा आशावाद व्यक्त केला. तसेच 'एक पेड़ मा के नाम' हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी निर्धार करावा असे आवाहन केले.कार्यक्रमाकरिता हरित सेना प्रभारी संगीता पाटील,एनसीसी ऑफिसर प्रशांत इंगोले, प्रा.प्रसन्न मोहोड,प्रा.राठोड,शिक्षिका अर्चना अर्डक,सुहासिनी भारसाकळे,प्रा. भागवत,प्रा.उमरकर, प्रा.अकर्ते,शिक्षकेतर कर्मचारी रवींद्र गाडगे,सुधीर महल्ले सुधीर ईंगोले,नंदकुमार बोबडे या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण सोहळ्यासाठी परिश्रम घेतले.

### कष्टातून हिरवी क्रांती प्रगतशील उपक्रम



**नांदगाव खंडेश्वर-** पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या अमरावती येथील सातव्या सत्रातील ग्रामीण जागरूकता कार्यक्रमांतर्गत कृषिदूत अंश उ. देवघरे, मोहित र. गुल्हाणे, प्रणय पा. पिने, रोहन सं. बळी व सुप्रित सु. शेगोकार यांनी महाविद्यालयाद्वारे नेमून दिलेल्या ग्राम अंजनगाव बारी येथे गावकऱ्यांना भेट दिली. त्यांनी माती परीक्षणासाठी नमुना कसा गोळा करावा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व त्याचे महत्त्व पटवून दिले. माती परीक्षणामुळे आपल्या जमिनीत रासायनिक व भौतिक गुणवत्ता तपासुन मिळते. तसेच ती वाढविण्याकरिता काय उपाययोजना करता येतील याबद्दल चर्चा केली. या उपक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, जलसंधारण, कीड व रोग व्यवस्थापन, शासकीय कृषी योजना, तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत जाणून घेणार आहेत.प्रात्यक्षिकाकरिता प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे , उपप्राचार्य नितेश चौधरी व कार्यक्रम अधिकारी श्वेता देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमामध्ये शेतकरी व ग्रामसंस्थाचा उत्कृष्टपणे प्रतिसाद लाभला.

### दत्त यागाची सांगता

**अमरावती-** श्री दत्त मंदीर कुंभावाडा येथे अधिकमासा निमित्य तिन दिवस दत्त याग (यज्ञ) चे आयोजन करण्यात आले होते तिन दिवस यज्ञासोबत विविध आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रम भाविकांच्या महा उपस्थितीत भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.कार्यक्रमाचे नियोजन संस्थानचे पदाधिकारी चंद्रशेखर हंबर्डे, मधुकर साऊरकर, दिपक हुंडीकर, मनोज केवले, अंनत साऊरकर, प्रभाकरराव केवले, धंनजय चतारे, यांनी सुत्रबद्ध पद्धतीने नियोजन करून हा याग भाविकांसाठी सदैव स्मरणात राहीलअसे आयोजन केले. तिन दिवस चाललेल्या या योगयज्ञात मुख्य यजमान रोहीत बांडे तथा दिप्ती बांडे पुणे यांचे सह एकवीस सह यजमानांनी यज्ञात सहभाग घेतला. आयोजनात अभिनंदन पेंढारी, हरिभाऊ विचूरकर, श्रीराम रोतळे, मनमोहन गगड, गोविद सोमाणी, श्रीराम कोल्हे, शेखर पांडे, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### ११ व १२ मे रोजी तिवसा तालुक्यातील

## ३० ग्रामपंचायत मधील प्रभाग निहाय आरक्षण निघणार

**कुऱ्हा/वार्ताहर**

जिल्ह्यातील आगामी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीबाबत प्रशासन यंत्रणाची लगबग पाहता देखील ग्रामपंचायत निवडणूक ही पावसाळ्यातरच घेतली जाणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.याची पूर्व तयारी म्हणून राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेचा टप्पा पार केल्यानंतर आता निवडणुकीचा कार्यकाळ संपत असलेल्या तिव सा तालुक्यातील ३० ग्रामपंचायत मधील प्रभाग आरक्षण आता नव्याने चक्राणू पद्धतीने तर ओबीसी आरक्षण सह एकूण ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण निघणार नाही याची दक्षता घेत ११व १२ मे रोजी ग्रामपंचायत मधील आमसभेत ही आरक्षण प्रक्रिया पार पडली जाणार आहे यासाठी स्थानिक अध्यासी अधिकारी म्हणून कर्मचाऱ्यांच्या नियुक्त करण्यात आले आहे.

तिवसा तालुक्यातील ४६ ग्रामपंचायत पैकी मुदत संपणाऱ्या २० २४ ते २०२५ ग्रामपंचायत मध्ये २९ ग्रामपंचायती चा समावेश असून यामध्ये आता तांडा वस्तीमधील भिवापूर ग्रामपंचायत चे गट ग्रामपंचायत मधील वीरगव्हाण या ग्रामपंचायत ची नव्याने निर्मिती झाली असल्यामुळे एकूण ३० ग्रामपंचायत चे निवडणूकित समावेश करण्यात आला आहे. जवळजवळ २६६ ग्रामपंचायत सदस्य मधून अंदाजे अपूर्णांक पकडल्यास १४८ महिला राखीव जागा राहणार आहे तर लोकसंख्याचे प्रमाणात अनुसूचित जाती/जमाती यांचे सूत्रानुसार राखीव ठेवण्यात येते तर इतर मागासवर्गीय साठी २७ टक्के जागा राखीव राहणार आहे. अनु जाती व जमाती व ओबीसी आरक्षण ५० टक्के पेक्षा जास्त होऊ नये म्हणून ओबीसी मधील टक्केवारीतील अपूर्णांक विचारात घेतल्या जाणार नसल्याने इतर मागास वर्गीय यांचे जागा कमी होणार असल्याचे मानले जात आहे.जवळपास २६६ ग्रामपंचायत सदस्यांमध्ये ५१ सदस्य इतर मागासवर्गीयसाठी राखीव निघणार आहेत.

२०२४-२०२५ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायत चे सार्वत्रिक निवडणुका संदर्भात अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्गीय साठी तसेच महिला साठी राखीव ठेवण्यात येत असलेल्या ग्रामपंचायत सदस्यची आरक्षण सोडत ग्रामपंचायत चे आमसभेत काढण्यात येत असून यासाठी ११ व १२ मे रोजी ही सोडत निश्चित करण्यासाठी तिवसा तालुक्यात प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या नियुत्त्या करण्यात आल्या आहेत.गुरुवार ११ मे रोजी तळेगाव ठाकूर दापोरी,सातारगाव,सारसी, वीरगव्हाण, वरखेड, चानुष्ठ ,भारवाडी ,ठाणाठुनी, धोत्रा मोझरी, वऱ्हा, शेंदुळा खुर्द ,शिवणगाव शेंडोळा बुद्रुक या १५ ग्रामपंचायत आहे शुक्रवार १२ मे रोजी गुरुदेव नगर शिरजगाव मोझरी सुरवाडी खुर्द ,माळेगाव,कुऱ्हा, मार्डी भिवापूर शेंदुर्जना बुद्रुक दिवाणखेड मारडा बोर्डा जावरा फत्तेपूर मूर्तिजापूर धामंत्री वाठोळा खुर्द त्या ग्रामपंचायतचा समावेश राहणार आहे.

## शिवरायांचे विचार आचरणात आणणे आवश्यक-प्र.कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे

### विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

'छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांची कार्यशैली केवळ विशिष्ट दिनापुरती मर्यादित न ठेवता, ती आपण आपल्या दैनंदिन आचरणात आणली पाहिजे, आणि हाच वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे. जगभरातील व्यवस्थापन तज्ज्ञांसाठी महाराजांची धोरणे आजही मार्गदर्शक ठरत आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून लेखक शुभम विलासराव पाचखंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन या पहिल्या संदर्भ ग्रंथांचे ग्रंथाचे लेखन केलेले होते.' विद्यापीठाची माजी



विद्यार्थिनी आज याच व्यासपीठावर मुख्य व्याख्याता म्हणून सन्मानाने उभी राहते, याचा विद्यापीठाचा प्र-कुलगुरू म्हणून मला सार्थ अभिमान वाटतो, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने 'शिवराज्याभिषेक दिन सोहळा' अत्यंत उत्साहात आणि प्रेरणेच्या वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी त्यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन केले. हा विभाग अत्यंत ऊर्जावान असून वर्षभर अत्यंत दर्जेदार व मार्गदर्शक कार्यक्रमांचे आयोजन करतो, असेही ते म्हणाले. व्यासपीठावर प्रमुख व्याख्याता म्हणून प्रसिध्द शिवव्याख्याता ॲड. वैष्णवी हागोणे, व्य.प. सदस्य डॉ. अरुण हरणे, ननसा संचालक डॉ. अजय लाड, अधिसभा सदस्य डॉ. श्रीकांत काळीकर, उपविभागीय अधिकारी श्री आशिष बिजवाल, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

संत गाडगे बाबा, छत्रपती शिवाजी महाराज यांचे मूर्तीपूजन, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन आणि शंखनाद करुन महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शुभम पाचखंडे लिखीत पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्ताविकातून डॉ. वैभव मस्के यांनी कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. सूत्रसंचालन प्रा. आदित्य पुंड यांनी, तर आभार डॉ. श्रीकांत पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच आजीवन अध्ययन विभागातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


# आजपासून मृग नक्षत्राला प्रारंभ

### नक्षत्राचे वाहन 'बेडूक';१७ जून नंतर दमदार पाऊस

**चांदूरबाजार/वार्ताहर**

हजारो वर्षा पूर्वी शेतीचा शोध लागला तेव्हा, हवेची दिशा.वाऱ्याचा वेग , सायंकाळी सुर्य मावळतीच्या वेळी आकाशातील स्थीती. तसेच पक्षांचे आवाज व त्यांच्या वागण्याच्या स्थिती वरून पावसाचा अंदाज बांधल्या जाता होता. मुंगी,माकोडे,उधळी या किटकांच्या स्थलांतरा वरून ही जुनी जानकार माणसे पावसाचा अंदाज वर्तवित होती.त्यानंतर पंचांगाशास्त्राची निर्मिती झाली.तेव्हापासून तत्कालीन खगोल शास्त्रा वरून, नक्षत्र,चंद्र, सूर्य,ग्रह यांचे आकलन करून पावसाचा अंदाज वर्तविण्यास सुरुवात झाली.आज ही या पंचांग शास्त्रीय हवामान अंदाजावर शेतकऱ्यांचा विश्वास दिसून येतो.त्या पंचांगशास्त्रा नुसार , आज दिनांक ८ जूनला दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी पावसाच्या 'मृग' नक्षत्राला सुरुवात होत आहे.

पावसाळ्याच्या एकूण १२ नक्षत्रापैकी पावसाचे दुसरे नक्षत्र म्हणजे मृग नक्षत्र होय.बाराही नक्षत्रात पावसाचे मान कसे असेल.हे खगोलशास्त्राचा आधार घेऊन,ग्रह,तारे, नक्षत्र यांची त्या त्या पावसाच्या नक्षत्रातील



स्थितीचा अभ्यास करून पावसाचा अंदाज पंचांग शास्त्रा व्दरे वर्तविला जातो. त्या अंदाजानुसार मृग नक्षत्राचे वाहन'बेडूक'आहे. या नक्षत्राचे प्रथम चरणात अर्थात ८ ते ११ जून दरम्यान, हवामानात बदल होऊन अनेक ठिकाणी मान्सून पूर्व वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे.मात्र हा पाऊस सार्वत्रिक होणार नाही. काही अती वृष्टी, तर काही ठिकाणी कडक ऊन असा अनुभव येईल.

केरळ व कोकण भागात मान्सून दाखल झाल्याच्या वार्ता येतील.तसेच या भागात अतिवृष्टी झाल्याच्या वार्ता ही येतील.मात्र मृग नक्षत्रातील सार्वत्रिक पावसाचे योग, शेवटच्या चरणात अर्थात १८ जून नंतरच दिसून येतात.या नक्षत्राच्या शेवटच्या चरणातील पाऊस, संपूर्ण महाराष्ट्रात होईल.मात्र दक्षिण व पश्चिम महाराष्ट्रात भरपूर पावसाचे योग दिसून येतात.

यावर्षी रोहिणीच्या पावसाने दगा दिला. अशातच नवतपा ही चांगलाच तापला.त्यामुळे मृग नक्षत्राचा पाऊस चांगला होईल.असा जाणकार व अनुभवी शेतकऱ्यांचा अंदाज आहे.तसे ही मृग नक्षत्रातील पेरणीस,शेतकऱ्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.कारण मृग नक्षत्रात पेरणी झाल्यास पिकांवर रोगराई कमी येऊन पिके चांगली येतात.परिणामी उत्पादन चांगले मिळते.त्यामुळे शेती व्यवसाय व शेतकऱ्यांसाठी,मृग नक्षत्र व या नक्षत्रातील पाऊस खूप महत्त्वाचा असतो.परंतू वातावरणातील बदलामुळे, निसर्गाचे ऋतू चक्र ही बदललेले आहे.त्यामुळे हमखास पेरणी योग्य मृगाचा पाऊस होईलच,असे अलीकडच्या काळात घडत नाही. त्यामुळे मृग नक्षत्रात पेरणी होईल ही शेतकऱ्यांची अपेक्षा फोल ठरत आहे.पावसाळ्याचा हा संपूर्ण अंदाज पंचांग शास्त्राने, ग्रह तात्यांच्या घडामोडींवर आधारित वर्तविला आहे. तरी शेतकऱ्यांनी हवामान खात्याचा अंदाज,आपल्या भागातील प्रत्यक्ष अनुभव व परीस्थिती पाहूनच आपले निर्णय घ्यावेत.

# ‘सडक्या’ राजकारणाचे ‘वास्तववादी’ दर्शन!




राज्यात उन्हाचा तडाखा थोडाफार कमी झाला असला तरी, येत्या १८ तारखेला होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतील ‘घोडेबाजारा’च्या मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण मात्र चांगलेच तापले आहे. सर्वसामान्य निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देणारी ही निवडणूक आता त्यांच्यासाठी राहिलेली नाही. कारण, या निवडणुकीच्या उमेदवारांत नेहमीप्रमाणे ‘पुढा-यां’च्या घरातील व्यक्तीं व नातेवाईकांचाच जास्त भरणा झालेला दिसत आहे. निवडणूक जाहीर होताच, सत्ताधारी ‘महायुती’त जागावाटपाची रस्सीखेच सुरू झाली होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या दिल्ली वा-या झाल्यानंतर भाजप ११, शिवसेना व राष्ट्रवादी २ असे जागा वाटप झाले. उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर, आपल्या मुलाचे, मुलीचे, निकटवर्तीयाचे नाव नसल्याने अनेक नेते नाराज झाले. तशी ‘खदखद’ही त्यांनी प्रसारमाध्यमांद्वारे व्यक्त केली होती. नेहमीप्रमाणेच जनतेच्या ‘डोळ्यात धूळफेक’ करणा-या ‘युती’ आणि ‘आघाडी’ या ‘गोंडस’ संकल्पनेला, स्वस्वार्थासाठी फाट्यावर मारत अनेक इच्छुकांनी ‘बंडखोरी’चे निशाण फडकवले. या ‘बंडोबां’ना ‘थंड’ करण्यासाठी विविध ‘आश्वासने’ आणि ‘प्रलोभने’ देताना वरिष्ठ नेत्यांची मात्र चांगलीच ‘दमछाक’ होत आहे.

‘महायुती’त १७ पैकी ९ मतदारसंघांत बंडखोरी झाली आहे. बंडखोरांनी माघार घ्यावी, यासाठी वरिष्ठ नेत्यांना साम-दाम-दंड-भेद याचा वापर करत, नाशिक व जळगाव वगळता इतर मतदार संघांत यश आले खरे. पण, नाशिक व जळगावातील बंडखोरांच्या ‘नाकदु-या’ काढण्यासाठी अजून ही ‘जोरबैठका’ काढाव्या लागत आहेत.बहुधा, या दोन्ही मतदार संघातील भस्मासुरांची ‘भूक’ मोठी असावी, असे वाटते.‘मविआ’ची मात्र या निवडणुकीत प्रचंड ‘नाचक्की’ होऊन,‘हात दाखवून अवलक्षण’ अशी दयनीय परिस्थिती झाली आहे. शरद पवार गटाच्या श्रीकांत पाटील (पुणे), अभिजित पवार (ठाणे) तर, उबाठा गटाच्या बाळ माने (सिंधुदुर्ग), देवयानी डोणगावकर (छ, संभाजीनगर) आणि काँग्रेसच्या शैलेश अग्रवाल (वर्धा), साहेबराव कांबळे (यवतमाळ) अशा एकूण ७ अधिकृत उमेदवारांनी लढण्याआधीच आपल्या तलवारी म्यान केल्याने ‘मविआ’ चांगलीच तोंडघशी पडली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसच्याच एका नेत्याने आपल्या नगरसेवकांना पैसे वाटून विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले असल्याचा दावा खुद्द काँग्रेसच्याच विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तर, सिंधुदुर्गचे उमेदवार बाळ माने हे भाजपचे मंत्री नितेश राणे यांना बरोबर घेऊन माघार घ्यायला गेले.पुण्याचे काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी ‘शरद पवार यांनी आमचा विश्वासघात केला’ अशी टीका केली. ‘उबाठा’वर ३ तर, ‘शप’ गटावर २ नेत्यांची हकालपट्टी करण्याची नामुष्की ओढवली. अशाप्रकारे अंतर्गत धुसफूस प्रचंड वाढल्यामुळे ‘मविआ’चे तोंड काळे होऊन, ते दाखवण्याची जागाही शिल्लक राहिली नाही.

अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी राज्यभर ‘महाभारत’ घडून, मतदानाच्या आधीच ‘महायुती’ने विजयी ‘षटकार’ मारला. तर, ‘मविआ’चे ७ बळी गेले.‘पॉवर प्ले’च्या षटकांतच ‘महायुती’ची बाजू भक्कम झाल्याने हा ‘टी-२०’ चा सामना ‘महायुती’च जिंकेल व त्याची ही ‘नांदी’ आहे, अशी चर्चा ‘महायुती’च्या गोटात होताना दिसत आहे, मार्च महिन्यात झालेल्या राज्यसभा निवडणुकीतही सर्व ७ उमेदवार बिनविरोध निवडून गेलेले आहेत. अलिकडे काहीही करून, आपल्या मर्जीतील उमेदवार बिनविरोध निवडून आणायचेच, असा ‘पायंडा’ पाडण्याचा ‘विडा’ प्रत्येक पक्षांनी उचलला आहे की काय? असा प्रश्न, आजची ही एकंदरीत परिस्थिती बघता, पडल्याशिवाय राहत नाही. जर, आपली मुलेबाळे, नातेवाईक, निकटवर्तीय यांना बिनविरोध निवडून आणायचे; आणि सर्वसामान्य निष्ठावंत प्रामाणिक कार्यकर्त्याला आयुष्यभर सतरंज्या उचलायला लावायच्या असतील तर, कशाला करता हे निवडणुकीचे ढोंग? का करता ‘लोकशाही’चा अपमान व निवडणूक प्रक्रियेची थट्टा? सरळसरळ तुमच्या मर्जीतील उमेदवारांना विजयी घोषित करा. किमान त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा होणारा ‘घोडेबाजार’ तरी होणार नाही.तसेच, घोडेबाजारासाठी वापरला जाणारा पैसा हा तुमचा स्वतःचा किंवा तुमच्या बापाचा नसून, घोटाळे आणि भ्रष्टाचार करून जनतेला लुबाडूनच तो कमावलेला, नव्हे ‘लाटलेला’ आहे. किमान तो पैसा वाचून सत्कारणी तरी लागेल.

निवडणुकीचे आजचे हे ‘बकाल’ स्वरूप बघता, महाराष्ट्रात निवडणुका घ्यायच्या तरी कशाला? असा संतापजनक प्रश्न पडतो. आताच्या निवडणुकीत जे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. ते सर्व सत्ताधारी ‘महायुती’चेच आहेत.या सर्व उमेदवारांची पार्श्वभूमी बघता, ते अतिशय ‘धनाढ्य’ तर आहेच.पण,त्यांची ‘राजकीय ताकद’ही प्रचंड मोठी आहे.म्हणून असे



उमेदवारच बिनविरोध कसे निवडून येतात? या प्रश्नाचे उत्तर मिळते. आश्चर्य आणि शरमेची बाब म्हणजे, सुनील तटकरे यांचा मुलगा अनिरुद्ध आणि माजी खासदार संजय काकडे यांचा मुलगा विक्रम या दोघांनी स्थानिक स्वराज्य संस्थेत सामाजिक कार्याचा असा कोणता ‘भीमपराक्रम’ केला म्हणून, त्यांना बिनविरोध निवडून दिले,हा जागतिक स्तरावरील ’संशोधनाचा विषय’ होऊ शकतो.

✍ **प्रदीप व्ही. खोलमकर**

केवळ आपल्या बापांकडे असणारा भ्रष्टाचाराचा ‘रग्गड पैसा’ आणि ‘राजकीय ताकद’ या निकषांवरच ते फुकटचे आमदार झाले आहेत. वर्ध्यातून बिनविरोध निवडून आलेले अरुण लखाने हे खासदार सुप्रिया सुळे यांचे होणारे व्याही आहेत. त्यामुळे येथेही ‘राजकीय ताकद, लागेबांधे’ आणि ‘प्रचंड पैसा’ हे मुद्दे गैरलागू होत नाहीये. ठाण्यातून रवींद्र फाटक आणि यवतमाळमधून दुष्यंत चतुर्वेदी हे बिनविरोध निवडून आले. हे दोघेही माजी आमदार असल्यामुळे पैसा आणि राजकीय ताकद हे मुद्दे उपस्थित होतातच.

‘मविआ’कडे पुरेसे संख्याबळ नसल्याने कोणतीही जागा अगदी सहजपणे जिंकणे त्यांना शक्य नाही. पण, याचा अर्थ असा होत नाही की, त्यांनी निवडणूकच लढू नये. पक्षाचा एबी फॉर्म घेऊन, उमेदवारी अर्ज भरायचा; आणि ऐनवेळी तो माघारी घेऊन पक्षाच्या ‘इज्जतीचे धिंडवडे’ का आणि कशासाठी काढायचे? या मागे काय कारण असावे? पडद्याआड काय ‘व्यवहार’ होतात? या प्रश्नांची उत्तरे आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला कधीच मिळू शकणार नाहीत. परंतु, पक्षाचा उमेदवारी अर्ज भरून, माघारीसाठी समोरच्या उमेदवारावर जास्तीत जास्त रक्कम मिळवण्यासाठी दबाव टाकणे, हेच कारण असावे, असा कयास मात्र आपण निश्चिंतच करू शकतो. कारण, अगदी सहजासहजी आणि निस्वार्थपणे माघार घेणारे ‘हरिश्चंद्राचे अवतार’ ‘सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता’ असे व्यावसायिक स्वरुप आलेल्या आजच्या ‘सडक्या’ आणि ‘बाजारू’ राजकारणातून केव्हाच ‘इतिहासजमा’ झाले आहेत. हा अतिशय गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न केवळ राजकारणापुरताच मर्यादित नसून, हा लोकशाही व मतदारांचा घोर अपमान तर आहेच. पण, निवडणूक प्रक्रियेच्या ‘अब्रूचे लक्तरे वेशीवर टांगण्याचा’ नीच प्रकार आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पुण्याची जागा ‘शप’ गटाने काँग्रेसकडून मागून घेऊन तेथे श्रीकांत पाटील हा आपला अधिकृत उमेदवार उभा केला होता. तर, राष्ट्रवादीतर्फे विक्रम काकडे रिंगणात होते. सुनेत्रा पवारांनी शरद पवार यांना, त्यांच्या उमेदवाराने माघार घ्यावी, असा फोन केला, त्वरित काकांनी श्रीकांत पाटील याना माघारीचे आदेश दिले.

माघारीमुळे आपण काँग्रेसचा ‘केसाने गळा कापून’ विश्वासघात करत आहोत, हा साधा विचार करण्याची गरजही त्यांना वाटली नाही. कदाचित, विक्रम काकडेने जय पवार यांना १० कोटी रुपये दिल्याची बातमी त्यांनी बघितली असावी. १८ जूनलाच देशातील १० राज्यांतील २४ रिक्त जागांसाठी राज्यसभेचीही निवडणूक होत आहे. सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेसाठी छगन भुजबळ इच्छुक होते. पक्षाकडून जवळजवळ त्यांच्या नावावर शिक्कामोर्तबही झाले आहे. पण, या महाशयांनी सुनील तटकरे यांच्या कुटुंबातील तिघांना संधी, मग माझ्यावरच अन्याय (?) का? असा प्रश्न उपस्थित करून, आपल्या रिक्त होणा-या जागेवर पुतण्या समीर भुजबळ यालाच उमेदवारी द्या. तसेच, आजच त्याला कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ द्या, तरच मी अर्ज भरेल, असा धमकीवजा इशारा दिला आहे. या २ चालू उदाहरणांवरून आपला आणि कुटुंबाचा स्वार्थ साधण्यासाठी हे ‘संधीसाधू’ कसे सोईचे राजकारण खेळतात, हे अधोरेखित होते. सर्वसामान्य नागरिकांना सतत प्रामाणिकपणा व नियम पाळण्याचे डोस देणा-या सर्वच पक्षांच्या ‘संधीसाधूं’ना आता नीतिमत्ता आणि योग्य-अयोग्यतेचा ‘बुस्टर डोस’ देण्याची वेळ आली आहे, हे मात्र नक्की. आपल्या स्वार्थासाठी सोईनुसार ‘मॅनेज’ होत असणा-या अशा निवडणुका बघता, पुढील प्रश्न पडल्याशिवाय राहत नाहीत. ‘बिनविरोध’ ही संकल्पना नीतिमत्तेला धरून आहे का? अशा निवडणुकांची खरेच गरज आहे का? जनमताचा सन्मान उरला आहे की नाही? ‘उमेदवार हे खरेच आपल्या कर्तृत्वावर ‘बिनविरोध’ निवडून येतात की ‘सेटिंग करुन? लोकशाहीत ‘बिनविरोध’ निवड कितपत योग्य आहे? माघारच घ्यायची असेल, तर उमेदवारी अर्ज का आणि कशासाठी भरले जातात? अर्ज भरून समोरच्या उमेदवाराला ‘ब्लॅकमेल’ करुन, हवे ते मिळवले जाते का? मतदान न होता ‘बिनविरोध’ झालेल्या उमेदवारांना लोकप्रतिनिधी म्हणणे कितपत योग्य आहे? असे रेडिमेड लोकप्रतिनिधी (?) जनतेच्या प्रश्नांना किती वाचा फोडू शकतात; आणि किती न्याय देऊ शकतील ?, असो.काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी तर, ‘या निवडणुकीचे राजकारण लाजवणारे आहे’,असे मुक्ताफळे उधळली आहे. यावरून आजचे राजकारण; आणि नेते किती नीच स्तरावर गेले आहेत, हे स्पष्ट होते. म्हणूनच, आजच्या ‘सडक्या’ राजकारणाचे ‘वास्तववादी’ दर्शन घडवणा-या अशा ‘सेटिंग’ निवडणुकांनी लोकशाहीची पायमल्ली होत असेल, तर निवडणुका घ्यायच्या तरी कशाला? असा गंभीर आणि संतापजनक प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

नाशिक.
मा-८७६७५९२९८०

# ज्येष्ठांची गरज डे केअर सेंटर

जीवनाच्या वाटचालीत वृद्धत्व अटळ आहे, अपरिहार्य आहे. शरीरावर वयाचा ठसा उमटतोच हे जसे खरे आहे, तसेच विविध प्रयत्नाने जाणीव पूर्वक शरीर आणि मन दोन्ही सशक्त व निरोगी ठेवता येत हे फारच महत्वाचे आहे. असे प्रयत्न तरुण्यावस्थेतच व्हावयास हवे कारण आजचे तरुण उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. विभक्त कुटुंब पद्धती व नोकरी व्यवसायामुळे घरातील सर्व सदस्य बाहेर असतांना वृद्ध व्यक्ती मात्र घरात एकटी पडते. वयातील फरक व स्वभाव वैविध्यते मुळे घरातील सदस्यांमध्ये संवाद कमी पडतो. मन हळवं बनते. खूप काहीतरी हरवल्याचा आभास होतो. हळू हळू मानसिक व भावनिक गुंतागुंतीचा प्रभाव शरीरावर दिसू लागतो.

व्यक्ती परत्वे समस्या भिन्न असून प्रत्येकाला आपली समस्या सोडवायची असते. आणि आपला उर्वरित काळ स्वाभिमानाने व आनंदात व्यतीत करावयाचा असतो अश्या वेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी डे केअर सेंटर हा पर्याय उत्तम आहे. नव्या पिढीच्या हाती सूत्र सोपवून त्यांच्यावर आपली मतं न लादता,समवयस्कांसोबत राहण्याने अनेक फायदे साधता येतात. दिवस भराची देखभाल, हे डे केअर सेंटर चे कार्य असून, सेवा, सहकार्य व मनोरंजन हा त्रिसूत्री उद्धेश असतो.

डे केअर सेंटर मध्ये वाचनालय, दूरदर्शन, आवडीचे संगीत, बैठे खेळ, विविध विषयांचे माहिती सत्र, हास्य विनोद, गप्पा गोष्टी मुख्य म्हणजे मन मोकळे करण्यासाठी मित्र समुपदेशक असतात. आपल्या आरोग्य



विषयक बदलाची नोंद ठेवली जाते. वेळोवेळी वैद्यकीय सल्ला आयोजित केला जातो आर्थिक गुंतवणूक, मृत्युपत्र, कायदा, आरोग्य या विषयी मार्गदर्शन मिळते. डे केअर सेंटर चे आपले ओळख पत्र दाखवल्यावर आरोग्य तपासणी व औषधे यात सवलत मिळू शकते. निवृत्ती जरी अटळ असली तरी स्त्रियांची निवृत्ती कुणी गृहीत धरत नाही. नोकरी नंतरही तिला घरात नाईलाजाने कशा न कशात गुंतून राहावे

✍ **सुहास सोहोनी**

लागते. मानवी स्वभावाची विभागणी पाच वर्गात करता येते. १.समंजस,२.हौशी मौजी पण निष्काळजी, ३.निग्रही,४.रागीट,५. स्वतःला दोषी समजणारा निराश वर्ग.यातील प्रत्येकाचे म्हातारपण वेगवेगळ्या तऱ्हेने व्यतीत होते. साठी नंतर स्वभावात बदल घडवता येत नाही. ज्येष्ठ म्हणजे केवळ वयाने वाढलेले एवढाच अर्थ अभिप्रेत नसून ज्येष्ठ हे ज्ञान संपन्न, अनुभव संपन्न असणार हा विश्वास समाजात निर्माण व्हायला हवा.

निसर्ग नियमा मुळे प्राप्त झालेले वृद्धत्व सुद्धा अत्यंत आनंदाने स्वीकारता यायला हवे. या काळात आनंदाचे प्रत्येक क्षण वेचता येणे गरजेच आहे. जो जन्माला आला तो मरणारच हेच सत्य आहे. अवयव दुर्बल होतात,मन कातर होते, सारखे मरणाचे भय वाटते. या सर्व गोष्टी बाजूला सारून आपले जुने छंद जोपासून सेवा सहकार्य व मनोरंजन या त्रिसूत्रीचा विचार डे केअर सेंटर च्या माध्यमातून करावयास हवा. यामुळे जगण्याला नवीन उमेद लाभेल. सुखः दुखः वाटून घेऊन आनंदी राहण्या साठी ज्येष्ठांनी स्वतःच आपला पर्याय निवडायला हवा. स्वतःच्या समस्यांवर विजय मिळवून मानसिक स्वास्थ्य हरवलेल्या इतरांना भावनिक व मानसिक आधार हेच जीवित कार्य समजून विचार करण्याची गरज आहे. मनाच्या योग्य गुंतवणुकी साठी डे केअर सेंटर हा उत्तम पर्याय आहे.

जगात कुठेही वृद्धाश्रम नको?त्याऐवजी ‘टर्मिनल केअर सेंटर’ असावे.

(क्षण वेचतांना लेख संग्रहा मधील लेख )

विवेकानंद कॉलोनी,
अमरावती
फोन-९४०५३४९३५४

# सरकारी साखळदंडात अडकलेले कृषी संशोधन भारतीय शेतीचे सर्वात मोठे अपयश

आज जागतिक बाजार पेठेत व्यापार आणि आर्थिक समृद्धीची नवीन समीकरणे मांडली जात आहेत. मुक्त अर्थव्यवस्था, तांत्रिक स्वातंत्र्य आणि मानवी कल्पकतेच्या जोरावर अमेरिका, ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांतील शेतकरी जागतिक बाजारावर राज्य करत आहेत. याउलट, जगातील सर्वाधिक सुपीक जमीन आणि अफाट मनुष्यबळ लाभलेला भारतीय शेतकरी मात्र आजही जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी चाचपडत आहे. वरवर पाहता याचे कारण निसर्गाचा लहरीपणा किंवा शेतकऱ्यांचे अज्ञान आहे असे भासविले जाते; परंतु याचे खरे आणि मूळ कारण भारताची मागासलेली, अकार्यक्षम आणि नोकरशाहीच्या कचाट्यात अडकलेली सरकारी कृषी संशोधन व्यवस्था आहे. एका बाजूला पूर्ण स्वातंत्र्य असलेली परदेशी संशोधन व्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला सरकारी साखळदंडाने बांधलेली आपली व्यवस्था यांची तुलना केली, तर आपल्या देशातील शेतीचा गळा कोणी घोटला आहे, हे स्पष्टपणे सिद्ध होते.

मुक्त अर्थशास्त्राचा आणि मानवी स्वातंत्र्याचा साधा नियम आहे.जिथे खुली स्पर्धा असते, तिथे नवनिर्मितीला वेग येतो. अमेरिका किंवा ऑस्ट्रेलियामध्ये बियाणे आणि शेती तंत्रज्ञानाचे संशोधन प्रामुख्याने खाजगी क्षेत्रातील खुली स्पर्धा आणि नामांकित विद्यापीठांच्या माध्यमातून होते. तिथल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना आणि शास्त्रज्ञांना माहिती असते की, ग्राहकाच्या (शेतकऱ्याच्या) गरजेनुसार सर्वोत्तम उत्पादन दिले तरच बाजारात नफा कमावता येईल. तिथल्या अफाट लँड होल्डिंगचा वापर करून परदेशी शेतकरी स्वतःच्या शेतात एकाच वेळी अनेक प्रगत बियाणांचे प्रयोग करतात आणि स्थानिक जमिनीला व हवामानाला पोषक ठरणारे वाण निवडतात. तिथे संशोधनाला नफ्याची प्रेरणा आणि बौद्धिक संपदेचे कायदेशीर संरक्षण असते.

अमेरिकेतील संशोधन क्षेत्राची तांत्रिक प्रगती आणि व्यावसायिक अचूकता पाहिली की आपल्या सरकारी व्यवस्थेचा ‘ढ’पणा आणि बौद्धिक दिवाळखोरी चव्हाट्यावर येते. अमेरिकेत कापूस उत्पादक पट्ट्याला ‘कॉटन बेल्ट’ म्हटले जाते. या विस्तीर्ण प्रदेशातील वेगवेगळ्या घटक राज्यांच्या हवामानानुसार आणि तिथल्या गरजेनुसार खाजगी कंपन्यांनी ‘तणनाशक रोधक’ (HeRicide-Tolerant - HT) कापूस बियाणांचे अत्यंत अचूक वर्गीकरण करून वेगवेगळे प्रकार बाजारात आणले आहेत:

मिसिसिपी डेल्टा आणि दक्षिण-पूर्व प्रदेश: या अति-आर्द्रता आणि मुसळधार पाऊस असणाऱ्या भागात ‘पामर अमरंथ’ सारखे भयंकर तण उगवते. यासाठी तिथे एकाच बियाण्यात ३ ते ४ तणनाशके सहन करण्याची ताकद असणारे ‘ट्रिपल-स्टॅक’ (Triple-Stacked HT) वाण दिले जातात.

टेक्सास (नैऋत्य शुष्क प्रदेश): या अत्यंत कोरड्या, वादळी आणि निम-शुष्क हवामानासाठी ‘स्टॉर्म-प्रूफ HT’ बियाणे विकसित केले गेले आहेत, जे कमी पाण्यात तग धरतात आणि ज्यांची बोंडे वादळात गळून पडत नाहीत.

कॅलिफोर्निया आणि ॲरिझोना (पश्चिम सिंचन प्रदेश): इथे पाऊस पडत नाही, शेती पूर्णपणे सिंचनावर होते. या उष्ण हवामानासाठी प्रामुख्याने लांब धाग्याचा, उच्च दर्जाचा ‘पिमा’ (Pima HT) कापूस प्रकार स्थानिक गरजेनुसार स्वतंत्रपणे डिझाईन केला गेला आहे.



ओक्लाहोमा आणि कॅन्सस (उत्तर सीमांत प्रदेश): इथे उन्हाळा अतिशय लहान असतो आणि लवकरच बर्फवृष्टी सुरू होते. या राज्यांसाठी अतिशय कमी कालावधीत, लवकर तयार होणारे ‘अर्ली-मॅच्युरिंग HT’ वाण पुरवले जातात.

घटक राज्यांच्या सीमा बदलल्या की हवामानानुसार बियाणांचे तंत्रज्ञान बदलण्याची ही अद्भुत क्षमता केवळ आणि केवळ मुक्त बाजारपेठेमुळे शक्य झाली आहे. भारतात मात्र याच्या अगदी उलट आणि संतापजनक चित्र आहे. विदर्भाची कोरडवाहू शेती, पंजाबची सिंचनाखालील शेती, गुजरातचे हवामान आणि दक्षिण भारताची जमीन यात जमीन-अस्मानाचा फरक असूनही, आपल्या वातानुकूलित सरकारी खोल्यांमध्ये बसलेल्या नोकरशहांना त्याचे साधे स्वप्नही पडत नाही. संपूर्ण देशातील वेगवेगळ्या हवामानावर सरकारी पातळीवरून एकच जुनाट बियाणे लादले जाते. स्थानिक गरजेनुसार संशोधनाचे हे स्वातंत्र्य नाकारल्यामुळेच भारतीय शेती सुरुवातीलाच या शर्यतीत मागे पडते.

✍ **मकरंद डोइजड**

या संपूर्ण अपयशाचे सर्वात मोठे धनी म्हणजे आपल्या सरकारी संशोधन व्यवस्थेत बसलेले पांढरपेशा अधिकारी आणि सरकारी नोकर आहेत. या यंत्रणेत शास्त्रज्ञांचे किंवा अधिकाऱ्यांचे मूल्यमापन त्यांच्या संशोधनाच्या यशावर किंवा शेतकऱ्याला झालेल्या थेट आर्थिक फायद्यावर कधीच होत नाही; तर ते केवळ त्यांच्या नोकरीच्या ज्येष्ठतेवर (Seniority) आणि सरकारी फाईल्सच्या पूर्ततेवर होते. एकदा सरकारी नोकरीची सुरक्षा आणि पेन्शन निश्चित झाली की, नवीन शोध लावण्याची ऊर्मी आणि व्यावसायिक धडपड पूर्णपणे नष्ट होते.

शास्त्रज्ञाने शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करणारे बियाणे शोधले काय, किंवा केवळ कागदावर अहवाल लिहून कपाटात बंद करून ठेवले काय, त्यांच्या पगारावर काहीही फरक पडत नाही. ही व्यवस्था नवीन विचारांना जन्माला घालणारी नसून, केवळ सरकारी निधी आणि अनुदानाचा अपव्यय करणारी एक ‘पांढरा हत्ती’ बनली आहे.

त्याहून भयंकर गोष्ट म्हणजे सरकारी नोकरशाहीची लाल फित आणि तांत्रिक गुलामी होय. भारतात जर एखाद्या प्रतिभावान शास्त्रज्ञाला किंवा शेतकऱ्याला स्वतःच्या बळावर नवीन प्रयोग करायचा असेल, तर ‘जीईएसी’ (उँणे) सारख्या अवाढव्य सरकारी कमिट्यांची भिंत ओलांडावी लागते. एका बियाणाला मंजुरी मिळण्यासाठी १० ते १५ वर्षे सरकारी मंत्रालयांच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे दर वाढतात आणि शेतकऱ्याला नफा मिळण्याची आशा असते, तेव्हा देशांतर्गत कापड गिरण्यांना स्वस्त कापूस मिळावा म्हणून हेच सरकारी नोकर तातडीने आयात शुल्क शून्य करून परदेशी कापूस देशात आणतात. खुल्या बाजारातील मागणीनुसार शेतकऱ्याला त्याच्या मालाची खरी किंमत मिळवण्यापासून कायद्याने रोखायचे आणि नंतर ‘किमान हमीभाव’ (MSP) किंवा सबसिडीच्या १० पैशांच्या कुबड्या देऊन उपकाराचा आव आणायचा, हाच इथल्या धोरणांचा क्रूर चेहरा आहे.

कापसाच्या किंवा एकूणच शेतीच्या जागतिक बाजारात ही स्पर्धा दोन शेतकऱ्यांमध्ये नाहीच, तर ती एका बाजूला पूर्ण आर्थिक व तांत्रिक स्वातंत्र्य असलेल्या परदेशी उद्योजक-शेतकऱ्यामध्ये आणि दुसऱ्या बाजूला सरकारी नियमांच्या, अकार्यक्षम विजेच्या आणि जुन्या तंत्रज्ञानाच्या साखळदंडाने बांधलेल्या भारतीय शेतकऱ्यामध्ये आहे. जोपर्यंत आपण शेती आणि संशोधनाला सरकारी नोकरशाहीच्या आणि मक्तेदारीच्या विळख्यातून मुक्त करत नाही, जोपर्यंत खाजगी भांडवलाला आणि पेटंट संरक्षणाला खुली मुभा दिली जात नाही, तोपर्यंत भारतीय शेती अशीच मागासलेली राहील. भारतीय शेतकऱ्याला आज सरकारकडून अनुदानाच्या किंवा मोफत सोयींच्या भीकेची गरज नाही; त्याला गरज आहे ती फक्त आणि फक्त सरकारी बंधनांतून आणि कायदेशीर कचाट्यातून कायमच्या ‘स्वातंत्र्याची’.

# स्थानिक गुन्हे शाखेचा 'सर्जिकल स्ट्राईक' ; अवैध शस्त्र माफियांचे धाबे दणाणले!

## दोन दिवसांत ४ गावठी पिस्टल जप्त, ५ सराईत आरोपी जेरबंद

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रांचा सुळसुळाट वाढत असताना स्थानिक गुन्हे शाखेने राबविलेल्या 'विशेष ड्राईव्ह' अंतर्गत अक्षरशः सर्जिकल स्ट्राईक करत शस्त्र माफियांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. सलग दुसऱ्या दिवशी धडक कारवाई करत रामदासपेठ व सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून दोन देशी कट्टे, जिवंत काडतुसे जप्त करून दोन आरोपींना अटक करण्यात आली. विशेष म्हणजे मागील दोन दिवसांत पातुर, उरळ, रामदासपेठ आणि सिव्हिल लाईन परिसरातून एकूण चार गावठी पिस्टल जप्त करण्यात आल्या असून पाच आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

अकोल्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या जबरी चोरी, दरोडे, खंडणी आणि टोळीबाज गुन्ह्यांमागे अवैध अग्निशस्त्रांचा वाढता वापर चिंतेचा विषय बनला होता. याच पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी 'ऑपरेशन प्रहार'ची मोहीम सुरू केली असून, स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हेगारांच्या मुळावर घाव घालण्यास सुरुवात केली आहे.

**सराईत गुन्हेगार पुन्हा कट्ट्यासह पकडला :** अटक करण्यात आलेला सचिन बलखंडे हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील कुख्यात गुन्हेगार आहे. खुनाचा प्रयत्न, दंगल, ॲट्रॉसिटी, मारहाण, शस्त्र बाळगणे अशा अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये त्याचे नाव आहे. त्याच्यावर दोन वेळा एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई झाली होती. तरीही तो पुन्हा अवैध शस्त्रांसह सापडल्याने कायद्याचा धाक गुन्हेगारांवर किती कमी झाला आहे, हे स्पष्ट झाले.

**अकोल्यात एवढी शस्त्रे येतात तरी कुठून? :** दोन दिवसांत झालेल्या या सलग कारवायांमुळे आता सर्वसामान्य नागरिकांमध्ये एकच प्रश्न चर्चिला जात आहे तो म्हणजे अकोला जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात देशी कट्टे येतात तरी कुठून?

### ▶▶ 'कट्ट्यांचा जिल्हा' बनतोय अकोला?

दोन दिवसांत चार गावठी पिस्टल जप्त झाल्याने अकोल्यातील अवैध शस्त्रांच्या वाढत्या प्रवाहावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शस्त्रांचा पुरवठा करणारे मुख्य सूत्रधार कोण? सीमावर्ती राज्यांमधून शस्त्रे कोणाच्या माध्यमातून आणली जातात? आणि स्थानिक गुन्हेगारांपर्यंत ती कशी पोहोचतात? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात पोलीस यंत्रणा गुंतली असून, 'ऑपरेशन प्रहार'च्या पुढील टप्प्यात आणखी मोठे मासे जाळ्यात अडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



गेल्या काही वर्षांत अकोला जिल्ह्यात शस्त्र जप्तीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. पोलिसांच्या तपासातून मध्य प्रदेशसह इतर राज्यांतील अवैध शस्त्रनिर्मिती केंद्रांशी काही गुन्हेगारी टोळ्यांचे संबंध असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. शस्त्रांचा हा काळाबाजार मोडून काढण्यासाठी केवळ वाहक नव्हे तर पुरवठादार, आर्थिक साखळी आणि मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

**मोठ्या गुन्ह्यांपूर्वीच पोलिसांचा घाव :** अटक करण्यात आलेल्या पाचही आरोपींविरुद्ध जबरी चोरी, दरोडा, खुनाचा प्रयत्न, गंभीर मारहाण, अवैध शस्त्र बाळगणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

त्यामुळे ही टोळी आणखी एखाद्या मोठ्या गुन्ह्याच्या तयारीत होती का, याचाही तपास सुरू आहे. वेळेत झालेल्या या कारवाईमुळे संभाव्य गंभीर गुन्हे टळल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे.

### ▶▶ 'विशेष ड्राईव्ह'चे शिलेदार

ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजिद पठाण, पोलीस अंमलदार अब्दुल मजीद, महेंद्र मालिये, वासिमोद्दीन, रवी खंदारे, किशोर सोनोने, गोकुळ चव्हाण, स्वप्नील खेडेकर, एजाज अहमद, सुलतान पठाण, स्वप्नील चौधरी, अमोल दिपके, अशोक सोनावणे, सतीश पवार, सायबर अंमलदार आशिष आमले, चालक अंमलदार देवानंद खरात आणि मनीष ठाकरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**नांदेडचे फरार आरोपी अकोल्यात 'सक्रिय' :** या तपासात आणखी धक्कादायक माहिती पुढे आली. सुरज सोनटक्के व अतिश सूर्यवंशी हे नांदेड जिल्ह्यातील जबरी चोरीच्या गंभीर गुन्ह्यात फरार असल्याचे उघड झाले. नांदेड पोलिसांची नजर चुकवून हे आरोपी अकोल्यात वास्तव्यास होते. केटरिंग व्यवसायाच्या आडून अवैध शस्त्रांचा व्यवहार आणि गुन्हेगारी कारवाया सुरू असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### "एका आरोपीने उघड केले संपूर्ण नेटवर्क

यापूर्वी पातुर आणि उरळ परिसरातून देशी कट्ट्यासह अटक करण्यात आलेला सुरज ऊर्फ सुऱ्या शंकर सोनटक्के हा पोलिसांसाठी महत्त्वाचा धागा ठरला. चौकशीदरम्यान त्याने दिलेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि काही तासांतच आणखी दोन शस्त्रधारी आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकले. रामदासपेठ हद्दीतील मनपा शाळा क्रमांक ७ जवळील पाण्याच्या टाकीसमोर सापळा रचून सचिन मुकुंद बलखंडे याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून मॅगझीनसह एक देशी कट्टा आणि एक जिवंत काडतूस असा सुमारे ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यानंतर सिव्हिल लाईन हद्दीतील लहान उमरी परिसरात कारवाई करत आदेश उर्फ पा प्रभाकर आठवले याच्याकडूनही एक देशी कट्टा, मॅगझीन आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपींविरुद्ध आर्म्स ॲक्टनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे मेगा कृषी कर्ज मेळावा

**अकोला :** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अकोला विभागीय कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'देशव्यापी मेगा कृषी कर्ज पोहोच कार्यक्रम' शनिवारी औद्योगिक वसाहतीतील हॉटेल बारोमासी येथे झाला. खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. जिल्ह्यातील प्रत्येक गरजू शेतकरी बांधवांना कृषी कर्ज वितरणाचा लाभ मिळावा, असे निर्देश खासदार श्री. धोत्रे यांनी यावेळी दिले.

'बियाण्यापासून ते बाजारपेठेपर्यंत - शेतकरी समृद्धी, बँक प्रगती' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित असलेल्या या विशेष मेळाव्यात शेकडो शेतकरी, कृषी उद्योजक आणि व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अकोला क्षेत्रीय प्रमुख पंकज कुमार यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि बँकेच्या वतीने शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.

या प्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य कार्यालयाचे डीजीएम दिलीप बरनवाल आणि नयन सिन्हा यांनी बँकेच्या पत धोरणांविषयी मार्गदर्शन केले.

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (F2725995) And Also Passport No My Wife's Passport (J6270378) From **ABHIJIT NARESH SHAH** - TO - **ABHIJIT NARESHKUMAR SHAH** My Residential Address is -- 22 Arham Bungalow Navrang Society Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My SON'S Passport No is (F2725995) From **SEEMA SHAH** - TO - **SEEMA NARESHKUMAR SHAH** My Residential Address is -- 22 Arham Bungalow Navrang Society Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My SON'S Passport No is (P3440875) From **HETAL MANOJKUMAR SHAH** - TO - **HETAL MANOJ SHAH** My Residential Address is - Raghuveer 9 A Navrang Society New, Radhakishan Plot, Near M B Vidyalay, Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My SON'S Passport No is (F2725995) From NARESH SHAH - TO - NARESHKUMAR RAMANLAL SHAH My Residential Address is - 22 Arham Bungalow Navrang Society Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My Passport No is (P3440875) From **SAHIL MANOJKUMAR SHAH** - TO - **SAHIL MANOJ SHAH** My Residential Address is - Near M B School, 9 Navrang Society New, Radhakishan Plot, Akola Maharashtra 444001.

**Change In Name**
I Have Change My Name in My SON'S Passport No is (P3440875) From **MANOJKUMAR JAWAHARLAL SHAH** - TO - **MANOJ JAWAHARLAL SHAH** My Residential Address is - Raghuveer 9 A Navrang Society New, Radhakishan Plot, Near M B Vidyalay, Akola Maharashtra 444001.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी - ५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दोन वर्षांपासून रखडले वर्गखोलीचे बांधकाम ; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## खेट्री येथील उर्दू शाळेचा प्रकार ; पालक व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या नवीन वर्गखोलीचे बांधकाम गेल्या दोन वर्षांपासून संथ गतीने सुरू असून अद्यापही अपूर्ण अवस्थेत आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात पालक व ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.



शाळेच्या जुन्या वर्गखोल्या जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळावे, यासाठी शासनाकडून नवीन वर्गखोलीच्या बांधकामासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात काम सुरू होऊन दोन शैक्षणिक सत्रे उलटून गेली तरी बांधकाम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे आगामी शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांना धोकादायक व जीर्ण वर्गखोल्यांमध्येच शिक्षण घ्यावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

स्थानिक पालकांनी यासंदर्भात संबंधित विभागाकडे अनेकदा तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने नाराजी वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असताना बांधकाम पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

### ▶▶ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील अनेक वर्गखोल्या जीर्ण अवस्थेत आहेत. विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत असल्याची परिस्थिती आहे. अशा वेळी नवीन वर्गखोलीचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण होणे अपेक्षित असताना दोन शैक्षणिक सत्रे संपूनही काम अपूर्ण राहिल्याने प्रशासनाच्या नियोजनशून्यतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

ग्रामस्थांच्या मते, शाळेतील अनेक वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून त्या विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत आहेत. अशा परिस्थितीत नवीन वर्गखोलीचे काम तातडीने पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र दोन वर्षांचा कालावधी लोटूनही काम अर्धवट राहिल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थ व पालकांकडून करण्यात येत आहे.

**विद्यार्थ्यांच्या जीविताची वाट पाहत आहेत का?**

'गेल्या दोन वर्षांपासून वर्गखोलीचे बांधकाम सुरू आहे. मात्र अद्यापही ते पूर्ण झालेले नाही. त्यामुळे यंदाही विद्यार्थ्यांना जीर्ण वर्गखोल्यांमध्येच शिक्षण घ्यावे लागणार आहे. प्रशासन विद्यार्थ्यांच्या जीवितहानीची वाट पाहत आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे,'

**- मो. अशफाक ,**
पालक ( खेट्री )

# शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा ; रक्तदान शिबिरातून शिवभक्तांची समाजसेवा



■ प्रतिनिधी | अकोट ■

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अकोट शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शिवस्मरण करण्यात आले. मराठा सेवा संघ तालुका शाखेच्या वतीने शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, तर वीर छत्रपती ग्रुपच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी बोलताना मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवश्री राममूर्ती वालसिंगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला. शिवरायांनी बहुजन समाजातील अठरा पगड जातींमध्ये स्वाभिमान जागवून रयतेचे स्वराज्य निर्माण केले. त्यांचा इतिहास आणि शिवनीतीचा अभ्यास आजही जगभर केला जात असून शिवरायांचे स्मरण अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते, असे त्यांनी सांगितले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन व हारार्पण करण्यात आले. 'जय जिजाऊ, जय शिवराय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी कु. स्मितेजा लोडम या अवघ्या सहा वर्षीय चिमुरडीने ओजस्वी स्वरात शिवगर्जना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. तिच्या प्रभावी सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

दरम्यान, शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून वीर छत्रपती ग्रुपच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराचे उद्घाटन प्रथम रक्तदाता शरद पांडे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे, राजुभाऊ नागमते, मराठा सेवा संघाचे सदस्य, वीर छत्रपती ग्रुपचे कार्यकर्ते तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात सुमारे ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त झालेल्या या उपक्रमांमुळे अकोटमध्ये शिवभक्तीबरोबरच समाजसेवेचाही संदेश देण्यात आला.

## भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात नवा ट्विस्ट!

# 'बदल करण्याचा अधिकार आहे' म्हणणाऱ्या अभियंत्यांना तक्रारदारांचे आव्हान ; 'अधिकार असेल तर लेखी दाखवा!'

● दोन अंदाजपत्रकांवरील वाद आणखी पेटला
● अपहार झाकण्यासाठीच नवीन भूमिका घेतल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

भोकर-काळेगाव रस्ता व लहान पूल बांधकाम प्रकरणातील संशयाचे धुके दूर होण्याऐवजी दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. ई-निविदेत अपलोड करण्यात आलेले मूळ अंदाजपत्रक आणि नंतर समोर आलेले दुसरे अंदाजपत्रक यावरून सुरू झालेल्या वादात आता कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांच्या एका दाव्याने नव्याने खळबळ उडाली आहे. टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही कामामध्ये आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना असल्याचे इंगळे यांनी सांगितल्याची माहिती समोर आली आहे. मात्र हा दावा समोर येताच तक्रारदार अरविंद पाटील यांनी त्यावर जोरदार आक्षेप घेत थेट आव्हानच दिले आहे.

पाटील यांच्या म्हणण्यानुसार, टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मूळ स्वरूपातील कामात किंवा अंदाजपत्रकात मनमानी बदल करण्याचा कोणताही अधिकार कार्यकारी अभियंत्यांना नसतो. जर असा अधिकार खरोखरच अस्तित्वात असेल, तर त्यासंदर्भातील शासन निर्णय, नियमावली, प्रशासकीय तरतूद किंवा सक्षम प्राधिकरणाचा आदेश लेखी स्वरूपात जनतेसमोर सादर करावा. केवळ तोंडी दावे करून गंभीर प्रश्नांची उत्तरे टाळण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



**'दुसरे अंदाजपत्रक' नेमके कुठून आले?**

या प्रकरणातील सर्वात मोठा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. ई-निविदा प्रक्रियेदरम्यान अपलोड झालेले अंदाजपत्रक हेच अधिकृत दस्तावेज मानले जाते. त्याच आधारे निविदा प्रक्रिया पूर्ण होते, कंत्राट मंजूर होते आणि निधी वितरित केला जातो. असे असताना नंतर माहिती अधिकारातून अथवा चौकशीदरम्यान वेगळे अंदाजपत्रक समोर येण्यामागे नेमके कारण काय, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

जर टेंडरनंतर बदल करण्यात आले असतील, तर त्यासंदर्भातील प्रस्ताव, तांत्रिक मंजुरी, सुधारित प्रशासकीय मान्यता, सक्षम अधिकाऱ्यांचे आदेश आणि नोंदी सार्वजनिक का केल्या जात नाहीत? असा सवाल आता उपस्थित होत आहे. उलट या सर्व कागदपत्रांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा विभागात रंगू लागली आहे.

**'अधिकार असेल तर लेखी द्या!'**

तक्रारदार अरविंद पाटील यांनी या संपूर्ण प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 'कार्यकारी अभियंता बदल करण्याचा अधिकार असल्याचे सांगत असतील, तर त्यांनी तो अधिकार नेमक्या कोणत्या नियमांतर्गत आहे, हे लेखी स्वरूपात द्यावे. केवळ बोलून चालणार नाही.

जनतेचा पैसा खर्च झालेल्या कामात बदल झाले असतील, तर त्याची संपूर्ण प्रक्रिया कागदोपत्री असणे आवश्यक आहे. जर लेखी पुरावा नसेल, तर हा दावा केवळ स्वतःची बाजू वाचविण्यासाठी केला जात असल्याचा संशय बळावतो,' असे पाटील यांनी म्हटले आहे.

**अपहार झाकण्यासाठीच नवा बचाव?**

या प्रकरणात सुरुवातीपासूनच कामाच्या गुणवत्तेवर, अंदाजपत्रकातील तरतुदींवर, प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या स्वरूपावर आणि प्रयोगशाळा चाचणीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत आता 'टेंडरनंतर बदल करण्याचा अधिकार' हा मुद्दा पुढे आणण्यात येत असल्याने संशय अधिकच वाढला आहे.

तक्रारदारांच्या मते, मूळ अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष काम यामधील तफावत समोर आल्यानंतरच हा नवीन बचाव पुढे आणला जात आहे. कामातील कथित अनियमितता, निधीचा वापर आणि कागदोपत्री विसंगती याकडून लक्ष विचलित करण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरू असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे. 'जर सर्व काही नियमांनुसार झाले असेल, तर प्रत्येक बदलाची अधिकृत नोंद दाखविण्यात अडचण काय?' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

**उत्तरांची प्रतीक्षा असलेले नवे प्रश्न...**

- ▶▶ टेंडरनंतर बदल करण्याचा अधिकार नेमका कोणत्या नियमांतर्गत आहे?
- ▶▶ त्या अधिकाराचा वापर भोकर काळेगाव कामात करण्यात आला का?
- ▶▶ बदलासंदर्भातील लेखी मंजुरी आणि आदेश कुठे आहेत?
- ▶▶ मूळ ई-निविदेतील अंदाजपत्रक आणि सध्या दाखविले जाणारे अंदाजपत्रक वेगळे का आहे?
- ▶▶ हा सर्व प्रकार नियमित प्रक्रिया होती की नंतर करण्यात आलेली कागदोपत्री जुळवाजुळव?

*या प्रश्नांची अधिकृत आणि कागदोपत्री उत्तरे मिळेपर्यंत भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणातील वाद शांत होण्याची चिन्हे दिसत नाहीत.*

# परतवाडा बस स्थानक परिसरात लागले १८ सीसीटीव्ही कॅमेरे

## -प्रवाशांची सुरक्षा, चोरीच्या घटनेवर लागणार अंकुश



अचलपूर/प्रतिनिधीः-

राज्यातील विविध ठिकाणी, बाहेरगावी जाण्यासाठी परतवाडा बस स्थानक परिसरात प्रवाशांची प्रचंड गर्दी असते .मात्र परतवाडा बस स्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरा अभावी प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे अनेक वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते. आणि स्थानिक जनप्रतिनिधी,लोकप्रतिनिधींनी सुद्धा हा मुद्दा शासन स्तरावर रेटून धरल्याने परतवाडा बस आगारात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून १८ नवीन सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे.यापूर्वी परतवाडा बस आगारात चोरीच्या प्रकरणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने प्रवाशी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते .तसेच खाजगी ट्रॅव्हल्स चक्क परतवाडा बस आगाराच्या प्रवेशद्वारा समोरच उभे राहून प्रवाशांची पळवा पळवी करीत होते व एजंटचे सुद्धा परतवाडा बस आगारात मोठ्या प्रमाणे सुळसुळाट असल्याचे चित्र होते.यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे परतवाडा बस आगारात प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी प्रवाशी वर्गाकडून होत होती . आता आगारात १८ सीसीटीव्ही कॅमेरे

### जनमाध्यम ने प्रकाशित केले होते वृत्त

लागत असल्याने प्रवाशी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अचलपूर- परतवाडा जुळ्या शहरासह अचलपूर तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक ,महिला मंडळी,तरुण वर्गाला ग्रामीण भागातून बाहेर गावी जाण्यासाठी प्रवाशी वर्गाची परतवाडा बस आगारात गर्दी असते .या बस स्थानकातून अमरावती ,पुणे ,संभाजीनगर ,शेगाव ,अकोला, अकोट, मोर्शी, नागपूर, यवतमाळ आदी विविध ठिकाणी प्रवाशी वर्ग प्रवास करतात. यामुळे या बस स्थानकात प्रवाशी वर्गाची प्रचंड गर्दीचा फायदा काही चोरटे घेत असल्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडले होते. वर्ष २०२४ मध्ये परतवाडा बस आगार परिसरातून बाहेरगावी जाण्यासाठी बस मध्ये बसली असता परतवाडा शहरातील निवासी सुजाता तराल यांच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी १ लक्ष २७ हजार रुपयाचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती.त्यानंतर या आगारात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी करण्यात आली होती. आता २०२६ मध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने मंजूर झालेल्या निधीतून परतवाडा बस आगारात १८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना परतवाडा बस आगार प्रमुख जीवन वानखडे यांनी दिली .

परतवाडा बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरे लागत असल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे आणि यामुळे अनुचित घटनांवर अंकुश सुद्धा लागणार आहे.

**-खासदार बळवंत वानखडे, अमरावती**

परतवाडा बस आगारात १८ सीसीटीव्ही कॅमेरे लागत आहेत. त्यामुळे महिला मंडळींच्या सुरक्षेसाठी महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र परिवहन महामंडळाने घेतल्याने राज्याचे मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो.

**-डॉ.अनिल बोंडे ,राज्यसभा खासदार.**

परतवाडा बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरे लागल्याने चोरीच्या घटनांवर अंकुश लागणार आहे . प्रवाशी वर्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लागणे गरजेचे होते. १८ सीसीटीव्ही कॅमेरे लागल्याने अनुचित घटनांवर अंकुश लागणार आहे.

**- आमदार बच्चू कडू,विधानपरिषद**

परतवाडा बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याच्या मागणीसाठी शासन स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. या आगारात महिला मंडळी ,शाळा महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मोठी गरज होती . आगारात मंगळसूत्र चोरीच्या घटना, काही समाज संकटाकडून मुलींचे छेडछाडीचे प्रकार आणि भविष्यात लवजिहाद प्रकाराला अंकुश या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून लागू शकणार आहे .एकूण परतवाडा बस आगारात १८ सीसीटीव्ही कॅमेरे लागल्याने महिला मंडळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासन स्तरावर रेटून धरलेल्या मागणीला यश मिळाले आहे . जुळ्या शहरात सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरे लागावे यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

**-आ.प्रवीण तायडे ,अचलपूर**

# पत्रकारांनी घेतला आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ

## महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन व जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आयोजन

आजच्या धावपळीच्या जीवनात प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी निरोगी जीवनशैली विकसित करण्यासाठी आहार, व्यायाम तसेच दिनचर्येवर अधिक भर देणे गरजेचे आहे. आरोग्याची वेळोवेळी तपासणी करून वेळीच औषधोपचार घेतल्याने पुढील कठिण बाबी टळतात, त्यामुळे पत्रकारांनी आपल्या दिनचर्येकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन हृदयरोगतज्ञ डॉ. निलेश चांडक यांनी यावेळी केले.

**अमरावती/प्रतिनिधीः-** अतिशय धावपळीच्या काळात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींचे आपल्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष ही गंभीर बाब होत चालली आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन, अमरावती तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने पडोळे, सचिव डॉ. नंदकिशोर भूतडा, IPP डॉ. अशोक उमप, PP फोरम अध्यक्ष डॉ. शशांक दुबे, लेडीविंग चेअरपर्सन डॉ. शीतल आचार्य, अमरावतीतील रामसाई हॉस्पिटल चे सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. निलेश चांडक, पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे आदी



रविवारी (दि.७) मराठी पत्रकार भवन येथे आरोग्य तपासणी शिबिर, रक्ततपासणी व हृदयरोग निर्मुलनाबाबत विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरासह जिल्ह्यातील पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिराला जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल तसेच प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. नीलेश चांडक यांनी विशेष उपस्थिती लाभली. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. स्वाती लबडे - मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून डॉ. सम्युअल हॅनिमन आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. डॉ. स्वाती लबडे यांनी शिबिर आयोजनाबाबतची भुमिका स्पष्ट केली. डॉक्टर्स आणि प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी हे समाजातील प्रमुख स्तंभ असून दैनंदिन धावपळीत प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींचे आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष ही गंभीर बाब असून अशा प्रकारचे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन पुढील काळात सुद्धा केले जाईल, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल तसेच डॉ. निलेश चांडक यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींची आरोग्य तपासणी व रक्त तपासणी करून त्यांना जीवनशैलीसंदर्भात डॉ. नीलेश चांडक यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. वैशाली टेंभे यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार दिलीप वानखडे यांनी केले. या कार्यक्रमाला IPCA कंपनीचे रिजनल मॅनेजर कुलदीप कपूर, एरिया मॅनेजर अमोल राऊत, मेडीकल प्रिझेंटेटिव्ह ऋषिकेश काळे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाला होमिओ डॉक्टर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. विपुल भट्टड, सहसचिव डॉ. जयंत भोसले पूर्वाध्यक्ष डॉ. गुणवंत डहाणे, डॉ. राधेश्याम मालनी, डॉ. राजीव रोडे, डॉ. प्रताप ठोके, डॉ. अनिल खेरडे, डॉ. वाठोडकर, डॉ. राजकुमार जयस्वाल, डॉ. सुभाष कासट, डॉ. नईम, डॉ. हमीद अली, डॉ. संदीप बुटे, डॉ. अभिजित रंगे, महिला कार्यकारिणी डॉ. प्रिया मोहोड, डॉ. शीतल चौधरी, डॉ. मीनल, डॉ. राणी चौधरी, डॉ. पल्लवी चौधरी, डॉ. प्रांजली जोशी ,नगरसेविका व विधी समिती उपसभापती डॉ. मधुरा कहाळे, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी संजय शेंडे, विजय ओंडे, संजय बनारसे, अनुप गाडगे, अरुण जोशी, नयन मोंढे, विवेक दोडके, सुभाष दुबे, अमर घटारे, मनीष कहाते आदींसह अनेक पत्रकार उपस्थित होते.

## सिद्धार्थ विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

अचलपूर/प्रतिनिधीः-


राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावतीद्वारे संचालित सिद्धार्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, परतवाडा येथे ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष क्षितिज मधुकरराव अभ्यंकर व संचालिका प्रा. डॉ. शुभांगी अभ्यंकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शालेय परिसरात विविध प्रजातींच्या दहा वृक्षांचे रोपण करण्यात आले तसेच त्यांच्या पाच वर्षांच्या संगोपनाचा संकल्प करण्यात आला. वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

कार्यक्रमाला सचिव गजाननराव वानखडे, सहसचिव सतीश पुंडकर, प्राचार्य दिनेश मोहोड, पर्यवेक्षक दीपक कळसकर, माजी नगरसेवक मनोज जामनेकर, संत गाडगेबाबा पतसंस्था अध्यक्ष उद्धव कोकाटे, अधीक्षक प्रमोद अभ्यंकर, तुषार देशमुख, माधवी कोकाटे, देवानंद कुरळकर, प्रणाली बोबडे, आरती गणोरकर, ज्योती कुर्हेकर, उज्वश्री धनोकार, मनिषा वैद्य, मंजुषा मळसने, तृप्ती गुल्हाणे, मेघा सदाफळे, जयंत चांडक, आकाशसिंग चौहान, अर्पण इंगळे, राम खंडार, विनायक डोईफोडे, अनिल भेडेकर, विजय यावले, दिलीप पटोरकर, तुषार खैरकर, अमोल वानखडे, राहुल धुर्वे, ऋषभ खरड, मनोज जामनेकर, जीवन फसाटे, प्रसाद देशमुख, अभिजीत डफाडे, अभिजीत बोरवार, चेतन हरणे व अक्षय बिजवे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजू हरणे, सुरेंद्र खंडारे व शुभम धाकडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वृक्ष संगोपनाची शपथ घेऊन करण्यात आली.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे प्रथमच जटिल मेंदूतील एन्युरिझम क्लिपिंग शस्त्रक्रिया

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती येथे प्रथमच मेंदूतील एन्युरिझम (Cerebral Aneurysm) या गंभीर आजारावरील अत्यंत जटिल व



मेंदूतील एन्युरिझम हा जीवघेणा आजार असून अचानक तीव्र डोकेदुखी, उलट्या, बेशुद्धावस्था, दुहेरी दिसणे, हात-पायात अशक्तपणा किंवा झटके ही त्याची लक्षणे असू शकतात. दुर्लक्ष केल्यास मेंदूमध्ये रक्तस्राव होऊन मृत्यू किंवा कायम अपंगत्व येऊ शकते. वेळेवर निदान व तातडीचे उपचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास त्वरित न्यूरोसर्जनचा सल्ला घ्यावा. **-डॉ. अंकुश वानखेडे (न्यूरोसर्जन)**

जीव वाचविणारी एन्युरिझम क्लिपिंग शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली.

सदर रुग्ण ४० वर्षीय पुरुष असुन अमरावती येथील रहिवासी आहे.रुग्णाला मागील ४-५ दिवसांपासून असह्य व तीव्र डोकेदुखीचा त्रास होत होता. नातेवाईकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. रुग्णाची तपासणी व एमआरआय ब्रेन केल्यानंतर मेंदूतील रक्तवाहिनीत एन्युरिझम असल्याचे निदान झाले. रुग्णाच्या जीवाला संभाव्य धोका लक्षात घेतान तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने एन्युरिझम क्लिपिंग शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची, आव्हानात्मक व उच्च दर्जाच्या कौशल्याची आवश्यकता असलेली असून, मेंदूतील रक्तवाहिनींवरील फुगवटा (Aneurysm) फुटण्यापासून रोखण्यासाठी विशेष क्लिप लावण्यात येते. शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून रुग्णाची प्रकृती स्थिर आहे. सदर शस्त्रक्रिया आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रियेसाठी न्यूरोसर्जरी टीममध्ये डॉ. योगेश सावदेकर, डॉ. अंकुश वानखेडे, डॉ. वैशाली धांडे , आणि डॉ. श्रीकांत शेगोकार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.भूलतज्ज्ञ डॉ. राखी वानखेडे, डॉ. बाळकृष्ण बागवले ,डॉ. दिपाली देशमुख, डॉ.अश्विनी मडावी , डॉ.उज्ज्वला मोहोड,डॉ. रोहिणी राठोड समाजसेवा अधिक्षक शितल बोंडे, डॉ. दिव्यानी मुंदाणे, डॉ.पायल रोकडे,अधिसेविका माला सुरपाम यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर दिपाली देशमुख, इंदुरकर, राहुल कावनपुरे यांचे मोलाची सहकार्य लाभले. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे अमरावती विभागातील रुग्णांना मेंदूतील एन्युरिझम सारख्या गंभीर आजारांसाठी मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता कमी होणार असून, अत्याधुनिक न्यूरोसर्जरी सेवा आता स्थानिक स्तरावर उपलब्ध होत असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. मनीषा रामटेके, शुभम गवई, स्नेहल काळे, यश गवई, विजय गवई, मंगेश लांजेवार, वेदांत

## काळगव्हाण येथील ज्येष्ठ शेतकरी रामराव जगनाडे निधन

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी** साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि आयुष्यभर शेतीत कष्ट करून माणुसकी जपणारे काळगव्हाण येथील ज्येष्ठ शेतकरी रामराव किसनराव जगनाडे (वय ८१) यांचे गुरुवारी, ४ जून रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण अंजनगाव सुर्जी तालुक्यासह काळगव्हाण परिसरात शोककळा पसरली असून, एका मार्गदर्शक व्यक्तिमत्वाला गाव मुकल्याची भावना व्यक्त होत आहे.



रामराव जगनाडे यांनी आपल्या ८१ वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासात शेतीलाच आपले दैवत मानले. कष्टकरी वृत्ती आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांनी समाजात आदराचे स्थान मिळवले होते. कुटुंबाची जबाबदारी पेलतानाच त्यांनी गावातील सामाजिक सलोखा आणि माणुसकी नेहमी जपली. त्यांच्या जाण्याने काळगव्हाण गावाने आपला 'कष्टाचा आधारवड' गमावला आहे.रामराव जगनाडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांचे चिरंजीव संदीप जगनाडे आणि सुधाकर जगनाडे हे परिसरात परिचित असून, त्यांच्या दु:खात संपूर्ण गाव सहभागी झाले आहे.गुरुवारी सायंकाळी ५ वाजता त्यांच्या राहत्या घरून अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी काळगव्हाणसह परिसरातील गावांमधील हजारो नागरिक उपस्थित होते. वडाळी देशमुख रोडवरील त्यांच्या राहत्या शेतात शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. 'रामभाऊ अमर रहे' अशा घोषणा देत आणि साश्रू नयनांनी ग्रामस्थांनी आपल्या लाडक्या मार्गदर्शकाला अखेरचा निरोप दिला.


## पाहिजेत

न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा व्दारा संचालित अनुदानित व विनाअनुदानित शाळेमध्ये रिक्त पद भरणे आहे.

| अ. क्र. | पदाचे विवरण | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | पुर्ववेळ / अर्धवेळ | वेतन | अनुदानित / विनाअनुदानित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालय शाखा एच.एस.सी.व्ही | एम.ए.मराठी. बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | घडयाळी तासिका नुसार | शासन नियमाप्रमाणे | अनुदानित | |
| | | एम.ए. इंग्रजी, बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | | | | |
| | | एम.कॉम बी.एड (व्दितीय श्रेणी) पायाभुत अभ्यासक्रम | १ | | | | |
| २ | गांधी प्राथमिकशाळा (मराठी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) | एस.एस.सी./एच.एस.सी (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी. डी.एड. मॉन्टेसरी | ३ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | विनाअनुदानित | |
| ३ | गांधी प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) | एच. एस.सी टी.ई.टी. (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी डी.एड. मॉन्टेसरी | ७ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | | |

**टिपः १)** इच्छुक पात्रता धारक उमेदवारांनी शनिवार दि.१३.०६.२०२६ ला प्रत्यक्ष मुलाखतीसाठी संस्थेचे कार्यालय, गांधी विद्यालय, बडनेरा रेल्वे. (रेल्वे स्टेशनजवळ) ता.जि. अमरावती. येथे सकाळी १०.०० वाजता आपले शैक्षणिक, व्यवसायिक व इतर पात्रतेच्या मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर राहावे.

**डॉ.श्री.बळीरामजी ना.ग्रेसपुजे**
**सभापती शाळा समन्वय समिती, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रेल्वे.ता.जि. अमरावता**

**श्री.विनोद व. चिचोळकर**
**सचिव, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा रेल्वे. ता.जि. अमरावती.**

**डॉ.श्री. हेमंतजी मु.देव**
**अध्यक्ष, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रेल्वे, ता.जि. अमरावती.**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



## जाहीर नोटीस

समस्त जनतेला / व्यक्तींना या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, श्री हिंमत गणपतराव जांभुळकर रा. अशोक नगर, नवी वस्ती, बडनेरा, ता.जि. अमरावती, श्री भाऊराव गणपतराव जांभुळकर रा. अशोक नगर, नवी वस्ती, बडनेरा, ता.जि. अमरावती व श्री लिलापाल गणपतराव जांभुळकर रा. वरुडा, ता.जि. अमरावती यांनी खालील स्थावर मिळकतीचे मालक असल्याचे कथन करून माझ्या पक्षकारासोबत ते विक्री करण्याचा करारनामा केला आहे, सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे,

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

विद्यमान दुय्यम निबंधक अमरावती शहर यांचे स्थळ सिमेतील व जिल्हा परिषद अमरावती च्या कक्षेतील **मौजे वरुडा,** ता. जि. अमरावती येथील शेत सर्व्हे / भूमापन क्र. व उपविभाग १९/२, याचे क्षेत्रफळ ३ हे. ०८ आर, भुधारण पद्धती भोगवटदार वर्ग १. आकारणी रुपये येणेप्रमाणे,११.९५ पैसे व तसेच यात असलेल्या सर्व झाडा झुडपासह व तदंगभुत वस्तु (जमिन सलग्न सर्व वस्तूसह) याची एकत्रित चर्तुः सिमा

**पूर्वस-** विजयकुमार पन्नालाल कटारिया व इतर, **पश्चिमेस** -ऐश्वर्या विनोद आंबाडकर,
**उत्तरेस-** रामेश्वर गोविंदराव सहारे, **दक्षिणेस** -सुर्यभान दादाराव पचारे व सुभाष नारायण दारोकार

उपरोक्त वर्णन केलेली मिळकतीचे खरेदीखत श्री हिंमत गणपतराव जांभुळकर, श्री भाऊराव गणपतराव जांभुळकर व श्री लिलापाल गणपतराव जांभुळकर हे माझे पक्षकार यांच्या पक्षात करून व नोंदवून देणार आहे.

तरी या नोटीसद्वारे समस्त नागरिकांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमुद मिळकतीबाबत किंवा सदर मिळकतीवर कोणाचाही, **कोणत्याही त-हेचा हक्क**, हितसंबंध, ताबा, कर्ज, गहाण व बोझा वगैरे असल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाहो कोणत्याही तहेचा आक्षेप नसल्याचे गृहीत धरून माझे पक्षकार उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे खरेदीखत करून व नोंदवून घेण्यास मोकळे राहोल व दिलेल्या वेळेनंतर कोणताही आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची समस्त व्यक्तींनो कृपया नोंद घ्यावी.तसेच या नोटीसद्वारे समस्त नागरिकांना सुचित करण्यात येते की, श्री हिंमत गणपतराव जांभुळकर, श्री भाऊराव गणपतराव जांभुळकर व श्री लिलापाल गणपतराव जांभुळकर यांच्यासोबत उपरोक्त वर्णनीत मिळकतीच्या कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरण बाबत कोणत्याही तन्हेचा करारनामा, सौदा, दस्त, लेख किंवा इतर कोणत्याही तन्हेच्या लेखी किंवा तोंडी तन्हेची बोलणी करू नये. तरीपण उपरोक्त नमूद सुचनेचे उल्लंघन करून कोणताही तन्हेचा व्यवहार वगैरे केल्यास ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची समस्त जनतेनी / व्यक्तींनी कृपया नोंद घ्यावी.

**पत्ता :-ॲड. योगेश पी. बाफणा**
राष्ट्रीय इलेक्ट्रीक सोसायटी समोर, नमुना गल्ली नं. २, अमरावती,
ऑफीस मध्ये भेटण्याची वेळ - सकाळी ८ ते १०

ॲड. योगेश पी. बाफणा



## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

**आर.एम.जे.सी. २४०/२०२६** **ने. ता. ०७/०७/२०२६**

**अर्जदार :-१. चंदा नेमीचंदजी छाजेड,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा. मारवाडी पुरा, चांदुर बाजार ता. चांदुर बाजार जि. अमरावती
**२. कपील नेमीचंद छाजेड,** वय ३३ वर्ष व्यवसाय शेती व बीझनेस
रा. भट्ट लेआऊट, चांदुर बाजार ता. चांदुर बाजार जि. अमरावती
**३. विपील नेमीचंद छाजेड,** वय ३२ वर्ष व्यवसाय शेती व बीझनेस
**४. ऋषभ नेमीचंद छाजेड,** वय २७ वर्ष व्यवसाय शेती व बीझनेस
अर्जदार क्र. १. ३ व ४ रा. मारवाडी पुरा, चांदुर बाजार ता. चांदुर बाजार जि. अमरावती

........विरूध्द....... गैरअर्जदार :- निरंक

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक नेमीचंद मोहनलालजी छाजेड** यांचा **मृत्यु दि. ०६/१२/२०२५** रोजी रा. चांदुर बाजार ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. २४०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ११/०५/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक सहायक अधीक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**



## जाहीर सुचना

श्रीराम मंदिर संस्थान, रिद्धपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती रजि.नं. ए-११९२/अमरावती या संस्थानच्या परिसरातील इमारतीच्या भिंतीचे बांधकाम करावयाचे असल्याने सदर कामाकरीता बांधकामाचे लोखंड, सिमेंट, रेती, गिट्टी, विटा, कुशल कामगार व इत्यादीची आवश्यक वस्तुंची आवश्यकता आहे. तरी ईच्छुक मटेरीअल सप्लायर्स, स्टील / बांधकाम कंत्राटदार, कुशल कामगार यांनी खालील पत्त्यावर दि.१०.०६.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत संपर्क साधावा.

**दिनांक : ०७.०६.२०२६**
**अचलपुर**

**ए.पी. नानवटकर**
**सचिव श्रीराम मंदीर संस्थान, रिद्धपूर,र.नं. A-११९२ अमरावती**

**संपर्कासाठी पत्ता :-**
श्री हरिदास पंजाबराव नानवटकर रिद्धपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती. मो.नं. ९८६०५९४४४१

### वर्धा येथे वाळूमाफियांचे साम्राज्य;महसूल विभागाचे 'अर्थकारण' उघड

# घाट बंद होण्याआधी कोट्यवधींचा खेळ

## अंबडच्या तहसीलदाराच्या लाचखोरीनंतर वधेमध्येही एसीबी चौकशीची मागणी

**वर्धा/ रवींद्र लाखे**



जिल्ह्यातील वाळूघाट ९ जूनपासून बंद होणार असतानाच वाळू व्यवसायातील काळे अर्थकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. जालना जिल्ह्यातील अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना तब्बल ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहात पकडल्यानंतर वर्ध्यातील वाळू साठ्यांवरही संशयाची सुई रोखली गेली आहे. शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर वाळूचे साठे उभे असताना महसूल विभाग मात्र हात झटकत असल्याचे चित्र दिसत आहे.

वर्धा शहरात अनेक ठिकाणी ३० ते ३५ टिप्पर वाळू साठवून ठेवण्यात आली आहे. काही वाळूमाफियांनी तर बांधकाम परवानगीचा आधार घेत वाळू साठविण्याची नवी शक्कल लढवली आहे. शहरातील एका संस्थेची जागा भाड्याने घेऊन तेथे मोठ्या प्रमाणात वाळूचा साठा करण्यात आल्याची चर्चा आहे.

मात्र याबाबत महसूल विभागाकडे विचारणा केली असता 'बांधकामासाठी वाळू जमा केली आहे' असे तयार उत्तर दिले जात असल्याने नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.विशेष म्हणजे वाळू साठ्यांची माहिती, परवानग्या आणि तपासणीबाबत स्पष्ट माहिती देण्याऐवजी महसूल प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे वाळूमाफिया आणि महसूल विभाग यांच्यात आर्थिक साटेलोटे तर नाही ना असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

अंबड तहसीलदार विजय चव्हाण प्रकरणाने संपूर्ण महसूल यंत्रणेलाच हादरा दिला आहे. एका महिन्याच्या हप्त्यासाठी ७ लाखांची मागणी आणि ६.४० लाखांची लाच स्वीकारताना झालेली कारवाई पाहता वाळू व्यवसायातून किती मोठे आर्थिक व्यवहार होत असतील याची कल्पना येते.त्यामुळे वर्धा जिल्ह्यात वाळू व्यवसाय सुरू झाल्यापासून आजपर्यंत किती पैसे उकळले गेले, कोणाच्या आशीर्वादाने अवैध साठे उभे राहिले आणि महसूल यंत्रणेतील कोणाचे हात बरबटले आहेत, याचा एसीबीने सखोल तपास करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**.. तर जिल्हाधिकारी जागे व्हावेत**

जिल्हाधिकारी महोदया यांनी स्वतः पुढाकार घेऊन शहरातील सर्व वाळू साठ्यांची तपासणी करावी, परवानग्यांची पडताळणी करावी आणि नियमबाह्य साठे जप्त करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा घाट बंद होण्यापूर्वीच वाळूमाफिया लाखो-कोट्यवधींची कमाई करून प्रशासनाला आव्हान देत राहतील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## पुलगावच्या नव्या ठाणेदारांसमोर अवैध धंद्यांचे 'महाआव्हान'

### गावठी दारू, सट्टा बाजार आणि बंद पोलीस चौक्यांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न; ठाणेदार ढाकने यांची कसोटी सुरू

**विरूळ (आकाजी)/ जनमाध्यम**



पुलगाव पोलिस ठाण्यात नवनियुक्त ठाणेदार म्हणून ढाकने यांनी पदभार स्वीकारताच त्यांच्या समोर अवैध धंद्यांचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. सहा महिन्यांपूर्वीच पुलगाव येथे रुजू झालेले ठाणेदार यशवंत सोलसे यांची अचानक बदली झाल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त होत असतानाच नव्या अधिकाऱ्यांवर कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी अधिक वाढली आहे.

पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत वायफड, रोहणा, विरूळ, रसुलाबाद, सोरटा यांसारखी मोठी गावे समाविष्ट आहेत. या भागात अनेक वर्षांपासून गावठी दारू विक्री, हातभट्टी आणि सट्टा बाजाराचे जाळे पसरल्याची चर्चा आहे. अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी या अवैध व्यवसायांवर अंकुश आणण्याचा प्रयत्न केला, मात्र धंदे बंद होण्याऐवजी अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसत आहे. अनेक गावांत खुलेआम दारू विक्री आणि सट्टा बाजार सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. विशेष म्हणजे, रोहणा येथील पोलिस चौकी अनेक दिवसांपासून बंद असल्याने पोलिसांचा धाक कमी झाल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. चौकी बंद असल्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे फावले असून ग्रामीण भागात कायद्याचे अस्तित्वच प्रश्नचिन्हाखाली आले आहे.पुलगाव ठाण्याच्या हद्दीतील अनेक गावे जंगलव्याप्त व दुर्गम भागात आहेत. या परिसरात हातभट्ट्यांचा धूर निघत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे गावठी दारू निर्मिती आणि विक्रीचे जाळे मोडीत काढण्यासाठी कठोर मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. नवनियुक्त ठाणेदार ढाकने यांच्यासाठी हा पदभार केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून अवैध धंद्यांविरोधातील निर्णायक लढाई ठरणार आहे. गावठी दारू, सट्टा बाजार आणि निष्क्रिय पोलिस चौक्यांच्या प्रश्नावर ते किती प्रभावी कारवाई करतात, याकडे संपूर्ण पुलगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे. नागरिकांना आता केवळ आश्वासने नव्हे, तर प्रत्यक्ष कारवाईची अपेक्षा आहे.

## एटीएममधून फाटक्या नोटांचा सुळसुळाट, नागरिकांमध्ये संताप




**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील रामनगर परिसरातील एचडीएफसी बँकेच्या एटीएममधून पैसे काढणाऱ्या नागरिकांना फाटक्या व खराब नोटा मिळाल्याचा प्रकार समोर आला आहे. एका नागरिकाने एटीएममधून रक्कम काढल्यानंतर त्यामध्ये शंभर रुपयांच्या दोन नोटा फाटक्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित नागरिकाने दुसऱ्या दिवशी एचडीएफसी बँकेत जाऊन तक्रार केल्यानंतर बँकेने त्या नोटा बदलून दिल्या. मात्र, हा प्रकार रात्रीच्या वेळी घडला असता किंवा सुट्टीच्या दिवशी एटीएममधून फाटक्या नोटा मिळाल्या असत्या तर ग्राहकांनी काय करावे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.एटीएममध्ये चलन भरण्यापूर्वी नोटांची तपासणी केली जाते का, फाटक्या व खराब नोटा मशीनमध्ये टाकल्या जातात तरी कशा?यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. एटीएममधून पैसे काढणाऱ्या ग्राहकांना स्वच्छ व वापरण्यायोग्य नोटा मिळणे ही बँकेची जबाबदारी आहे. पुनरावृत्ती होऊ नये यासाठी संबंधित बँक अधिकाऱ्यांनी तसेच जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रामनगर परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## सायकलचे चाक फिरले,पर्यावरण रक्षणाचा संदेश घरोघरी पोहोचला

### एनसीसीच्या 'ग्रीन वॉरियर्स'ची देवळीत जनजागृती; माजी खासदार रामदास तडस यांचे आवाहन

**देवळी/जनमाध्यम**



जागतिक सायकल दिनानिमित्त देवळी शहरात एनसीसीच्या छात्र सैनिकांनी पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत भव्य सायकल रॅली काढली. २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यशवंत कन्या माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात माजी खासदार रामदास तडस यांनी हिरवा झेंडा दाखवून सायकल अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी स्वतःही छात्र सैनिकांसोबत सायकल चालवत नागरिकांना सायकल चालवा, तंदुरुस्त रहा असा संदेश दिला.यावेळी बोलताना तडस म्हणाले की, दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास वाढत असून त्यासाठी आपणच जबाबदार आहोत. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार ही काळाची गरज आहे. सायकलचा वापर केल्याने प्रदूषण कमी होण्यास मदत होतेच, शिवाय आरोग्यही सुदृढ राहते. त्यामुळे निरोगी जीवनाचा खरा मुलमंत्र सायकलच असल्याचे त्यांनी नमूद केले. सायकल रॅलीची सुरुवात यशवंत शाळेतून झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरत एनसीसी कॅडेट्सनी सायकल चालवा, पर्यावरण वाचवा, सायकल चालवा, इंधन वाचवा आणि सायकल चालवा, निरोगी रहा अशा घोषणा देत जनजागृती केली. कार्यक्रमाला एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, नगरसेवक उमेश कामडी, पत्रकार संतोष तुरक आणि गणेश शेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कॅप्टन मोहन गुजरकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, एनसीसीचे 'ग्रीन वॉरियर्स' समाजात हरित जीवनशैलीचा प्रचार करण्यासाठी विविध उपक्रम राबविणार आहेत. सायकल संस्कृती रुजवून अधिकाधिक तरुणांना पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीत सहभागी करून घेण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. या अभियानात एनसीसीचे अनेक छात्र सैनिक सहभागी झाले. कार्यक्रमाचे संचालन आरती मरघडे यांनी केले तर आभार प्रदर्शन साक्षी पारीसे यांनी मानले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने देवळीकरांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

## अधिक मासाची पावन पर्वणी; धाम नदीत श्रद्धेची डुबकी

### येळाकेळी येथे भाविकांची मोठी गर्दी; स्नान, जप-तप आणि दानधर्माने भक्तिमय वातावरण



**येळाकेळी/जनमाध्यम**

अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासाच्या पवित्र पर्वणीमुळे येळाकेळी येथील धाम नदीकाठी भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा संगम अनुभवायला मिळत आहे. पवित्र स्नानासाठी पहाटेपासूनच भाविकांनी नदीकाठी गर्दी केल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

हिंदू धर्मात अधिक मासाला विशेष महत्त्व आहे. चांद्र आणि सौर वर्षातील तफावत भरून काढण्यासाठी दर तीन वर्षांनी येणारा हा महिना भगवान विष्णूंना समर्पित मानला जातो. त्यामुळे या महिन्यात केलेले जप, तप, व्रत, उपवास, दानधर्म आणि तीर्थस्नान यांना विशेष पुण्यप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेपोटी परिसरातील तसेच दूरवरच्या गावांमधील भाविक धाम नदीत स्नान करण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत.

स्नानानंतर अनेक भाविकांनी नदीकाठी पूजा-अर्चा, नामस्मरण आणि धार्मिक विधी केले. महिलांचा सहभागही लक्षणीय असून अनेक कुटुंबांनी एकत्र येऊन धार्मिक परंपरांचे पालन केले. अधिक मासात अन्नदान, वस्त्रदान आणि गरजूंना मदतीचा हात देणे हेही पुण्यकारक मानले जाते. त्यामुळे अनेक ठिकाणी दानधर्माचे उपक्रमही राबविले जात आहेत. धाम नदीच्या पवित्र जलात स्नान करताना भाविकांच्या चेहऱ्यावर दिसणारी समाधानाची भावना आणि ईश्वरभक्तीचे दर्शन सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने येळाकेळी परिसरात दररोज श्रद्धेचा महापूर उसळत असून, नदीकाठी भक्ती आणि अध्यात्माची अनोखी अनुभूती भाविकांना लाभत आहे. श्रद्धा, भक्ती आणि पुण्यसंचयाचा हा सोहळा पुढील काही दिवस सुरू राहणार असल्याने भाविकांची गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार-मुख्यमंत्री

### नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांत 'उडान' प्रकल्पाला पाच वर्षांची मुदतवाढ



**मुंबई/जनमाध्यम**

राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

## मोबाईल टॉवरच्या सात बॅटऱ्या चोरी

**वर्धा-** पवनार येथील शेतशिवारात असलेल्या मोबाईल टॉवरमधून सात बॅटऱ्या चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. टॉवरखालील लोखंडी रॅकमध्ये बॅटऱ्या ठेवण्यात आल्या होत्या. अज्ञात चोरट्याने संधी साधून सुमारे २८ हजार रुपये किमतीच्या सात बॅटऱ्या चोरून नेल्या. चोरीची बाब लक्षात येताच संबंधितांनी पोलिसांत धाव घेतली. अमोल गुजर यांनी दिलेल्या तक्रारीवरून सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, नागपूर/वर्धा**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
१ला मजला, हज हाऊस, गंजीपेट नागपूर-४४००१८
फोन: ०७१२-२९९५८४२
क्र. मारवणम/चौक्षी/J.V.K.Na./२९७/२०२६ दिनांक:- ४ जून २०२६
**(जाहीर प्रगटन)**
उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.
**वक्फ संस्थेचे नाव आणि पत्ता:** जामा मशीद, गाव. रसूलबाद, ता. आरवी, जि. वर्धा (MSBW/WRD/68/2011)
उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. फिरोज खान अब्दुल्ला खान यांनी दिनांक ०१/०६/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ पाच (५) वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत हात वर करुन निवडण्यात येईल अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| १ | फिरोज खान अब्दुल्ला खान | अध्यक्ष |
| २ | इज्जज्खा सिकंदरखा पठाण | उपाध्यक्ष |
| ३ | काझी हाफिजुद्दीन काझी हकीमुद्दीन | सचिव |
| ४ | शब्बीर खा दाऊद खा पठाण | सह-सचिव |
| ५ | सय्यद रेहान सय्यद हनीफ | खजिनदार |
| ६ | सलीमुद्दीन करीमुद्दीन काझी | सदस्य |
| ७ | इमाम गुलाम शेख | सदस्य |
| ८ | मोहम्मद रफीक शेख जाफर | सदस्य |
| ९ | दानिश कामिल शेख | सदस्य |
| १० | नदीम खान तस्लीम खान पठाण | सदस्य |
| ११ | अशफाकखान मुस्तफाखॉ पठाण | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत. जिल्हा वक्फ अधिकारी, नागपूर, १ ला मजला, हज हाऊस, गंजीपेठ, नागपूर-४४००१८ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.
**(तौसिफ मौलासाहेब नायकवडी)**
**प्र. जिल्हा वक्फ अधिकारी वर्धा**

**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, नागपूर/वर्धा**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
१ला मजला, हज हाऊस, गंजीपेट नागपूर-४४००१८ फोन: ०७१२-२९९५८४२
क्र. मारवणम/चौक्षी/J.V.K.Na./२९८/२०२६ दिनांक:- ४ जून २०२६
**(जाहीर प्रगटन)**
उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.
वक्फ संस्थेचे नाव आणि पत्ता: मस्जिद अलमास, ता. पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा (MSBW/WRD/5/2006)
उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. अब्दुल हफीज शेख मेहताब यांनी दिनांक ०१/०६/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ पाच (५) वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत हात वर करुन निवडण्यात येईल अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| १ | रफिक दादा शहा | अध्यक्ष |
| २ | वसीम अख्तर शेख हुसेन | उपाध्यक्ष |
| ३ | अब्दुल हाफीज शेख मेहताब | सचिव |
| ४ | अस्लम खान मुस्तफा खान | सह-सचिव |
| ५ | मोहम्मद हनीफ मोहम्मद युसूफ | खजिनदार |
| ६ | अब्दुल कादिर शेख नझीर | सदस्य |
| ७ | मोहम्मद साजीद अब्दुल रफीक शेख | सदस्य |
| ८ | मोहसिन खान जमीर खान | सदस्य |
| ९ | शेख बशीर शेख कासिम | सदस्य |
| १० | सय्यद जावेद सय्यद शब्बीर | सदस्य |
| ११ | इलियास खान फय्याज खान | सदस्य |
| १२ | मोहम्मद अनीस मोहम्मद युनूस | सदस्य |
| १३ | सैय्यद शोयब सैय्यद जाकीर अली | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत. जिल्हा वक्फ अधिकारी, नागपूर, १ ला मजला, हज हाऊस, गंजीपेठ, नागपूर-४४००१८ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.
**(तौसिफ मौलासाहेब नायकवडी)**
**प्र. जिल्हा वक्फ अधिकारी वर्धा**

**नावात बदल**
माझे पासपोर्ट नंबर N7942618 वरील माझे NITYHAS BURADKAR असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील NITYAHAS R A M E S H BURADKAR हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता : सुदामपुरी वर्धा ४४२००१**

**नावात बदल**
माझे पूर्वी RUBEENA KARDAR S GHANI KARDAR असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील RUBINA ABUL QASIM ANSARI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता :- लक्ष्मी नगर जिल्हा वर्धा ४४२००१**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १९१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**
**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### पर्यावरण दिनी कापडी पिशव्यांचे वितरण

**अमरावती-** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून स्थानिक खोलापूरी गेट येथील प्रभात एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या प्रभात निसर्ग संस्कार मंडळाच्या वतीने प्लास्टिक कॅरीबॅग ला पर्याय म्हणून नागरिकांना कापडी पिशव्याचे नि:शुल्क वाटप करण्यात आले. मार्डी रोड, अमरावती येथील ग्रीन सर्कल येथे तीन दिवसीय निवासी 'निसर्ग स्नेही जगण्याच्या दिशा' या विषयावरील २२व्या विदर्भ पर्यावरण परिषदेचे आयोजन प्रभात एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून करण्यात आले होते. या परिषदेची फलश्रुती म्हणून प्लास्टिक कॅरी बॅगच्या वापराला कमी करण्यासाठी प्रभात निसर्ग संस्कार मंडळाच्या वतीने साडीदान अभियान सुरू करण्यात आले. ज्या साडी वापरून झाल्या अशा विविध प्रकारच्या साड्या संस्थेला दान करण्याचे आवाहन संस्थाध्यक्ष वि. दा. पवार यांनी नागरिकांना केले. यावेळी प्रभात निसर्ग संस्कार मंडळाचे अध्यक्ष एल के व्ही पवार, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन विदर्भ पर्यावरण परिषदेचे जिल्हा समन्वयक वि. दा. पवार, अखिल भारतीय रेडिओ श्रोता संघाचे सचिव संजय वाघुळे, सामाजिक कार्यकर्ते शुभम अग्रवाल, संस्था सचिव कविता पवार, निसर्ग संस्कार मंडळचे सदस्य शेख अली राजा, सोहम अग्रवाल, सुरेंद्र धामणकर, अथर्व पवार, गजानन माहुलकर, नरेंद्र पाटणे, शिलाबाई अग्रवाल व मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

### २२ जूनला आमदार चषक खुली राष्ट्रीय योगासन स्पर्धा




**अचलपूर-** अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या प्रेरणेने आणि योगाचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने आमदार चषक ओपन नॅशनल योगासन स्पर्धा २०२६ चे आयोजन येत्या २२ जून २०२६ रोजी मिल कॉलनी मोती मंगल कार्यालय, अमरावती रोड, अचलपूर येथे करण्यात आले आहे.आयोजन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, लाईफ स्टाईल योगा क्लासेस, परतवाडा तसेच प्रा. संतोष चंदेल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेमुळे योगासन खेळाला चालना मिळण्यासोबतच युवकांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण होणार आहे. स्पर्धेमध्ये ८ ते १४, १४ ते १८, १८ ते २६, २६ ते ३५, ३५ ते ४५ आणि ४५ ते ५५ वर्षे अशा विविध वयोगटांचा समावेश असून देशभरातील योगासनपटूंना सहभागाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्पर्धेतील ाथम क्रमांकासाठी ५,१००, द्वितीय क्रमांकासाठी२,१०० आणि तृतीय क्रमांकासाठी १,१०० तसेच ट्रॉफी व पदक देण्यात येणार आहे.स्पर्धेत पारंपरिक योगासने सादर केली जाणार असून प्रत्येक स्पर्धकाला ३ अनिवार्य व २ ऐच्छिक योगासने सादर करावी लागतील. राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या निकषांनुसार परीक्षकांकडून मूल्यमापन केले जाणार आहे.स्पर्धेसाठी नोंदणी शुल्क २०० असून नोंदणीची अंतिम तारीख १० जून २०२६ आहे.अधिक माहितीसाठी ओम इंगोले (९३७०२२६८०९), रोहन बेडरकर (९३०७१४६८४३) व साई शेंडे (७४१०७७२३३४) यांच्याशी संपर्क साधावा.

### 'शेतकरी तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह' आंदोलन बुधवारी

अमरावती-शेतीला केवळ उदरनिर्वाहाचे साधन न ठेवता, तिला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन खऱ्या अर्थाने 'अॅग्रो-बिझनेस' (agriBUSINESS) बनवण्याची वेळ आता आली आहे. आपल्या घामाची योग्य किंमत मिळवण्यासाठी आणि शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी एकत्र या!याकरीता आंदोलन करण्यात येणार असून आंदोलन स्थळ: वाका चार-रस्ता, तळोदा रोड, (पथराई शिवार), नंदुरबार (गुजरात बॉर्डर) येथे बुधवार १० जून २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता होईल. आंदोलनाची प्रमुख भूमिका आणि उद्दिष्टे:-चतुरंग शेती आधुनिक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान (Biotech), डिजिटल क्रांती आणि जागतिक बाजारपेठेची सांगड घालून शाश्वत व नफा देणारी शेती विकसित करणे. htBt कापूस (htBt COTTON): हे केवळ एक वाण नसून, पारंपरिक शेतीचे व्यावसायिक आणि फायदेशीर शेतीत रूपांतर करणारे एक प्रभावी माध्यम आहे.तंत्रज्ञान स्वातंत्र्य: शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीचे आधुनिक तंत्रज्ञान, बियाणे आणि औषधे वापरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.या सत्याग्रहात शेतकऱ्यांचे हक्क आणि त्यांच्या हितासाठी सर्वांनी भाग घ्यावा अशी विनेती शेतकरी संघटना,,शेतकरी महिला आघाडी ,स्वतंत्र भारत पक्ष यांनी केले आहे. नंदुरबार येथे आयोजित या ऐतिहासिक 'किसान तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रहात' बहुसंख्येने उपस्थित राहा. पाऊल टाकूया!असे आवाहन विलास ताथोड यांनी केले आहे.अधिक माहितीकरीता विलास ताथोड राज्य कार्यकारणी सदस्य,शरद जोशी द्वारा स्थापित शेतकरी संघटना, अकोला.मो.७०२०५८५२६१ यावर संपर्क साधावा.

### तबलावादक प्रसाद पांडे यांना पितृशोक



**अमरावती-** केडिया नगर येथील रहिवासी असलेले तबलावादक प्रसाद पांडे यांचे वडील रमेशचंद्र लं.पांडे यांचे शनिवार ६ जून २०२६ रोजी सकाळी ४ च्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर हिंदू स्मशान भूमी अमरावती येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, मुलगा, जावई, नातवंडे असा बराच मोठा गोतावळा व आप्त मित्र परिवार आहे.अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने जीवन जगणारे रमेशचंद्र पांडे यांना आध्यात्माची सुद्धा विशेष आवड होती.केडिया नगर येथील सार्वजनिक हनुमान मंदिर संस्थानाचे ते विशेष सेवेकरी राहिले असून मंदिराच्या प्रत्येक धार्मिक कार्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान नेहमीच असायचे. त्यांना त्यांच्या केडिया नगर येथील सर्व आध्यात्मिक मित्र परिवारा तर्फे श्रद्धांजली वाहली.

# मेळघाटच्या प्रश्नांवर बच्चू कडू आक्रमक

## संपर्क अभियानात शिवसेनेत प्रवेशाचा ओघ, प्रशासनाला आंदोलनचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

मेळघाटातील पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार, वनहक्क आणि रस्त्यांच्या प्रश्नांसाठी काढण्यात आलेल्या ऐतिहासिक मेळघाट संघर्ष महापदयात्रेनंतरही अनेक प्रश्न कायम असल्याचा आरोप करत आमदार बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा प्रशासनावर हल्लाबोल चढवला आहे. शिवसेना पक्ष आणि प्रहार सामाजिक संघटनेच्या संयुक्त संपर्क अभियानांतर्गत शनिवारी त्यांनी धारणी व चिखलदरा तालुक्यातील विविध गावांचा दौरा करून नागरिकांशी थेट संवाद साधला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या धारणी तालुक्यातील मोगर्दा आणि चिखलदरा तालुक्यातील गडगाभांडूम या गावांना भेट देत बच्चू कडू यांनी ग्रामस्थांचे अभिनंदन केले. यावेळी ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करत पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शिक्षण, रस्ते आणि रोजगाराशी संबंधित अनेक समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.दौऱ्यादरम्यान विविध गावांतील अनेक नागरिकांनी शिवसेनेत प्रवेश केला. स्थानिक पातळीवर शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासोबतच जनतेचे प्रश्न थेट जाणून घेण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



अभियानांतर्गत बच्चू कडू यांनी मेळघाटात थेट जनसंपर्कावर भर दिला आहे. केवळ पक्षवाढ हा या अभियानाचा उद्देश नसून गावागावात जाऊन नागरिकांसोबत बैठका, चर्चासत्रे आणि संवाद साधत स्थानिक प्रश्नांची तीव्रता समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. गडगाभांडूम येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना बच्चू कडू यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली. 'मेळघाट संघर्ष यात्रेनंतर प्रशासनाला पुरेसा वेळ देण्यात आला. मात्र अनेक कामे आजही कागदावरच आहेत. अधिकारी बैठका घेतात, अहवाल पाठवतात; पण जनतेच्या आयुष्यात बदल घडविण्याची इच्छाशक्ती दिसत नाही. मेळघाटातील विकास रखडण्यास प्रशासनाची निष्क्रियता कारणीभूत आहे,' असा आरोप त्यांनी केला.यावेळी त्यांनी मेळघाटातील वीज प्रश्नावरही संताप व्यक्त केला.

बच्चू कडू यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, संघर्ष यात्रेदरम्यान प्रशासनाला देण्यात आलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी झाली नाही, तर दिवाळीच्या काळात हजारो नागरिकांना सोबत घेऊन अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य घेराव घालण्यात येईल. तसेच मेळघाटातील वीज प्रश्नावर स्वतंत्र आणि व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

### प्रशासनाला इशारा

मेळघाटच्या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर दिवाळीत हजारो नागरिकांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर घेराव घालण्यात येईल. आता आश्वासनांचा नव्हे तर कृतीचा काळ आहे.

■ आ.बच्चू कडू

## खारपानपट्ट्यातील महिलांचा सेंद्रिय शेतीकडे कल

### घरच्या घरी तयार केला दशपर्णी अर्क

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने भातकुली तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या फार्मर कप स्पर्धेत महिला शेतकरी गटांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसून येत आहे. स्पर्धेसाठी तालुक्यातील ७९ महिला व पुरुष शेतकरी गटांनी नोंदणी केली असून सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

टाकरखेडा संभू येथील नारीशक्ती हरितक्रांती महिला शेतकरी गटाने कपाशी पिकासाठी तब्बल २०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला आहे. गटाच्या निमंत्रक पौर्णिमा सवाई यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी हा उपक्रम राबविला.दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी कडुलिंब, सिताफळ, धोत्रा, निरगुडी, रुई, पपई, रायमुनी, गुळवेल, लाल कन्हेर आणि करंज या दहा वनस्पतींचा पाला वापरण्यात आला. यामध्ये दोन किलो हिरवी मिरची, एक किलो लसूण, पाच किलो गूळ आणि पाच लिटर गोमूत्र मिसळून



२०० लिटर पाण्यात हे मिश्रण तयार करण्यात आले. हे द्रावण ४० दिवस सावलीत ठेवून दिवसातून दोन वेळा ढवळले जाते. त्यानंतर गाळून फवारणीसाठी वापरले जाते.

दशपर्णी अर्क हे नैसर्गिक कीटकनाशक व बुरशीनाशक म्हणून प्रभावी मानले जाते. पिकावर कीड येण्यापूर्वी फवारणी केल्यास किडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. तसेच रासायनिक कीटकनाशकांवरील खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळते.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय कीटकनाशक निर्मितीबाबत जागरूकता वाढत असून उत्पादन खर्च कमी करण्यासाठी मोठी मदत होत आहे. मुलांनीही निंबोळ्या गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

डिजिटल शेती शाळा आणि व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून तज्ज्ञांचे सातत्याने मार्गदर्शन मिळत असल्याने शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत कमी खर्चात अधिक उत्पादनाच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

या उपक्रमात पौर्णिमा सवाई, संगीता नाचनकर, जयश्री लाळे, कुसुम मेश्राम, पूजा शेंडे, छाया सवाई, अरुणा लाळे, पुष्पा जामठे, उज्वला पिंगळे, वृंदा मानकर आणि सुशीला मेश्राम यांचा सहभाग होता.

### सुरक्षा शपथ आणि वृक्षारोपणाने महावितरणचा वर्धापन दिन

## मुख्य अभियंत्यांचे पर्यावरण संवर्धन व सुरक्षेचे आवाहन

**अमरावती/का.प्र**

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनावर महावितरणच्या मुख्य कार्यालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन करत, महावितरणचा २१ वा वर्धापन दिन यंदा अमरावती परिमंडळात अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरण संवर्धन आणि सुरक्षेचा कृतीशील संदेश दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'सुरक्षा शपथ' घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता अशोक साळुंके म्हणाले की,'वीज क्षेत्रात चुकीला अजिबात माफी नाही, त्यामुळे सतर्कता हीच खरी सुरक्षा आहे.' वीज कर्मचाऱ्यांनी फील्डवर काम करताना सुरक्षेची सर्व मानके पाळून आणि आवश्यक काळजी घेऊनच कामे करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

'विजेशी सावधगिरी बाळगणे ही केवळ महावितरण कर्मचाऱ्यांचीच नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. उन्हाळ्यात केवळ कुलरमध्ये पाणी टाकताना होणाऱ्या किरकोळ दुर्लक्षामुळे दरवर्षी अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. यासाठी समाजातही वीज सुरक्षेबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे.'वाढत्या तापमानाचा संदर्भ देत मुख्य अभियंत्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या महत्त्वावर विशेष भर दिला. ग्लोबल वॉर्मिंगच्या काळात पर्यावरण टिकवणे ही काळाची गरज बनली असून, महावितरणच्या प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या सोयीनुसार दरवर्षी किमान एक झाड लावून त्याचे प्रामाणिकपणे संवर्धन करावे, असा संकल्प त्यांनी मांडला.

या प्रसंगी बोलताना अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी ग्राहकांना पर्यावरणपूरक डिजिटल सेवांचा वापर करण्याचे आवाहन केले.वर्धापन दिनाचे औचित्य साधून मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या हस्ते विद्युत भवन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अहीर, प्रणाली विश्लेषक नितीन नांदुरकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक शिरिष शहा यांच्यासह महावितरणचे सर्व वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन व्यवस्थापक विकास बांबल यांनी केले.



## श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवारातर्फे श्रीक्षेत्र शेगाव येथे सामूहिक पारायण

**अमरावती/का.प्र.**

श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचा भव्य सामूहिक पारायण सोहळा रविवार ७ जून रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

श्री माहेश्वरी भवन, एसटी स्टँडसमोर, शेगाव येथे सकाळी ८.३० वाजता पारायणास प्रारंभ झाला. विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो भाविकांनी या





ऐतिहासिक व धार्मिक सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून श्री परमहंस परशराम महाराजांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. सामूहिक पारायणादरम्यान संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

पारायणानंतर भाविकांनी महाराजांच्या महिमा ग्रंथातील उपदेश व विचारांचे चिंतन केले. त्यानंतर सर्व उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी भाविकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पाहावयास मिळाले.

या यशस्वी आयोजनासाठी जयंत वानखड, गोकुळ शेगोकर, शंकर खवले, शैव गुरव हितकारणी मंडळ, अमरावतीचे अध्यक्ष शरद देवरणकर, जयंत पुसदकर, भालचं कथलकर, राजू कथलकर, अशोक भारसाकळे, प्रशांत देशमुख, परशराम डोरस, पुरुषोत्तम खंडार, सुरेश रोहनकर, कैलास डांगे, शुभम पुसतकर, ओम मोरे, मोहन पंडीत, दिपक राजनकर, संतोष दुत्तोंडे, अशोक आगरकर, चंद्रकांत पुसदकर, दत्ता कापसे, सचिन चौधरी, गणेश भांडे, सचिन आरोकर, संदीप राजूरकर, हरिहर तांबस्कर, प्रभाकर शेगोकर, महेंद्र कथलकर, श्रीरामशंकर जयस्वाल, दिलीप बेलबागकर, गोपाल चिखलकर, मनोज तायडे, राजू पुसतकर, दत्ता शिंदे, अनिल निहाटकर व नारायण डांडगे, अजय वाघमारे जयेंद्र पाटील, बंडूपंत मोरे, सतीश पांडे इतर सर्व संस्थांवरील सेवेकरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सेवाधारी, दानशूर भक्तण, ज्या समाज बांधवांनी व भक्तांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग दिला तसेच सर्व पत्रकार बंधूंचे सुद्धा त्यांनी महाराजांच्या कार्याचे प्रचार प्रसार मध्ये मोलाचा सहभाग दिला या सर्वांचे आभार आयोजक जयंत सुरेशराव वानखडे अमरावती यांनी मानले


### संत बेंडोजी बाबा पालखी सोहळयासाठी वारकऱ्यांची लगबग

## घुईखेडहून १२ जूनला पंढरीकडे वारीचे प्रस्थान

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

वारकरी संप्रदायाच्या श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचे प्रतीक असलेली घुईखेड येथील श्री संत बेंडोजी बाबा संस्थानची पायी दिंडी यंदाही मोठ्या उत्साहात पंढरपूरकडे रवाना होणार आहे. तब्बल १३७ वर्षांची परंपरा जपणारी ही मानाची दिंडी १२ जून रोजी घुईखेड येथून प्रस्थान करणार असून २५ जुलै रोजी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे दाखल होणार आहे.

घुईखेड ते पंढरपूर हा सुमारे ९१० किलोमीटरचा प्रवास वारकरी पायी पूर्ण करणार आहेत. विशेष म्हणजे पैठण आणि आळंदी मार्गे होणाऱ्या या वारीत सहभागी होणारे वारकरी आळंदी ते पंढरपूर असा आणखी सुमारे २६० किलोमीटरचा प्रवास संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासोबत करणार आहेत. एकूण ४७ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे श्री परमपूज्य ब्रह्मलीन संत बेंडोजी बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने आयोजित करण्यात येणारी ही दिंडी १२ जून रोजी घुईखेडहून निघून २५ जूनला पैठण येथे पोहोचेल. त्यानंतर २६ जून रोजी पैठणहून प्रस्थान करून ७ जुलै रोजी आळंदी गाठेल. ८ जुलै रोजी आळंदीहून पुढील प्रवास सुरू होऊन २५ जुलैला दिंडी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर या दिंडीचे विशेष महत्त्व मानले जाते.



१३७ वर्षांची अखंड परंपरा

घुईखेड येथील दिंडीला संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात मानाचे स्थान आहे. माऊलींच्या रथामागे असलेल्या २१ मानाच्या दिंड्यांमध्ये या दिंडीचा १७वा क्रमांक असून विदर्भातून सहभागी होणारी ही एकमेव मानाची दिंडी असल्याचे विशेष मानले जाते.इतिहासाची साक्ष देणारे संत बेंडोजी महाराज संस्थान हे अत्यंत प्राचीन असून वारकरी परंपरेचा वारसा जपत अनेक पिढ्यांपासून ही वारी सुरू आहे. बदलत्या काळात आधुनिक साधनसुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी पायी वारीची परंपरा आजही तितक्याच निष्ठेने आणि भक्तिभावाने जपली जात असल्याचे या सोहळ्यातून दिसून येते.दिंडीच्या संपूर्ण मार्गावर विविध गावांमध्ये वारकऱ्यांसाठी निवास, चहा, नाश्ता व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे हजारो वारकऱ्यांचा हा प्रवास केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक ऐक्य आणि सेवाभावाचेही दर्शन घडविणारा ठरत आहे.

**वारीत सहभागी होण्याची संधी**

घुईखेड ते पंढरपूर पायी वारीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी संत बेंडोजी बाबा संस्थान, घुईखेड येथे नावनोंदणी करावी, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, विश्वस्त प्रवीण घुईखेडकर व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि नियोजन संस्थानतर्फे करण्यात येणार आहे.

### भागवत कथेला प्रारंभ

**कुऱ्हा-** अधिकमास पुरुषोत्तम मास पर्वावर श्री महारूद्र मारूती संस्थान श्री जहागीरपूर येथे संगीतमय भागवत कथेला प्रारंभ भागवत कथेचे मुख्य यजमान मनोज गोपालदास चांडक (बोर्डा) यांचे वडील स्व.गोपालदास हरिरामजी चांडक व आई स्व. पुष्पाबाई गोपालदास चांडक व भाऊ स्व.मनमोहन गोपालदास चांडक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.कथा प्रवक्त्या ह.भ.प.भूमिका तिरमारे यांच्या अमृत वाणीतून येणाऱ्या हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत भागवत कथा सुरु असून त्यांच्या सोबत ह.भ.प. कु.समृद्धी मुळे, (तबलावादक), ह.भ.प ज्ञानेश्वर घोटकर, नारायण वानखडे (ऑक्टोपॅड वादक), ह.भ.प. रविंद्र तिरमारे (गायक) शेषराव वानखडे (झाकी) यांचा सहभाग आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अंततः

# ४८ कोटींच्या वसुलीत महसूलचा 'धृतराष्ट्र न्याय'

## आदिवासीच्या सातबाऱ्यावर संपूर्ण बोजा; चांडक कुटुंबाच्या संपत्तीकडे डोळेझाक?

### जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे आदेश; ४८ कोटी दंडाच्या प्रकरणासह परिसरातील सर्व खदानांची तपासणी सुरू

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील बहुचर्चित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणातील तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचा विषय आता केवळ महसूल वसुलीपुरता मर्यादित राहिलेला नसून प्रशासनाच्या निष्पक्षतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. या प्रकरणात जिल्हाधिकारी अकोला यांनी स्वतः दखल घेत ४ जून रोजी अकोटचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच दैनिक 'जनमाध्यम'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांच्या अनुषंगाने गाजीपूर परिसरातील सर्व खदानांची चौकशी करण्याचेही निर्देश देण्यात आल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

मात्र या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे ४८ कोटी रुपयांचा दंड हा विलास कालू चिमोटे आणि संतोष चांडक या दोघांच्या नावावर असताना महसूल प्रशासनाने वसुलीची संपूर्ण जबाबदारी केवळ आदिवासी बांधव विलास चिमोटे यांच्या जमिनीवर टाकल्याचे वास्तव.

महसूल विभागाने चिमोटे यांच्या शेतजमिनीच्या सातबाऱ्यावर शासनाचा दावा नोंदवून संपूर्ण दंडाची रक्कम दाखविली आहे. मात्र दुसरीकडे याच प्रकरणातील दुसरे दंडित पक्षकार असलेल्या




संतोष चांडक यांच्या नावावरील महसूल प्रशासनाने या संपत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला का, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे सामान्य नागरिकाच्या थकबाकीसाठी गावपातळीवरील यंत्रणा तात्काळ सक्रिय होत असते. जप्ती, नोटिसा, सातबारा नोंदी, बँक खात्यांवरील निर्बंध यांसारख्या कारवाया झपाट्याने होतात. मात्र कोट्यवधी रुपयांच्या शासन दंडाच्या वसुलीच्या बाबतीत महसूल विभागाची गती अचानक मंदावल्याचे दिसत असल्याने संशय अधिकच बळावत आहे.

**मंत्रालयात लक्षवेधी, तरीही मग्रुरी कायम ?**

या संपूर्ण प्रकरणाचे पडसाद मंत्रालयापर्यंत उमटले. विधानमंडळात लक्षवेधीद्वारे मुद्दा उपस्थित झाला. माध्यमांनी सातत्याने प्रश्न उपस्थित केले. तरीदेखील संबंधित पक्षकारांकडून 'आमचे काहीच वाकडे झाले नाही, आता काय होणार?' अशा स्वरूपाचे उद्गार सार्वजनिक ठिकाणी काढले जात असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत. जर हे खरे असेल तर प्रशासनाच्या कारवाईबाबत संबंधितांना इतका आत्मविश्वास कसा? कोणाच्या पाठबळावर ही मग्रुरी सुरू आहे? असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.

किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावरील मालमत्तांवर कुठल्याही प्रकारचा बोजा नोंदविण्यात आलेला नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या कारवाईत समान न्यायाचा अभाव असल्याची टीका आता उघडपणे होऊ लागली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अकोट शहर व परिसरात चांडक कुटुंबाच्या नावावर अनेक स्थावर मालमत्ता, व्यावसायिक आस्थापना, उद्योग आणि विविध आर्थिक साधनसंपत्ती अस्तित्वात आहेत. काही मालमत्तांवर बँकांचे कर्ज असले, काही सातबारे बंदिस्त असले तरी त्या मालमत्तांचे अस्तित्व नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीत

स्थानिक पातळीवर आता उघडपणे असा प्रश्न विचारला जात आहे की, जर दंड आदेश दोघांवर असेल तर बोजाही दोघांच्या मालमत्तांवर समान प्रमाणात का नोंदविण्यात आला नाही? आदिवासी शेतकऱ्याच्या नावावरील जमिनीवर संपूर्ण ४८ कोटींचा बोजा चढविण्याची तत्परता दाखविणारे अधिकारी चांडक कुटुंबाच्या संपत्तीबाबत मात्र 'धृतराष्ट्रा'ची भूमिका का घेत आहेत? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी आदेशानंतर महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. कारण चौकशीचा विषय केवळ अवैध उत्खननापुरता मर्यादित राहिलेला नसून दंड वसुली प्रक्रियेत कोणाला संरक्षण देण्यात आले का, याचाही शोध घेण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, गाजीपूर परिसरातील इतर खदानांच्या चौकशीचे आदेश देण्यात आल्याने अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या गौण खनिज व्यवहारांचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे आगामी काळात महसूल प्रशासन, खनिज विभाग आणि संबंधित व्यावसायिकांच्या भूमिकेवर मोठे प्रश्न निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

■ **जिल्हाधिकाऱ्यांची थेट एन्ट्री-**

४ जून रोजी जिल्हाधिकारी अकोला यांनी अकोटचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना गाजीपूर प्रकरणासंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच 'जनमाध्यम' मधील वृत्त श्रृंखलेची दखल घेत परिसरातील सर्व खदानांची चौकशी करण्याचे निर्देश दिल्याने प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे.

■ **दंड दोघांवर; बोजा एकाच्यावर?**

४८ कोटी रुपयांचा दंड विलास चिमोटे आणि संतोष चांडक या दोघांच्या नावावर असताना महसूल विभागाने संपूर्ण बोजा केवळ विलास चिमोटे यांच्या शेतजमिनीवर नोंदविल्याची बाब चर्चेत आहे. दुसऱ्या दंडित पक्षकाराच्या मालमत्तांवर कोणतीही तत्सम कारवाई झालेली नसल्याचे सांगितले जात आहे.

■ **उद्याच्या अंकात...**

चांडक व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर असलेल्या विविध स्थावर मालमत्ता, त्यावरील बँकांचे बोजे, बंदिस्त सातबारे, व्यावसायिक आस्थापना आणि महसूल प्रशासनाच्या नजरेआड राहिलेल्या संपत्तीचे धक्कादायक तपशील दस्तऐवजांसह. 'संपत्ती समोर असूनही महसूल विभागाला ती दिसत का नाही?' या प्रश्नाचा सविस्तर खुलासा उद्याच्या अंकात.

# मान्सूनची प्रतीक्षा कायम; अनेक तालुके अजूनही पावसापासून दूर

## जिल्ह्यात संथ सुरुवात,सरासरी ३३ टक्के पावसाची नोंद

**अमरावता/प्रतिनिधीः-** जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अमरावती जिल्ह्यात मान्सूनची सुरुवात अपेक्षेप्रमाणे झालेली नसल्याचे चित्र आहे. ७ जूनपर्यंत जिल्ह्यात सरासरी ३४ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ ११.३ मिमी पावसाची नोंद झाली असून ही सरासरीच्या ३३.२ टक्के इतकी आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस धारणी तालुक्यात नोंदविण्यात आला आहे. येथे जून महिन्याच्या सरासरी ३९ मिमी पावसापैकी ३३.५ मिमी पाऊस पडला असून तो ८५.९ टक्के इतका आहे. त्यापाठोपाठ दर्यापूरमध्ये १७.४ मिमी (६८.८ टक्के) आणि अंजनगावमध्ये १५.७ मिमी (६२.३ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. दुसरीकडे मोर्शी तालुक्यात सर्वात कमी १.८ मिमी पाऊस नोंदविण्यात आला असून तो सरासरीच्या केवळ ५.२ टक्के आहे. तसेच



चांदूरबाजारमध्ये २.४ मिमी (९.२ टक्के), चिखलदऱ्यात ५.९ मिमी (१३.१ टक्के), तिवसामध्ये ४.१ मिमी (१४.१ टक्के) आणि अचलपूरमध्ये ५.५ मिमी (१५.७ टक्के) पाऊस पडला आहे. अमरावती शहरात १५.४ मिमी पावसाची नोंद झाली असून ती सरासरीच्या ३८.८ टक्के आहे. नांदगाव खंडेश्वर येथे १७.८ मिमी (५१.१ टक्के), चांदूर रेल्वे येथे १३.१ मिमी (३९.५ टक्के) तर धामणगाव रेल्वे येथे १५ मिमी (३२.८ टक्के) पाऊस ☞(पान २ वर)

# भरधाव कारची दोन दुचाकींना धडक -एक ठार, दोघे गंभीर

## आरोपीला अखेर बेड्या, -चांदुरबाजार-बोराळा मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्या बेफाम चालकामुळे आणखी एका निष्पाप नागरिकाचा जीव गेला आहे. चांदूर बाजार-अमरावती मार्गावरील बोराळा गावाजवळ शनिवारी रात्री घडलेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. भरधाव वेगात असलेल्या कारने दोन दुचाकींना अक्षरशः उडवून दिल्याने हा रक्तरंजित अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, रिद्धपूर येथील मुरसलीन खान निसार खान (वय ५०) हे अमरावतीकडे जात असताना त्यांच्या वाहनातील इंधन संपले. त्यामुळे त्यांनी चांदूर बाजारकडे परत जाण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी अमरावतीहून चांदूर बाजारच्या दिशेने जाणारे परिचित मोहम्मद आरिफ मोहम्मद रफीक (वय ३८) आणि सै. वसीम सै. हाफिज (वय ३५) यांच्याकडे त्यांनी लिफ्ट मागितली. मात्र काही क्षणांतच काळाने घाला घातला. चांदूर बाजारकडून भरधाव वेगात येणाऱ्या एमएच-०४/डीएन-१५४३ क्रमांकाच्या कारचा चालक ऋतिक शेषराव लसनकर ☞(पान २ वर)

■ **आणखी किती बळी गेल्यावर जाग येणार?**

मद्यधुंद चालकांमुळे रस्त्यांवर निष्पाप नागरिकांचे जीव जात असतानाही अशा घटनांमध्ये अपेक्षित कठोरता दिसून येत नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. एका कुटुंबाचा आधार हिरावून घेणाऱ्या या घटनेमुळे मद्यधुंद वाहनचालकांविरोधात अधिक कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

# परतवाडा बस आगाराच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीविरुद्ध धडक मोहीम

**अचलपूर/प्रतिनिधीः-** राज्य परिवहन महामंडळाच्या महसुलावर परिणाम करणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी परतवाडा बस आगाराच्या २०० मीटर परिसरात धडक मोहीम सुरू केली आहे. अमरावती विभागांतर्गत परतवाडा बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात 'नो पार्किंग झोन'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.जवळपास ३ दिवसात परतवाडा बस आगाराच्या २०० मीटर परिसरात उभ्या असलेल्या ८ खाजगी ट्रॅव्हल्स चालकांवर स्वतंत्र वाहतूक नियंत्रण



शाखा व परतवाडा पोलिस स्टेशन,परतवाडा बस आगारप्रमुख जीवन वानखडे यांच्या संयुक्त विद्यमानाने कारवाई केली जात आहे.यामुळे ही कारवाई पुढे ही सुरू ठेवण्याची मागणी प्रवाशी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक सचिन डफडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मोहीम राबविण्यात येत आहे. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने अवैध प्रवासी वाहतुकीसंदर्भात ☞(पान २ वर)

# 'फिट इंडिया'च्या संकल्पनेला अमरावतीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांची एकजूट

### 'संडे ऑन सायकल' रॅलीत शेकडो नागरिकांचा सहभाग

अमरावती/प्रतिनिधीः- आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रचार, पर्यावरण संवर्धनाची जनजागृती आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'संडे ऑन सायकल' या सायकल रॅलीला रविवारी अमरावतीकरांनी



उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्र पोलीस, मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय आणि अमरावती सायकलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

उपमहासंचालक, खेलो इंडिया, भारतीय क्रीडा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सकाळी ७ वाजता जिल्हा स्टेडियम येथून रॅलीला प्रारंभ झाला. जिल्हा स्टेडियम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, राजकमल चौक, गर्ल्स हायस्कूल चौक मार्गे जोग स्टेडियम असा रॅलीचा मार्ग निश्चित करण्यात आला होता. रॅलीची सांगता अमरावती ग्रामीण पोलीस मुख्यालय, जोग स्टेडियम येथे झाली. या रॅलीत सुमारे २५० ते ३०० विद्यार्थी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक तसेच ☞(पान २ वर)

# पावसामुळे कार वर झाड कोसळले

## महानगरपालिकेकडून मदतकार्य

अमरावती/प्रतिनिधीः- शहरात शनिवारी दुपारी झालेल्या पावसामुळे झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूर नगर परिसरातील एसआरपीएफ कॅम्प रोड, वेंकटेश कॉलनी येथे एक मोठे झाड चारचाकी वाहनावर कोसळल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांना तसेच वाहनधारकांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला.



घटनेची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या आपत्कालीन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अतिक्रमण विभागाच्या जेसीबीच्या सहाय्याने कोसळलेले



झाड हटविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर करण्यात आली. त्यामुळे रस्ता ☞(पान २ वर)

# सेंट्रल बैंक ऑफ इंडियाचा मेगा कृषि आउटरीच कॅम्प

## १९ कोटी रुपयांचे कर्ज वाटप



अमरावती/प्रतिनिधीः- सेंट्रल बैंक ऑफ इंडिया द्वारे दिनांक ०६ जून २०२६ शनिवार रोजी माहेश्वरी भवन दर्यापुर येथे मेगा कृषि ऋण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रश्मिता पंचाले डी डी एम नाबार्ड अमरावती ह्या होत्या. तर मुख्य अतिथि म्हणून डॉ विकास खंडारे सह आयुक्त नगर विकास समिती अमरावती हें होते. प्रमुख पाहुणे म्हणून सचिन सुधाकर उपमाहाप्रबंधक सेंट्रल बैंक ऑफ इंडिया मुंबई आणि सुनील ☞(पान २ वर)

# दसरा मैदानात चाकूचा धाक; तरुण ताब्यात

## -राजापेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील दसरा मैदान परिसरात हातात धारदार चायना चाकू घेऊन संशयास्पदरीत्या फिरत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका तरुणाला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला असून आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, राजापेठ पोलीस ठाण्याचे डीबी पथक शुक्रवारी दुपारच्या सुमारास परिसरात गस्त घालत होते. यावेळी दसरा मैदान परिसरात एक युवक हातात चाकू घेऊन फिरत असल्याची व त्याच्या वर्तनामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा होताच पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयिताला घेराव घालून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव दीपक दीप बावरी (वय २६, रा. दसरा मैदान) असे सांगितले. अंगझडतीमध्ये त्याच्याकडून स्टीलचा ☞(पान २ वर)

# दोन लाखांच्या १३ बकऱ्यांसह चराई करणारा फरार

**मोर्शी/प्रतिनिधीः-** जनावरे सांभाळण्याची जबाबदारी देत विश्वासाने कामावर ठेवलेल्या चरवाह्यानेच मालकाला गंडा घातल्याची घटना मोर्शी तालुक्यात उघडकीस आली आहे. बकऱ्या चारण्यासाठी नेलेल्या तब्बल १३ बकऱ्यांसह चरवाहा बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली असून या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी फसवणूक व विश्वासघाताचा गुन्हा नोंदविला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, चिंचोली गवळी येथील काशीराम सखाराम कोळेकर (वय ७७) यांच्या कुटुंबाने आकाश कासदेकर याला बकऱ्या चारण्याच्या कामावर ठेवले होते. ५ जून रोजी त्याने कोळेकर यांच्या १३ लहान-मोठ्या बकऱ्या चारण्यासाठी मौजा मणीमपूर शिवारातील शेत परिसरात नेल्या. या बकऱ्यांची एकूण किंमत सुमारे दोन लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. संध्याकाळपर्यंत बकऱ्यांचा कळप परत न आल्याने कोळेकर कुटुंबाला संशय आला. त्यांनी तातडीने मणीमपूर शिवारासह आसपासच्या परिसरात शोधमोहीम सुरू केली. मात्र ना बकऱ्या सापडल्या ना त्यांना घेऊन गेलेला चराई करणारा तरुण. तक्रारीनुसार, आरोपीने स्वतःला विश्वासू आणि अनुभवी चरवाहा म्हणून सादर केले होते. त्यामुळे त्याच्यावर ☞(पान २ वर)

# वाडा बांधण्याच्या वादातून रक्तरंजित संघर्ष

## कोयत्याच्या हल्ल्यात युवक गंभीर जखमी; धारणीत खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाय-म्हशींसाठी वाडा बांधण्याच्या किरकोळ कारणावरून झालेला वाद एका युवकावर जीवघेणा हल्ला होण्यापर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना धारणी तालुक्यातील चित्री येथे घडली. कोयत्याने करण्यात आलेल्या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी धारणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदविला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, प्रकाश विठ्ठल शनवारे (वय २८) हे आपल्या वडिलांसोबत घरालगतच्या जागेत जनावरांसाठी वाडा उभारण्याचे काम करीत होते. याचदरम्यान गावातील उत्तम तुकाराम शेळके (वय ४०) हा तेथे आला. बांधकामाच्या कारणावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. काही वेळातच हा वाद तीव्र स्वरूप धारण करत गेला. आरोप आहे की, संतापलेल्या उत्तम शेळके याने जवळच पडलेला लोखंडी कोयता हातात घेत प्रकाश शनवारे यांच्यावर हल्ला चढविला. डोक्यावर ☞(पान २ वर)

# जनतेच्या दारी पोलीस

## तक्रार निवारण दिनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### -एका दिवसात २१२ तक्रारी निकाली

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागरिकांच्या समस्या आणि तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी सुरू केलेल्या 'तक्रार निवारण दिन' उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाअंतर्गत ६ जून रोजी जिल्हाभरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. विशेष म्हणजे, एका दिवसात तब्बल २१२ तक्रारींचे निराकरण करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत करणे तसेच नागरिकांना त्यांच्या तक्रारींसाठी पोलीस ठाण्यांमध्ये सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. तक्रार निवारण दिनाच्या निमित्ताने पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याला भेट देऊन नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांनी तक्रारदारांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांनीही मोर्शी पोलीस ठाण्यात उपस्थित राहून प्राप्त ☞(पान २ वर)